10-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

GRB/AKN/MMP/ 12:00

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास पुकारण्यापूर्वी मला एक घोषणा करावयाची आहे.

विधीमंडळाच्या सर्व विद्यमान व माजी सदस्यांनी तसेच, त्यांच्या कुटुंबीयांनी घेतलेल्या वैद्यकीय उपचाराची प्रतिपूर्ती करण्याबाबतची कार्यपद्धती सध्या अस्तित्वात आहे. सदरहू कार्यपद्धतीमध्ये बदल करुन आरोग्य विमा योजनेद्वारे रोखरहित उपचार पद्धती (Cashless Medical Treatment Through the Insurance Scheme) ही सुविधा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या संदर्भातील पुढील कार्यपद्धती निश्चित करण्याबाबतची कार्यवाही या सचिवालयामार्फत सुरु आहे.

-------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील धनगर समाजास अनुसूचित जमातीच्या सवलती देण्याबाबत**

***(१) * १५२१३ श्री.धनंजय* मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.रामराव वडकुते, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ११४८२ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** राज्यातील धनगर समाजास अनुसूचित जमातीच्या सवलती मिळवून देण्याबाबत संशोधन करुन अहवाल पाठविण्यासंदर्भात आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे तसेच संचालक, टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

***(२)*** असल्यास, या दोन्ही संस्थांचे अहवाल शासनास प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

***(३)*** असल्यास, या अहवालाचे स्वरूप काय आहे व त्यानुसार धनगर समाजास अनुसूचित जमातीच्या सवलती देण्याबाबत राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

***(४)*** नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री. विष्णु सावरा :** (१) होय,

***(२), (३)*** व (४) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी दिनांक ०२.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे.

तर टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांचेकडून महाराष्ट्रातील धनगर ही भटकी जमात व ***ओरॉन*** धनगडड या अनुसूचित जमातीबाबत अभ्यापूर्वक संशोधनाचे काम तीन टप्प्यात करण्यात येणार असून सध्या पहिल्या टप्प्यातील संशोधनाचे काम सुरु आहे.

टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी दिनांक १६.२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये पहिल्या टप्प्यातील फॉरमेटीव्ह संशोधनाच्या प्रगतीची माहिती तसेच प्रस्तावित मुख्य संशोधनांतर्गत भाग-एक व भाग-दोनच्या रुपरेषासंदर्भात शासनास प्रस्ताव सादर केला आहे. पहिल्या टप्प्याअंतर्गत विविध शासकीय कार्यालये, संस्था, शैक्षणिक संस्थांना भेटी देऊन प्राथमिक माहिती घेऊन तसेच धनगर समाजाबाबत साहित्य व पुस्तके प्राप्त करुनन मुख्य संशोधनासाठी नियोजन केलेले आहे दोन टप्प्यात होणारे मुख्य संशोधन पूर्ण करुन अंतिम अहवाल डिसेंबर, २०१७ पर्यंत शासनास सादर करण्यात येईल असे टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी कळविले आहे.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15213........

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन 2014 मध्ये धनगर समाजाने राज्यात फार मोठे आंदोलन केले होते. धनगर समाजाने ते आंदोलन बारामती येथे केले होते. त्या आंदोलनाचे उपोषणात रुपांतर झाले आणि ते उपोषण सोडविण्यासाठी तत्कालीन भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष, राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेब त्या ठिकाणी गेले होते. ते उपोषण सोडविताना त्यांनी धनगर समाजाला एक वचन दिले होते की, आमच्या पक्षाकडे सत्ता द्यावी. आम्ही सत्तेवर आल्यानंतर एका महिन्याच्या आत म्हणजे पहिल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत धनगर समाजाला आरक्षण देऊ. मागील 4 अधिवेशनापासून हा प्रश्न सभागृहात चर्चेला येत आहे आणि या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात प्रत्येक वेळी बदल होत गेला. हा प्रश्न चर्चेला आल्यानंतर या प्रश्नाला आदिवासी विकास मंत्री महोदयांनी उत्तर दिले. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी देखील धनगर समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नाला दोन वेळा उत्तर दिले होते. आज मात्र सत्तेवर आल्यानंतर भारतीय जनता पार्टी व शिवसेना पक्षाच्या सरकारने धनगर समाजाला वाऱ्यावर सोडून दिलेले आहे. डिसेंबर, 2014 च्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न प्रथम चर्चेला आला होता. त्यावेळी असे उत्तर देण्यात आले की, राज्य सरकार आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून अहवाल घेणार आहे. सदरचा अहवाल 5 महिन्यापूर्वी शासनाला प्राप्त झालेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनाने त्यावर कोणती कार्यवाही केली ? त्या अहवालामध्ये कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत ? धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्यासंदर्भात सत्ताधाऱ्यांनी पहिल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल, अशी जाहीर भूमिका घेतली होती. परंतु, हा विषय मंत्रिमंडळासमोर आलाच नाही. त्यानंतर डिसेंबर, 2014 च्या हिवाळी अधिवेशनामध्ये आम्ही या विषयाबाबत आग्रही भूमिका घेतल्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी आम्ही या संदर्भात महाअधिवक्ता यांचे मत घेऊ आणि ते सभागृहासमोर ठेऊ, असे उत्तर सभागृहात दिले. महाअधिवक्ता यांनी या संदर्भात काय सांगितले आहे, याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे. आजच्या तारांकित प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात नमूद केलेले आहे की, टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांच्यामार्फत अहवाल घेण्याचा प्रयत्न करुन तो अहवाल डिसेंबर, 2017 अखेर पर्यंत आम्ही सादर करु. माझा स्पेसिफिक

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15213........

श्री.धनंजय मुंडे.......

प्रश्न आहे की, पहिल्या प्रश्नाच्या अनुषंगाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून कोणता अहवाल आला, त्या अहवालात कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत ? महाअधिवक्ता यांनी या संदर्भात काय सुचविले आहे ? तसेच, टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांच्याकडून सन 2017 मध्ये अहवाल प्राप्त होणार आहे. याचा अर्थ सरकारला धनगर समाजाला आरक्षण द्यावयाचे नाही असा होतो, हे खरे आहे काय ?

**सभापती :** माननीय मंत्री महोदय विरोधी पक्षनेत्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेले आहेत. आपल्याकडून स्पेसिफिक उत्तर अपेक्षित आहे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दोन-तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे, हे मी मान्य करतो. मान्य करतो म्हणजे त्यांनी ज्या घटना सांगितल्या त्या झालेल्या आहेत, हे मान्य करतो. मागील अधिवेशनामध्ये मुख्यमंत्री महोदयांनी या ठिकाणी निवेदन करताना आणि उत्तर देताना सांगितलेले आहे की, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून अहवाल आलेला आहे. त्यानंतर झालेल्या डेव्हलपमेंट अशा आहेत की, आपण तिऱ्हाईत संस्था म्हणजे टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस यांना या संदर्भात अभ्यास करुन अहवाल सादर करण्याचे काम दिलेले आहे आणि त्यांनी काही कालावधी दिलेला आहे. याबाबत उत्तरामध्ये माहिती नमूद केलेली आहे. टाटा इन्स्टिटयुटने सांगितलेले आहे की, साधारणपणे (...अडथळा....)

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आपण माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे. मी या प्रश्नाला पूर्ण वेळ देण्याचे ठरविले आहे. कृपया आपण मध्ये बोलू नका. आपण प्रथम शासनाची भूमिका स्पष्ट होऊ द्यावी.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, टाटा इन्स्टिटयुट ऑफ सायन्सेस यांच्या बरोबर आमची उद्या पुन्हा बैठक होणार आहे. ती बैठक या संदर्भात आहे. त्यांनी जो कालावधी दिलेला आहे त्यानुसार डिसेंबर, 2017 पर्यंत त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होणार आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या संदर्भात जे सांगितले ते बरोबर आहे. त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर त्यावर कार्यवाही करता येऊ शकते.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15213........

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्याच्या इतिहासात एखाद्या समाजाला आरक्षण देतो असे सांगून किती खोटे बोलावे याला काही मर्यादा ठेवाव्यात. फसविले तर आहेच, परंतु आजही मंत्री महोदय तारांकित प्रश्नाला जे लेखी उत्तर दिलेले आहे तेच उत्तर वाचून दाखवित आहेत. सभापती महोदय, मी दोन पत्रे आल्याकडे देतो. राज्य शासनाने नोव्हेंबर, 2014 मध्ये "Director, MInisry of Tribal Affairs, Government of India, Shastri Bhavan, Smt. Namita Priyadarshi" यांना पहिले पत्र दिलेले आहे. मी त्या पत्रातील तिसऱ्या परिच्छेदातील शवेटची ओळ वाचून दाखवितो. त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, "Considering the above said facts the Dhangar caste of Maharashtra State does not fulfill the criteria of Scheduled Tribes." हे पत्र या सरकारने केंद्राच्या आदिवासी विकास विभागाला पाठविले आहे आणि येथे सांगतात की, आम्ही टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस यांच्याकडून अहवाल मागवित आहोत. कोणाला वेडे बनवित आहात ? धनगर समाजाने तुमच्या हाती सत्ता दिलेली आहे. आरक्षण द्यावयाचे नसेल तर आम्ही आरक्षण देणार नाही, असे स्पष्टपणे सांगावे. एकीकडे तुम्ही केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविताना सांगता की, या क्रायटेरियामध्ये धनगर समाज बसत नाही. हे एक पत्र आहे.

..B-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15213....

श्री.धनंजय मुंडे....

दुसरे पत्र 28 नोव्हेंबर रोजी केंद्र शासनाकडे सादर केलेले आहे, सरकार स्थापन झाल्यावर एक महिन्याच्या आत केंद्र सरकारला पत्र पाठविले आहे, त्यामुळे आपण धनगर समाजाची किती फसवणूक करणार आहात. आपले सरकार किती खोटारडे आहे, सरकार आल्यावर एक महिन्याच्या आत पहिल्या कॅबिनेटमध्ये निर्णय घेऊ असे जाहीर केले होते. दुसरीकडे याबाबत 28 नोंव्हेबरला केंद्र सरकारला पत्र पाठविले आहे, त्या पत्रातील काही भाग मी वाचून दाखवितो. "....as Dhangar Caste does not fulfill the above said criteria of Scheduled Tribes prescribed by the Central Government the Secretary, Cultural Affairs, Sport and Tourism Department, Government of Maharashtra vide D.O. letter on 6 November, 1981 call back earlier recommendations." म्हणजे पूर्वी जे रिकमंडेशन करण्यात आले होते ते देखील 2014 मध्ये काढून टाकण्यात आले आहे. सभापती महोदय, हे दोन्ही पत्र मी आपणाकडे देतो. यामधून संशय असा येतो की, हे सरकार आजही धनगर समाजाची फसवणूक करीत आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई या संस्थेला डिसेंबर 2017 पर्यंत अहवाल देण्यास सांगण्यात आले आहे. आता 2017 पर्यंत हा विषय लांबविण्यात आला आहे, 2017 वर्षे आले की, पुन्हा हा विषय लांबविण्यात येणार. आमची पहिली हरकत अशी आहे की, मंत्री महोदयांना धनगर समाजाला आरक्षण द्यावयाचे आहे किंवा नाही ? याबाबत त्यांनी सभागृहात स्पष्टपणे सांगितले पाहिजे. त्यानंतर त्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करावी. या प्रश्नांचे उत्तर आम्हाला मुख्यमंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे. कारण मुख्यमंत्री महोदयांनी बारामती येथे जाऊन धनगर समाजाचे उपोषण सोडविले होते व सरकार स्थापन झाल्यावर एक महिन्याच्या आत पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाच्या संदर्भातील निर्णय घेण्यात येईल असे सांगितले होते. परंतु असा निर्णय झालेला नाही, त्यामुळे मंत्री महोदयांना माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स यांचा अहवाल केव्हा येईल. त्याबाबत आम्हाला काही माहिती नाही. सरकार सत्तेत आल्यावर धनगर समाजाला एक महिन्यात आरक्षण देतो असे सांगितले होते, तर आता किती दिवसात आरक्षण देणार याचे स्पष्ट उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15213....

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, अशा प्रकारचा प्रयत्न आपल्या शासनाने पूर्वी सुध्दा केलेला होता. त्यावेळी आपला प्रस्ताव आपणाला मागे घ्यावा लागला होता हे देखील आपणाला माहिती आहे. यामध्ये काही चुका होऊ नये, सविस्तरपणे प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केला पाहिजे, असा शासनाचा हेतू आहे, (...अडथळा....) माझी भूमिका म्हणण्यापेक्षा माझ्या शासनाची भूमिका मी आपणाला सांगत आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर असा आहे की, माननीय आदिवासी विकास मंत्री यांची किंवा अदिवासी विकास विभागाची आरक्षणाबाबत नेमकी स्पष्ट भूमिका काय आहे ? त्यांनी याबाबत फ्लोअरवर काहीही सांगितलेले नाही. त्यांनी मागील अधिवेशनात स्पष्ट सांगितले आहे की, देणार नाही, देता येत नाही. आता आदिवासी विकास मंत्री महोदय किंवा आदिवासी विकास विभागाच्या भूमिकेत काही बदल झाला आहे काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, त्यामध्ये बदल होण्याचा संबंध नाही, जे निकष लावण्यात आले आहेत, जे निकष ठरविण्यात आले आहेत. (..अडथळा...) सभापती महोदय, माझे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, माझे म्हणणे ऐकून घ्यावे. यापूर्वी सुध्दा आपल्या शासनाने अशा प्रकारची....

**सभापती** : सभागृहाची बैठक मी 20 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.14 पासून 20 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

ता.प्र.क्र.15213......

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

श्री.सुनिल तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे.

**सभापती** : प्रथम मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री.विष्णू सवरा : माननीय मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात जाहीर केल्याप्रमाणे सदर काम टाटा इन्स्टिटट्यूट ऑफ सोशल सायन्सेस यांना दिलेले आहे. त्यांनी यासंबंधी अभ्यास पूर्ण करुन..

**सभापती** : सदर तारांकित प्रश्नावर 35 मिनिटांपासून चर्चा सुरु आहे.

श्री.सुनिल तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. माननीय आदिवासी मंत्र्यांनी यापूर्वी सदनात सांगितले की, धनगर समाजाला आरक्षण देता येणार नाही, देणार नाही. मी आता आदिवासी विकास मंत्र्यांना असा प्रश्न विचारला आहे की, या बाबतीत विभागाची भूमिका काय आहे, यावर त्यांनी असे सांगितले की, विभागाची भूमिका बदलण्याचे कारण उद्‌भवत नाही. याचा अर्थ धनगर समाजाला आरक्षण देणार नाही. यामुळे आम्हाला त्यांचे उत्तर ऐकायचे नाही.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली आहे. माननीय विरोधी पक्षनेता आणि माननीय सदस्य श्री.सुनिल तटकरे यांनी रास्त प्रश्न विचारले आहेत. आदिवासी मंत्र्यांनी भूमिकेत बदल केलेला नाही. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, हे सरकार सत्तेवर आल्यानंतर म्हणजे दीड वर्षांपूर्वी विधी व न्याय विभाग आणि ॲडव्होकेट जनरल श्री.सुनिल मनोहर होते यांनी असा अभिप्राय दिला होता की, पालघाट, जिल्हा थंडण, केरळ समुदाय संरक्षण समिती विरुध्द स्टेट ऑफ केरळ यांना घटनेच्या कलम 242 (2) अन्वये ज्याप्रमाणे आरक्षण दिले आहे, त्या संदर्भातील ठराव आदिवासी विकास विभागाने पाठवायचा होता. परंतु दीड वर्षे झाल्यानंतर सुध्दा विभागाने सदर ठराव पाठविलेला नाही. याउलट माननीय श्री.शरद पवार साहेबांना केंद्रीय आदिवासी मंत्री श्री.जोएल ओरम यांनी एक पत्राद्वारे लेखी उत्तर दिले आहे की, राज्य सरकारचा धनगर समाजाच्या आरक्षणाला पाठिंबा नाही. म्हणून माझा हरकतीचा मुद्दा आहे की, या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी सदनात येऊन शासनाची भूमिका स्पष्ट करावी.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15213......

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनात शासनाने या संदर्भात महाधिवक्त्यांकडून अहवाल मागवू असे सांगितले होते. मी माहितीच्या अधिकाराद्वारे महाधिवक्त्यांचा अहवाल मिळावा असा आग्रह धरला होता. परंतु श्री.एन.जे. जामदार, सचिव, विधी व परामर्शी यांनी मला पत्राद्वारे कळविले आहे की, तुम्हाला महाधिवक्त्यांचा अहवाल देता येत नाही. याचा अर्थ महाधिवक्त्यांनी अहवालात धनगर समाजाला आरक्षण देऊ नये म्हणून लिहिले आहे की, द्यावे म्हणून लिहिले आहे. ही गोष्ट सरकार लपवत आहे. धनगर समाजाला आरक्षण मिळावे अशी सरकारची भूमिका नाही. ही बाब मंत्री महोदयांच्या उत्तरातून लक्षात येत आहे.

ॲड.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, यामध्ये घटनात्मक पेच निर्माण झाला आहे. मला संसदेतील घटनेचा प्रामुख्याने उल्लेख करायचा आहे. येथे घटनेची पायमल्ली होत आहे. कोणाला आरक्षण दिले, त्याबद्दल मला काही म्हणायचे नाही. परंतु ज्यांना आरक्षण देऊ नये, त्यांच्याकरिता कायदे करुन शासन त्यांना आरक्षण देत आहे. परंतु ज्यांना घटनेने आरक्षण दिले आहे, त्यांना आरक्षण मिळू नये, म्हणून प्रयत्न करीत आहे. माझ्याकडे महाराष्ट्र सरकारचे राजपत्र आहे.

यानंतर D-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15213......

ॲड.रामहरी रुपनवर......

राज्य सरकारच्या या राजपत्रात 36 व्या क्रमांकावर ओरान आणि धनगर यांचा उल्लेख आहे. धनगर समाजाला घटनेने आरक्षण दिले आहे त्याबद्दल कोणतीही हरकत घ्यायची नाही हा संकेत आहे. अनुसूचित जाती व जमातीच्या यादीनुसार घटनेने त्या त्या समाजाला आरक्षण दिले आहे. धनगर वगळता इतर सर्व जातीना घटनेमधील यादीप्रमाणे आरक्षण मिळाले आहे.

सभापती महोदय, दोन-तीन महिन्यापूर्वी राज्य सरकारच्या मराठी भाषा कोष विभागाला बिहार राज्याचे मुख्यमंत्री श्री.नितीश कुमार यांनी पत्र लिहिले. त्यांनी पत्रात म्हटले आहे की, धनगर आणि धनगड़ या शब्दांचा अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये उल्लेख आहे, त्याबद्दल स्पष्टीकरण द्यावे. या दोन्ही शब्दांचा अर्थ काय होतो याचे त्यांनी स्पष्टीकरण मागविले. त्यांनी श्री.नितीश कुमार यांना उत्तर दिले, धनगर आणि धनगड़ हे दोन्ही शब्द एकाच जातीबद्दलचे आहेत. बिहार राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी त्या आधारे भारत सरकारच्या जनजाती मंत्रालयाला पत्र लिहिले. 15 दिवसात भारत सरकारने बिहार राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये आरक्षण लागू केले. त्याच धर्तीवर ओरिसा आणि छत्तीसगढ या राज्यांनी सुध्दा या समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती लागू केल्या आहेत. राज्य सरकारने सर्वेक्षणाचे काम टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेकडे दिले आहे. आतापर्यंत राज्य सरकारकडून अनेक विषयांबाबत सर्वेक्षण करण्याचे काम या संस्थेला देण्यात आले होते, त्यातील 90 टक्के प्रकरणामध्ये चुकीचे सर्वेक्षण झालेले आहे. या विषयाचे सर्वेक्षण योग्य प्रकारे होईल याची सुतराम शक्यता नाही. हा वेळकाढूपणा आहे. धनगर समाजाची फसवणूक करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. घटनेला बगल देण्याचा प्रकार होत आहे. मंत्री महोदय सांगतात ते चुकीचे आहे. त्यांनी याबाबतची भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, राज्य सरकारकडून धनगर समाजाची फसवणूक होत आहे हे स्पष्ट झाले आहे. मागील काळात विरोधी पक्षात असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते की, धनगर हा आदिवासी समाज आहे, त्याचे डझनभर पुरावे उपलब्ध आहेत. मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी जाहीर केले होते की, धनगर समाजाला आरक्षण लागू करण्याबाबत 15 दिवसात ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला घेऊन शिफारस करण्याचे काम केले

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामराव वडकुते.....

जाईल. टाटा समाजविज्ञान संस्थेकडे सर्वेक्षणाचे काम देण्याची आवश्यकता नाही. घटनेतील परिशिष्टामध्ये 36 व्या क्रमांकावर धनगर व धनगड़ यांचा उल्लेख आहे. हे दोन्ही शब्द एकच आहेत एवढी शिफारस राज्य सरकारने केंद्र सरकारला करावयाची आहे. देशातील तीन राज्यांनी धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू केले असेल तर महाराष्ट्र सरकारला त्याच धर्तीवर धनगर आणि धनगड़ या जातींना आरक्षण लागू करण्यास कोणतीही अडचण येऊ नये. परंतु वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिले जात आहे. टाटा समाजविज्ञान संस्था डिसेंबर, 2017 मध्ये आपला अहवाल सादर करणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 11 फेब्रुवारी, 2015 रोजी सह्याद्री अतिथीगृहात बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, 15 दिवसात शिफारस करु धनगर आणि धनगड़ हे एकच आहेत अशी शिफारस केंद्र सरकारला किती दिवसात करण्यात येणार आहे?

**सभापती** : आरक्षणाचा हा मुद्दा माझ्या मतदार संघातील काही भागाशी निगडित आहे. पहिल्या क्रमांकाच्या या प्रश्नावर चर्चा सुरु होऊन जवळजवळ 45 मिनिटे झाली आहेत. मला या प्रकरणी दोन-तीन मुद्दे दिसून येतात. मंत्री महोदयांनी याबाबत सभागृहाला स्पष्टीकरण द्यावे, असे मला वाटते. ॲडव्होकेट जनरल यांचे अभिप्राय काय आलेले आहेत, टाटा समाजविज्ञान संस्थेने कोणतीही शिफारस केली तरी भारत सरकारच्या संबंधित विभागाकडे त्या शिफारशीनुसार राज्य सरकारकडून शिफारस पाठविली जाईल, ती शिफारस केंद्र सरकार मान्य करणार आहे का?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या घटनेतील आरक्षणाचा फेरविचार करावा लागेल असे वक्तव्य देशभर केले जात आहे. अशा वेळेला हे सरकार काय करणार आहे? यांच्याकडून आम्हाला काही अपेक्षित नाही.

श्री.विष्णु सवरा : हा प्रश्न महाराष्ट्रातील धनगर समाजाला आरक्षण लागू करण्याबद्दलचा आहे. धनगर समाजाला आरक्षण मिळू नये अशी राज्य शासनाची अजिबात भूमिका नाही.

....(गोंधळ)....

**सभापती** : मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.47 ते 01.02 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती :** एकंदरीत सदनाच्या भावना लक्षात घेऊन हा प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे. शासनाला माझ्या स्पष्ट सूचना आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या पातळीवरच या अधिवेशन काळात एखादी सर्वंकष बैठक घेण्यात यावी. ॲडव्होकेट जनरल, टीआयएसएसचे प्रतिनिधी, माननीय आदिवासी विकास मंत्री यांना बोलावून बैठक घेण्यात यावी या मताचा मी आहे. तसे माननीय मुख्यमंत्र्यांना कळविण्यात यावे. आता मी पुढील कामकाज पुकारीत आहे.

....

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** सदस्यांचा परिचय

श्री.गिरीश बापट (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित केलेल्या श्री.गोपीकिसन बाजोरिया यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करून देताना मला अतिशय आनंद होत आहे.

......

**सभापती :** आता नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना घेण्यात येईल.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, या सभागृहाला काही परंपरा आहेत. नवीन सन्माननीय सदस्य सभागृहात निवडून येतात तेव्हा सन्माननीय मुख्यमंत्री किंवा सभागृहाचे नेते हे त्यांचा परिचय करून देतात. माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना काय अधिकार आहेत हे मला माहीत आहे.

**सभापती :** मी नियम 289 अन्वयेच्या प्रस्ताव पुकारला आहे. हा विषय आता कशाला उपस्थित करीत आहात ?

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, आपण याची आपण नोंद घ्यावी.

**सभापती :** ठीक आहे. मी नोंद घेतो. आता आपण माझी नोंद घ्यावी आणि नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना मांडावी.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, आपण मला काल बोलण्याची संधी दिली नाही. या सभागृहाचे कामकाज नियमाने चालते, घटने प्रमाणे चालते. काल माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाले. त्यास माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी हरकत घेतली. एखाद्या नियमामध्ये बदल करावयाचा असेल तर ती बाब नियम समितीपुढे आली पाहिजे. कुठल्या तरी एका राज्याचे राज्यपाल केंद्र शासनाला सांगतात आणि त्यामुळे येथील प्रोटोकॉल बदलला जातो. हे चुकीचे आहे. लोकसभेला किंवा सन्माननीय राष्ट्रपती महोदयांना असे लेखी आदेश देता येणार नाहीत. घटनेमध्ये काय आहे, संविधानामध्ये काय आहे ? संविधानामध्ये जे नमूद आहे त्याप्रमाणे सभागृहाचे कामकाज चालले पाहिजे. उद्या कोणीही उठेल आणि परिपत्रक काढेल. त्यामुळे सगळा प्रोटोकॉल बदलून जाईल. ......(अडथळा)...... सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांची स्वतंत्र अशी नियम समिती आहे. कुठलाही बदल करावयाचा असेल तर तो बदल नियम समिती पुढे जातो व तो बदल मंजूर झाल्यानंतर सभागृहापुढे मांडावा लागतो. तेव्हा याचा खुलासा झाला पाहिजे. अशा परंपरा सुरू झाल्या तर उद्या कोणीही आदेश काढेल, माननीय संसदीय कार्यमंत्री आदेश काढतील. श्री.गिरीश बापट हे माननीय संसदीय कार्यमंत्री आहेत. ते म्हणतील यात बदल करावा. तसा बदल करता येणार नाही. संविधान काय म्हणते हे प्रामुख्याने बघितले पाहिजे. संविधानाप्रमाणे या सभागृहाचे कामकाज चालले पाहिजे. पुढील अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या वेळी माननीय राज्यपाल येतील त्या आधी किंवा हे अधिवेशन संपण्यापूर्वी याचा खुलासा झाला पाहिजे. यासंबंधातील सर्व कायदेशीर बाब तपासून ती सभागृहासमोर ठेवली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**सभापती :** मान्य आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावरील सूचना मांडावी.

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावरील सूचना**

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंदर्भात एका गंभीर विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. आताच सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी उल्लेख केला की, या सभागृहाचे कामकाज राज्य घटनेप्रमाणे चालले पाहिजे. राज्य घटनेच्या अंतर्गत आपण नियम केले आहेत. राज्य घटनेनुसार विधान मंडळाला स्वायत्तता मिळालेली आहे. त्याप्रमाणे विधानमंडळाचे कामकाज चालले पाहिजे. तसेच केंद्र शासनाने देखील काही नियम केलेले आहेत. त्याचे पालन केंद्र व राज्य शासनामध्ये झाले पाहिजे. यासंदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा मी मांडू इच्छितो. भारत सरकारने कोड ऑफ कंडक्ट फॉर मिनिस्टर्स युनियन अँड स्टेटस् तयार केले आहेत. गेली अनेक वर्ष हा कोड ऑफ कंडक्ट अस्तित्त्वात आहे. या कोड ऑफ कंडक्टचे पालन न केल्यामुळे देशातील काही मंत्र्यांना राजीनामे देऊन घरी बसावे लागले आहे किंवा संबंधित मुख्यमंत्र्यांनी त्यांना पदावरून दूर केलेले आहे. हा कोड ऑफ कंडक्ट काय आहे ? यात नमूद आहे की, "In addition to the observance of the provisions of the Constitution, the Representation of the People Act, 1951,.." त्यालाच आधारभूत मानून पुढे "..and any other law for the time being in force, a person immediately after entering office as a Minister,.." जर एखाद्या व्यक्तीने मंत्री म्हणून पदभार स्वीकारला तर "..and in any case within a period of two months.." त्या व्यक्तीने पदभार स्वीकारल्यानंतर दोन महिन्यांच्या आत "..from the date of assumption of office, shall:" पदभार स्वीकारल्यानंतर दोन महिन्यांच्या आत काय करायला पाहिजे ? त्यातील (a) आणि (b) मी वाचून दाखवितो. मी सुरूवातीला b वाचतो. कारण तो रिलेव्हंट आहे. या (b) मध्ये नमूद आहे की, "Sever all connections," सगळे संबंध तोडून टाकेन. "..short of divesting.." तोडूनच टाकेन. काय ? "..himself of the ownership, with the conduct and management of any business in which he was interested before his appointment as Minister;" म्हणजे मंत्री पदी राहण्यापूर्वी जर एखाद्या कंपनीमध्ये भागिदार किंवा डायरेक्टर असेल आणि त्याची नोंद जर डायरेक्टर ऑफ रजिस्ट्रार ऑफ कंपनी यांच्याकडे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

झालेली असेल तर त्या पदाचा राजीनामा त्याने दोन महिन्याच्या आत दिला पाहिजे. तो दिला नाही तर कोड ऑफ कंडक्टचे उल्लंघन होते. आज कोड ऑफ कंडक्ट अस्तित्त्वात आहे. मला सभागृहाला सांगावेसे वाटते की, आपल्या देशाचे पंतप्रधान सन्माननीय श्री.मोदी साहेब असे म्हणतात की, मैं ना खाऊंगा और ना किसी को खाने दूंगा. यात प्रॉफीटचा प्रश्न येतो की नाही ? यात खाण्याचाच प्रश्न येतो. मंत्री महोदय कंपनीला मदत करू शकतात.

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

यामध्ये प्रॉफीटचा प्रश्न येतो. "स्वच्छ भारत, एक मिशन", "एक पाऊल पुढे" असे आपले स्लोगन आहे. आपण पहिल्यांदा हे स्वच्छ करावे. आपण कोड ऑफ कन्डक्टचे पालन करावे. पंतप्रधान कार्यालयाने हा कोड ऑफ कन्डक्ट केलेला असताना राज्याचे मंत्री तो पाळत नसतील तर त्यांना या सभागृहात बसण्याचा बिलकूल अधिकार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या संबंधित मंत्र्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकले पाहिजे किंवा नैतिकतेच्या आधारावर, कोड ऑफ कन्डक्टच्या आधारावर त्या मंत्र्यांनी.... माझा प्रश्न कोणत्याही मंत्री महोदयांच्या संदर्भात नाही. माननीय मुख्यमंत्री ज्यांना नियुक्ती करतात, त्या माननीय मुख्यमंत्र्यांनी ही कारवाई केली पाहिजे. माझा प्रश्न माननीय मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात आहे. एका मंत्री महोदयांनी कोड ऑफ कन्डक्टचे उल्लंघन केलेले आहे, त्यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी आजपर्यंत मंत्रिमंडळातून का काढले नाही ? या राज्यातील एक मंत्री, मंत्रिमंडळात येण्यापूर्वी एका कंपनीत भागीदार होते. मी सार्वजनिक विषयावर बोलता आहे. मी कोणावरही वैयक्तिक आरोप करीत नाही. I am speaking in the interest of the House, I am speaking in the interest of the Constitution.जी नैतिकता आरएसएसचे भागवत सांगतात, त्या नैतिकतेबद्दल मी बोलत आहे. एक पाऊल स्वच्छेतेसाठी, एक मिशन असे आपण सांगता. प्रथम आपण येथील स्वच्छता करावी.

सभापती महोदय, मंत्रिमंडळातील किती मंत्र्यांनी त्यांच्याकडे किती संपत्ती आहे, कोणत्या कंपनीत, व्यवसायात ते भागीदार आहेत या संदर्भातील मुख्यमंत्र्यांकडे दिलेली आहे काय, हे त्यांना विचारावे. या संदर्भात माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी उत्तर द्यावे. मानननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे.

सभापती महोदय, मी शालेय शिक्षण विभागाच्या मंत्र्यांविरुध्द नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. मला कोणाचेही नाव घ्यायचे नाही. सभागृहाला त्यांचे नाव माहीत आहे. शालेय शिक्षण विभागाने जी काही खरेदी केली, त्या संदर्भात सभागृहात चर्चा झालेली आहे. शालेय शिक्षण विभागाने बेकायदेशीरपणे पाच कोटी रुपयांची अग्निशमन यंत्रे खरेदी केली. 100 कोटी रुपयांचे प्रपोझल वित्त विभागाकडे पाठविले. वित्त विभागाने तो प्रस्ताव नाकारला. शिक्षण विभागात काय चालले आहे, अग्निशमन यंत्र खरेदीमध्ये घोटाळा ?

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे...

सभापती महोदय, मी कोणावरही आरोप करीत नाही. तसे आरोप करण्याची आपली प्रथा नाही. जर संबंधित मंत्री महोदयांचे नाव कंपनीच्या वेबसाईटवर असेल आणि ते सांगत असतील की, मी मानद संचालक होतो. त्यावर माझे असे म्हणणे आहे की, कंपनी ॲक्टमध्ये मानद संचालक पदाची तरतूद नाही. मग ते असत्य बोलत आहेत. सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. ते मानद संचालक होते असे संबंधित मंत्री महोदयांनी सभागृहात सांगावे. त्यांनी असे सांगितले तर तो सभागृहाचा हक्कभंग होईल. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी संबंधित मंत्री महोदयांवर कोड ऑफ कन्डक्टनुसार कारवाई केली नाही आणि संबंधित मंत्री सभागृहातील कामकाजामध्ये भाग घेणार असतील तर तो या सभागृहाचा देखील अवमान आहे. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी संबंधित मंत्री महोदयांवर कारवाई करावी आणि त्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकावे अशी माझी मागणी आहे. आणि तसे होत नसेल तर आपणास स्वतःचे एक अस्तित्व असते, नैतिकता असते, प्रामाणिकपणा असतो, त्याला अनुसरुन त्यांनी स्वतःहून राजीनामा द्यावा आणि सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेऊ नये. माननीय श्री.नरेंद्र मोदी म्हणतात की, "मैं ना खाऊंगा और ना किसी को खाने दूंगा." त्याला अनुसरून त्यांनी काम करावे, अशी मी आपल्यामार्फत विनंती करतो.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी नियम 289 अन्वये जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्या संदर्भात आजच्या सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी सरकारतर्फे उत्तर देण्यात येईल.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी असे उत्तर देणे अपेक्षित नाही. मी असे सांगितले की, जर कोड ऑफ कंडक्टचे उल्लंघन झाले असेल तर ते मंत्री सभागृहात बसू शकत नाहीत. त्याबाबत मंत्री महोदय काहीही बोलले नाही. माननीय मंत्री म्हणाले की, माननीय मुख्यमंत्री उत्तर देतील.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सरकारतर्फे उत्तर देण्यात येईल असे मी म्हटलेले आहे.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, संबंधित मंत्री सभागृहात असेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालवू नये, ही आमची भूमिका आहे.

**सभापती** : मी नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेवर जास्त बोलू देणार नाही. आपण संध्याकाळपर्यंत माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराची वाट पहावी. नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवरील निर्णय माझा आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, हा विषय सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावनेचाच नाही तर एका कार्यपद्धतीचा देखील आहे. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी या सदनाचे कामकाज नियम, प्रथा, परंपरा, घटना यानुसार चालले पाहिजे असे सांगितले. त्यांनी सदनामध्ये राज्याच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचा विषय मांडलेला आहे. सदनाचे कामकाज नियम, प्रथा, परंपरानुसार चालावे असा आपणा सर्वांचा प्रयत्न असतो. शासनाकडून एखादी चूक झाली असेल आणि ती मान्य करण्याचा विषय असेल किंवा संसदीय प्रतिष्ठा राखण्याचा प्रश्न येतो त्या वेळेला माननीय मुख्यमंत्री स्वतः निर्णयामध्ये सहभागी होतात आणि या सदनाची प्रतिष्ठा राखतात. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी सदनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा विषय मांडलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

हा विषय मांडत असताना सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, एका विशिष्ट मंत्र्याच्या विरुध्द आमचा आक्षेप नाही. सदनाची प्रतिष्ठा आणि घटनेच्या आधारावर हे सभागृह चालले पाहिजे. माननीय मंत्री ज्यावेळी शपथ घेऊन सभागृहात येतात त्यावेळी त्यांच्याकडून आवश्यक त्या सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी माननीय मुख्यमंत्र्यांची आणि सभागृहातील सर्व मंत्र्यांची सुध्दा आहे. आज सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी कोड ऑफ कंडक्टच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मांडला. त्यामुळे त्यावर अजून काही माहिती घेण्याची आश्यकता आहे असे मला वाटत नाही. माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी सांगितले की, माननीय मुख्यमंत्री येथे येतील आणि या मुद्याच्या अनुषंगाने उत्तर देतील. परंतु मी सांगू इच्छितो की, हा विषय इतर विषयासारखा नाही. एखादा विषय सभागृहात उपस्थित केल्यानंतर त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी किंवा माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी येऊन निवेदन करण्याएवढा हा साधा विषय नाही. या विषयाच्या माध्यमातून कायदेशीर आणि घटनात्मक प्रश्न निर्माण झाला आहे. या विषयाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले आहे. आरएसएसच्या संदर्भात भागवतांची काय भूमिका आहे, राज्य कशाप्रकारे चालले पाहिजे, सर्वांनी स्वच्छ प्रतिमा कशी ठेवली पाहिजे, या संदर्भात सभागृहाची प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठी हे सभागृह घटनेनुसार चालले पाहिजे. त्यामुळे या दृष्टिकोनातून सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी सांगितल्यानुसार तत्काळ संबंधित मंत्र्यांचा राजीनामा घेतला पाहिजे किंवा स्वतःहून मंत्री महोदयांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे. या शिवाय अन्य दुसरा कोणताही मार्ग यातून निघू शकत नाही. केवळ वेळ मारून नेणे किंवा असे झालेले नाही, असे सांगणे योग्य नाही. सभापती महोदय, दिवसभराच्या शेवटी किंवा सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करण्यापूर्वी या चर्चेमध्ये जे कोणी भाग घेतील त्यांना आपले मत मांडण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा. असे नाही की, माननीय मुख्यमंत्री त्यांची बाजू मांडू शकणार नाहीत. माननीय मुख्यमंत्री हे या विषयी कायदेशीरपणे सांगू शकतात. एकूणच हा गतीरोध कुठेतरी संपविण्याच्या दृष्टीने काही निर्णय या सभागृहात होणे अपेक्षित आहेत. सभागृहाचे नेते, माननीय मुख्यमंत्री यांनी या विषयी स्पष्टपणे भूमिका मांडावी, अशा प्रकारची मी मागणी करतो. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मांडलेला आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

आपल्या सभागृहाची प्रतिष्ठा आहे. सभापती महोदय, आम्ही आपल्याकडून निर्णयाची अपेक्षा करतो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात येऊन तत्काळ या संदर्भातील निवेदन केले पाहिजे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझे ज्येष्ठ सहकारी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या मुद्याला माझे दुसरे ज्येष्ठ सहकारी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी अनुमोदन दिले आहे. महोदय, मला या माध्यमातून मुद्दाम दोन-तीन मुद्दे सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहेत. पहिली बाब अशी की, जनतेसमोर आणि राज्यासमोर हे येणे खूप गरजेचे आहे की, जे पक्ष निवडणुकीत स्वच्छ आणि पारदर्शक सरकार देण्याची हमी जनतेला देत होते त्यांची आजची परिस्थिती काय आहे आणि त्यांच्याकडून नैतिकतेच्या आधाराचे पालन कुठपर्यंत झाले आहे ? महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, संविधानात कंपनी ॲक्टमध्ये कलमे दिलेली आहेत. परंतु त्यांचे पालन झालेले नाही. राज्य सरकारमध्ये जबाबदार पदावर असलेल्या माननीय मंत्र्यांनी त्या कलमांचे पालन केले नसेल तर ही गंभीर बाब आहे. माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्री आज संध्याकाळपर्यंत या विषयावर उत्तर देतील असे सांगितले असले तरी हा विषय खूप गंभीर आहे. आपली प्रथा आहे की, एखादा गंभीर विषय सभागृहात उपस्थित झाला तर त्या विषयावर सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करुन माननीय मुख्यमंत्री सभागृहात येतात व त्या विषयी खुलासा करतात. त्यामुळे सभागृहाच्या प्रथेनुसार माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा करावयास पाहिजे. जर त्यांच्या सरकारमध्ये असे मंत्री असतील तर त्यांनी त्या बाबतची कबुली द्यावी. त्यांच्यावर काय कारवाई करणार हे सभागृहाला सांगितले पाहिजे. तोपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित ठेवावे, अशी आमची मागणी आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी नियम 289 अन्वये सभागृहासमोर विषय मांडला आहे. सभापती महोदय, अधिवेशन सुरु होण्यापूर्वी आपल्या पुढाकाराने बैठक पार पडली. त्या बैठकीत माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, विधिमंडळाचे मुख्य काम कायदे करणे आहे. कायदे पाळले जातात की नाही या संदर्भातील चर्चा या सभागृहाच्या दृष्टीने महत्त्वाची नव्हे तर तो सगळ्यात महत्त्वाचा घटक म्हणून आपण मानतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नियम 289 अन्वये जेव्हा चर्चेची मागणी केली जाते त्यावेळी तो विषय केवळ सन्माननीय संसदीय

..3..



श्री.हेमंत टकले....

कार्य मंत्र्यांनी सांगितल्यानुसार माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरानंतर संपणारा नसतो. ज्या पध्दतीचे डायरेक्टीव्हज् किंवा कोड ऑफ कंडक्ट केंद्र आणि राज्यासाठी मान्य झाले असतील तर त्याला अनुसरुन, ज्यांना राज्याच्या मंत्रिमंडळात काम करण्याची संधी मिळते त्यांच्यावर काही प्रकारची बंधने येतात. त्या बंधनांमध्ये राहणे का आवश्यक आहे त्याचा हेतूही त्यामध्ये स्पष्ट होतो. कारण Anybody serving as a Minister in a State has primary goal of the interest of the State and nothing individual. मंत्री म्हणून शपथ घेताना सुध्दा आपण सांगतो की, माझ्यासमोर येणारा कोणताही विषय मी कोणत्याही पध्दतीने त्यात सहभागी नसताना....यामध्ये 'इम्पार्शियल' असे म्हटलेले आहे. अशा प्रकारची भूमिका त्यांना बजावावी लागते. त्यासाठी काही नैतिक अधिष्ठान असणे आवश्यक असते. आपण या सर्व परंपरा ब्रिटिश पार्लमेंटकडून घेतलेल्या आहेत. ब्रिटिश पार्लमेंटच्या काळाच्या अगोदरपासूनचे प्रसिध्द वाक्य असे आहे की, "Caesar's wife should be above suspicion." म्हणजे राज्यकर्त्यांबद्दल मनामध्ये संशय निर्माण होईल अशी परिस्थिती जनतेसमोर यावयास नको. त्यांची वर्तणूक घालून दिलेल्या चौकटीप्रमाणे होते किंवा नाही हे बघण्याची जबाबदारी माननीय मुख्यमंत्र्यांची असते. त्याप्रमाणे या विषयाच्या संदर्भात काही चुकीचे घडले असेल किंवा दुरान्वयेही त्याचा संबंध जोडला गेला असेल तर ही बाब गंभीर असल्यामुळे ही चर्चा या सभागृहात होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. कारण शेवटी हे काम अतिशय महत्त्वाचे आहे. This House is supposed to debate. केवळ एका बाजूचा दृष्टिकोन ऐकून निर्णयाप्रत येण्यासाठी हे सभागृह नाही. दोन्ही बाजूचे ऐकल्यानंतर त्यातून जे बाहेर पडते that is going to be the consensus of the House. म्हणून यावर चर्चा व्हावयास पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयावरील चर्चेला उत्तर देण्यापूर्वी चर्चा व्हावयास पाहिजे. या विषयाच्या अनुषंगाने सर्व बाजूंवर चर्चा झाल्यानंतर जो विषय समोर येईल त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी शासनाकडून अधिकृतपणे भूमिका मांडावी. परंतु त्या विषयाचे गांभीर्य आणि एकूण सार्वजनिक नैतिकतेचा मुद्दा अधिष्ठान म्हणून आपण मांडणार असू तर ते योग्य नाही. कोणी काय आश्वासने दिली आणि त्यानुसार कसा पारदर्शक कारभार सुरु आहे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

किंवा कोणामुळे काय होते यावर मी आता भाष्य करीत नाही. कारण आज हा मुद्दाच नाही. वास्तविक पाहता ही घालून दिलेल्या कर्तव्य पालनाची शिस्त आहे. त्या शिस्तीचे पालन कशा

..4..



श्री.हेमंत टकले....

पध्दतीने करावे यावर सभागृहातील सर्व सदस्यांनी साधकबाधक चर्चा करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी जो ठराव दिलेला आहे त्यावर आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून चर्चा सुरु करावी, अशी आमची आग्रहाची विनंती आहे.

एच....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : मी सदनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, आपण आजच्या कार्यक्रमपत्रिकेवरील कामकाज पहावे. आता मांडलेल्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा विषयही महत्त्वाचा आहे, या विषयी कोणाला संशय असण्याचे कारण नाही. मात्र त्याहीपेक्षा मला स्वतःला असे वाटते की, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाच्या रूपाने विरोधी पक्षानेही दुष्काळाचा प्रश्न पुढे आणला आहे. आपली मागणी आहे की, नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव मान्य करून त्यावर चर्चा घडवावी. दुष्काळावरील प्रस्ताव घ्यायचा की नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव घ्यायचा हा विषय समोर आला आहे. दुसरा विषयही पुढे येत आहे. आपण इतक्या दीर्घ मुदतीची भाषणे केल्यानंतर आपण काय चर्चा करणार आहात हाही एक विषय पुढे येत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर आल्यानंतर अगदी अपवाद म्हणून प्रश्न आणि चर्चा घडवायची असेल तर घडवून आणू. माझी सूचना आहे की, दुष्काळाला प्राधान्य देणे जास्त योग्य ठरेल.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस, आम्ही सर्व विरोधी पक्ष दुष्काळाच्या विषयी फार गंभीर आहोत, आग्रही आहोत. आम्हाला ती चर्चा करावयाची आहे.

**सभापती** : चर्चा कधी घ्यायची तेवढेच विचारले.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, मी तेच सांगत आहे. मी आपला आदर ठेवून, नम्रतापूर्वक सांगत आहे की, कार्यक्रमपत्रिकेमध्ये लक्षवेधी सूचना दाखविल्या आहेत. तो कार्यक्रम बाजूला ठेवावा. आपण ही चर्चा घ्यावी. आपल्याला तो वेळ मिळेल, त्यानंतर लगेच दुष्काळावर चर्चा करण्यास आम्ही तयार आहोत.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, विधिमंडळातील सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांनी नियम 289 अन्वये सभागृहामध्ये अति महत्त्वाचा प्रस्ताव आणला आहे. तो प्रस्ताव नियम 289 अन्वये कसा होतो हे सभागृहाला पटवून देण्याचाही त्यांनी प्रयत्न केला आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री. माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, संजय दत्त यांनी नियम 289 अन्वये हा प्रस्ताव कसा होतो याबाबतीतील आपले मत सभागृहात मांडले आहे. माझी विनंती अशी आहे की, कोड ऑफ कंडक्टच्या बाबतीत नियम 289 चा प्रस्ताव या मंत्रिमंडळातील माननीय मंत्र्यांच्या बाबतीत आला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

असेल तर हा प्रस्ताव सुध्दा सभागृहाने गंभीरपणे घ्यावा. दुष्काळाचा विषयही तेवढाच महत्त्वाचा आहे. आज गुरूवार असून गुरूवारी विरोधी पक्षाचा दुष्काळाचा प्रस्तावही आहे. नियम 289 अन्वये मर्यादितपणे सन्माननीय सदस्यांना चर्चा करावयाची आहे, ती चर्चा व्हावी.

**सभापती** : मला आपल्याकडूनच समजून घ्यायचे आहे की, नियम 289 अन्वये चर्चा करू शकतो का ? हा तांत्रिक मुद्दा तयार होणार आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपल्याला या बाबतीतील निर्णय करावयाचा आहे. आम्ही आमचा आग्रह करीत आहोत. आम्ही सभागृहाचा आग्रह करीत आहोत. नियम 289 बाबतीत त्यांनी सांगितले की, सरकारकडून आज संध्याकाळपर्यंत निवेदन येईल. माझा त्या बाबतीतील विषय नाही. हा विषय किती गंभीर आहे हे सन्माननीय सदस्यांनी पटवून दिले आहे. नियम 260 अन्वये आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे, त्यावरील चर्चा सुध्दा आजच या ठिकाणी करावयाची आहे. संबंध सभागृह मग सत्ताधारी बाकावरील असतील किंवा विरोधी बाकावरील असतील, आज राज्यात पडलेल्या दुष्काळावर तेवढेच गंभीर आहे. तो विषय जरी गंभीर असला तरी या विषयाच्या बाबतीत आपण निर्णय द्यावा आणि या सभागृहामध्ये नियम 289 अन्वये चर्चेला परवानगी द्यावी ही आमची विनंती आहे.

प्रा. जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, आदरणीय गटनेते श्री. शरद रणपिसे यांनी प्रस्ताव या सभागृहात मांडला आहे. काही माननीय मंत्र्यांच्या संदर्भातील हा प्रस्ताव मांडला गेला आहे. त्यामुळे या सभागृहात स्पेसिफिक फॅक्टस् आल्या पाहिजेत. कोणत्या माननीय मंत्र्यांचे काय आहे हे मला काही अजून कळलेले नाही. माननीय मंत्र्यांनी उठून उत्तर दिले की, आम्ही निवेदनाला उत्तर देतो. मग तुम्हीच सांगा की, कोणत्या माननीय मंत्र्यांविरूध्द काय आहे ? त्याशिवाय चर्चा होणार नाही. आता हा विषय सभागृहाची प्रॉपर्टी झाली आहे. त्यामुळे यातील स्पेसिफिक इश्यू आहे की, कोणकोणत्या माननीय मंत्र्यांनी हॉनररी डायरेक्टर म्हणून खाजगी कंपनीमध्ये ऑफिस ऑफ दी प्रॉफिट एन्जॉय केले, त्याची आपल्याला माहिती पाहिजे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. जनार्दन चांदूरकर ....

वर्तमानपत्रामध्ये छापून येते हे काही सभागृहाला मान्य नाही. त्यांची नावे येथे आली पाहिजेत. त्यांची नावे आणि त्यांनी तेथे कशा पध्दतीने कोड ऑफ कंडक्टचे व्हायोलेशन केले याचे एव्हिडेन्सेस सुध्दा सभागृहासमोर आले पाहिजेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. जनार्दन चांदूरकर, आपण आपले म्हणणे पूर्ण करावे.

प्रा. जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, महत्त्वाचा मुद्दा आहे. ही काही पब्लिक मिटिंग नाही. हे सार्वभौम सभागृह आहे. आपण अशी चर्चा करू शकत नाही. कोण माननीय मंत्री आहेत, त्यांच्यावर काय चार्जेस आहेत हे पहिल्यांदा स्पेसिफाय झाले पाहिजे. माझ्या मते माझ्या वाचनात ते चार्जेस आलेले आहेत, ते खरे आहेत की खोटे आहेत हे मला माहीत नाही. नावे येणे आवश्यक आहे. माझ्या वाचनात माननीय मंत्री श्री. विनोद तावडे यांचे नाव आलेले आहे. येथे 'हिंदू' न्यूजपेपरमध्ये ही बातमी छापून आलेली आहे की, दिल्लीमध्ये प्रेस कॉन्फरन्स झाली आणि दिल्लीतील लोकांनी डिमांड केली की, काही असे जे लोक आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. तुम्ही आता ताक मागायला जाऊन भांडे लपविण्यात काय अर्थ आहे ? तुम्ही सांगा की, कोण माननीय मंत्री आहेत, काय आहे ? हे जर खोटे असेल तर माननीय मंत्री श्री. विनोद तावडे यांच्यावर तो अन्याय आहे. त्यामुळे त्याची चर्चा झाली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी महत्त्वाचा मुद्दा सांगितला आहे. मी त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.

**सभापती** : मी आता निर्णयाप्रत येणार आहे. मी आपले आभार मानतो. मी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर मघाशी निर्णय दिला आहे. मी याचा अस्वीकार करतो. तथापि माननीय मुख्यमंत्री त्वरित यावर निवेदन करतील, केवळ अपवाद म्हणून प्रश्नकर्त्यांना, नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव ज्यांनी मांडला आहे त्यांना त्यावर 4 प्रश्न विचारण्याची मी परवानगी देईन. मी प्रस्ताव नाकारलेला आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : मी आपल्याला परत एकदा सांगतो की, ज्या सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव मांडला आहे, त्या 2-3 जणांना प्रश्न विचारण्याची अपवाद म्हणून, नियम म्हणून नाही, परवानगी देतो. आता सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी बोलावे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलत वेलमध्ये येतात.)

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी त्यासाठीच उभा आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे, त्यांचा नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव आहे. हा निर्णय झाला आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण त्यांना सुध्दा परवानगी द्यावी.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, पहिल्या विषयाच्या बाबतीत सांगावे.

**सभापती** : माझा निर्णय झालेला आहे. आपण नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलावे. तुम्हाला विषय मांडायचा आहे का ?

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

**सभापती** : मी माझा निर्णय घेतला आहे. मी बदलू शकणार नाही. मी मान ठेवला आहे. भावना विचारात घेतल्या आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी संध्याकाळच्या आत उत्तर द्यावे. त्यावेळी प्रश्न विचारायचे असतील तर विचारावेत.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, गंभीर प्रश्न आहे.

**सभापती** : नियम 260 चा प्रस्ताव टाळून हे अगोदर घ्यायचा आहे का ? मग कसेही बोलता येईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, विषय मोठा आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, याबाबतीत निर्णय झाला पाहिजे.

**सभापती** : विषय छोटा किंवा मोठा नाही. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी बोलावे. मी निर्णय दिलेला आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती ....

मी सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सभागृहाची बैठक दुपारी 02.15 पर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.39 ते 02.15 पर्यंत स्थगित झाली.)

----

....I

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती :** नियम 289 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सभागृहात कोरम नाही.

**सभापती :** आपण आपले म्हणणे मांडण्यास सुरुवात करावी.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, यापूर्वी सभागृहात एक विषय नियम 289 च्या अनुषंगाने मांडण्यात आला होता व तो विषय नियम 289 चा कसा होतो यावर सभागृहात सुमारे एक तास चर्चा झाली आहे.

सभापती महोदय, मराठवाड्यातील दुष्काळाच्या बाबतीत मी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. मराठवाड्यातील दुष्काळाचे हे सलग चवथे वर्ष आहे आणि गेली चार वर्षे मराठवाड्यातील शेतकरी या दुष्काळाचा सामना करीत आहेत.

सभापती महोदय, आपल्याकडे नियम 289 अन्वये राज्यातील दुष्काळासंदर्भातील एक वेगळी सूचना आली आहे. राज्यातील दुष्काळावर सभागृहात चर्चा होण्यास हरकत नाही. परंतु, मराठवाड्यात केवळ दुष्काळ नाही तर मराठवाड्यातील शेतीची पूर्णपणे राखरांगोळी झालेली आहे. मराठवाड्यात गेल्या 12 ते 13 महिन्यात 1300 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात सर्वाधिक आत्महत्या झालेल्या आहेत. मतदारसंघनिहाय विचार केला तर सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या गेवराई मतदारसंघात झाल्या आहेत. शेतीच्या पाण्याचे तर सोडूनच द्या, पण पिण्याच्या पाण्याचेही दुर्भिक्ष निर्माण झाले आहे. शासनाने टँकर सुरु केले असले तरी टँकर भरण्यासाठी देखील पाणी मिळत नाही. त्यामुळे पाण्याअभावी तीन-चार दिवस टँकर उभे असतात. सरकारचे म्हणणे असे आहे की, टँकर दिलेले आहेत. परंतु, पाणी उपलब्ध नाही. पिण्याच्या पाण्याची अशी परिस्थिती मराठवाड्यात आहे. एमआरईजीएसच्या कामाच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर प्रत्येक बैठकीत असे सांगितले जाते की, कामे सेल्फवर आहेत,

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.........

मंजूर केलेली. परंतु, वस्तुस्थिती ही आहे की, एमआरईजीएसची कामे सुरु नाहीत. एकीकडे पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष आहे, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे आणि दुसरीकडे शेतकऱ्यांच्या हाताला काम नाही.

सभापती महोदय, आपल्याकडे नियम 289 अन्वये चर्चेची जी सूचना प्राप्त झाली आहे त्यामध्ये राज्यातील शेतकऱ्यांना शासनाने करावयाची मदत, अशा प्रकारचा विषय आहे. मी मराठवाड्यातील दुष्काळाच्या संदर्भात नियम 289 अन्वये सूचना मांडत असताना आपणास नम्रपणे अशी विनंती करतो की, मराठवाड्यासाठी शासनाने स्वतंत्र पॅकेज दिले पाहिजे. विदर्भ अडचणीत असताना याच राज्य सरकारने स्वतंत्र पॅकेज दिले होते आणि त्या माध्यमातून विदर्भात अनेक कामे झाली आहेत. या पॅकेजच्या माध्यमातून विदर्भाला देण्यात आलेल्या निधीचे व्यवस्थापन विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली होत आहे व विभागीय आयुक्त या निधीचे कोऑर्डिनेटर आहेत. या पॅकेजच्या माध्यमातून देण्यात आलेला निधी खर्च होतो आहे किंवा नाही, हे पाहण्याचे काम महसूल आयुक्त करीत होते. त्याच धर्तीवर मराठवाड्यालाही स्वतंत्र पॅकेज देऊन मराठवाड्यातील शेतकऱ्यांना या सरकारने दिलासा द्यावा, असे या नियम 289 च्या सूचनेच्या अनुषंगाने मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

सभापती महोदय, राज्यातील दुष्काळाच्या संदर्भात आपल्याकडे प्राप्त झालेल्या नियम 289 च्या सुचनेच्या अनुषंगाने राज्यातील दुष्काळाच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा होणार आहे. राज्यातील दुष्काळ आणि मराठवाड्यातील दुष्काळ यामध्ये फरक असा आहे की, मराठवाड्यातील शेती पूर्णपणे बंद आहे. कारण, गेल्या चार वर्षांपासून मराठवाड्यात दुष्काळ आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या वेदना व दु:ख वेगळे आहे. मराठवाड्यातील सर्वच्या सर्व तालुके दुष्काळी परिस्थितीत आहेत. गेल्या तीन वर्षात या भागातील आणेवारी 50 पैशांपेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे मी नियम 289 अन्वये दिलेली सूचना आपण मान्य करावी व या विषयावर सभागृहात चर्चा घ्यावी, अशी विनंती या माध्यमातून आपणास करीत आहे.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** नियम 289 अन्वये दिलेल्या या सूचनेच्या संदर्भात माझा निर्णय असा आहे की, हा प्रस्ताव मी नाकारीत असलो तरी सन्माननीय सदस्यांच्या भावना, मराठवाड्यातील दुष्काळाचे एकंदरीत वेगळेपण, सातत्याने त्या भागात पडलेला दुष्काळ, 6 टक्क्यांवर आलेला पाणीसाठा, या सर्व मुद्यांचा विचार करुन नियम 97 च्या माध्यमातून मी लगेच चर्चा करण्याची संधी आपल्याला देतो.

आता आपण कामकाज पत्रिकेतील पुढील कामकाज सुरु करु

-----------

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभागृहाच्या लॉबीमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. आम्ही सकाळी लॉबीमध्ये बसलो होतो. त्यावेळी आम्हाला लॉबीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याचे बघावयास मिळाले. ही विरोधी पक्षाची लॉबी आहे. आम्ही लॉबीमध्ये काही विषयांबाबत चर्चा करतो. सभागृहाचे कामकाज करताना काय केले पाहिजे आणि काय नाही, याबाबत आम्ही लॉबीमध्ये चर्चा करतो. आम्ही जी रणनिती ठरवितो ती लॉबीमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून.....

**सभापती** : आपले म्हणणे माझ्या लक्षात आलेले आहे. चौकशी करुन ते सीसीटीव्ही कॅमेरे काढून टाकण्यात येतील.

--------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

**सभापती :** आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडतो.

सभापती महोदय, काल कल्याण-डोंबिवली परिसरातील बारवे विभागातील जनतेने डम्पिंग ग्राऊंडच्या विषयाबाबत मोर्चा काढला होता. तो मोर्चा महापालिकेजवळ आल्यानंतर तेथील सर्व पत्रकार बातम्यांचे संकलन करण्यासाठी, मोर्चा कव्हर करण्यासाठी तेथे गेल्यानंतर ज्यावेळी त्यांनी महानगरपालिकेत प्रवेश केला त्यावेळी महानगरपालिकेच्या सुरक्षा अधिकाऱ्यांकडून त्यांना धक्काबुक्की करण्यात आली, शिवीगाळ देखील करण्यात आली. त्यानंतर पत्रकारांनी निषेध म्हणून तेथे ठिय्या आंदोलन केले.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, प्रत्येक अधिवेशनात पत्रकार संरक्षण कायदा संमत करण्याचे आश्वासन दिल्यानंतर देखील कायदा पास केला जात नाही. परंतु, ठिकठिकाणी पत्रकारांवरील हल्ले वाढत आहेत आणि आम्ही त्याचा निषेध करतो. माननीय नगर विकास राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी आपल्याला विनंती करतो की, याबाबत सखोल चौकशी करुन जे दोषी आहेत, मग ते कितीही मोठ्या पदावर कार्यरत असले तरी पत्रकारांवर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे जो विषय उपस्थित केलेला आहे त्यामध्ये खरोखरच गांभीर्य आहे. एखाद्या मागणीसाठी किंवा मोर्चा कव्हर करण्यासाठी गेलेल्या पत्रकारांना अशा प्रकारे वागणूक देण्यात आलेली आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्याबाबत आपण माहिती घेऊ आणि जे दोषी असतील त्यांच्यावर जी कारवाई करावयाची आहे ती करु.

-------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

प्रा.अनिल सोले (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 11 मार्च, 2016 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 10 मार्च, 2016 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. त्यानुसार 3 अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे वेळ देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव

1) श्री.जयंत पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक-16, 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक-13, 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

3) श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक-86, 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**सभापती :** अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती :** नियम 93 अन्वयेच्या सूचने संदर्भातील निर्णय सचिव वाचून दाखवतील.

**सचिव :** सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "पेण तालुक्यातील दादर येथील पारंपारिक हातपाटी व्यवसाय करणाऱ्या वाळू व्यावसायिकांवर होत असलेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अशोक उर्फ भाई जगताप यांनी "दक्षिण मुंबईतील फणसवाडी येथील जवाहर मेन्शन सोसायटीतील पाण्याच्या टाकीत सफाईसाठी उतरलेल्या दोन कामगारांचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या ॲड.हुस्नबानु खलिफे यांनी "दिनांक 7 मार्च, 2016 रोजी मानखुर्द मुंबई येथील रेल्वे स्थानक परिसरातील 4 वर्षाच्या मुलीचे अपहरण करुन तिच्यावर बलात्कार करुन केलेली हत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "वैद्यकीय पूर्व परिक्षेमध्ये दरवर्षी होणाऱ्या फेरबदलामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, सतीश चव्हाण यांनी "औरंगाबाद जिल्ह्यातील शेंदुरवाडा, ता.गंगापूर येथील संतोष दुबीले या गरीब शेतकऱ्याच्या एक एकर जमिनीचे बेकायदेशीररित्या संपादन करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव........

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी "शासनाने असंघटित कामगारांसाठी कोणतेही धोरण ठरविले नसल्याने घरेलु कामगार त्यांच्या हक्कांपासून वंचित राहणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "राज्याच्या योजनेमधील शाळा व तुकड्यांमधील 17 हजारांहून अधिक शिक्षकांचे पगार तरतुदीअभावी महिनोंमहिने होत नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी "उत्तम गल्वा कंपनीला पाणी उचलण्यासाठी परवानगी दिल्याबाबत शासनाने संबंधित अधिकारी व कंपनी व्यवस्थापनाविरुद्ध कारवाई करण्याबाबत होत असलेले दुर्लक्ष, मौजे भुगाव व परिसरातील तसेच वणा नदीच्या आसपासच्या सर्व गावातील ग्रामस्थांना होत असलेला त्रास" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी "सन 2016-17 साठी शासनाने शिक्षण हक्क कायद्याच्या ऑनलाईन प्रक्रिया जाहीर केली असून वेबसाईट कार्यान्वित नसल्यामुळे एकाही शाळेची नोंदणी झालेली नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**म.वि.प. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत**

**सभापती** : म.वि.प. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करण्यापूर्वी मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, प्रत्येक पक्षाचे प्रतोद जी नावे देतील त्या नावांवर आपण ठाम रहावे, असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्यांनी वेळेची मर्यादा लक्षात घेऊन भाषण केले पाहिजे. नाही तर ही चर्चा वेळेत पूर्ण होणार नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी मांडलेल्या मुद्याचेही उत्तर अपेक्षित आहे. आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या सर्व लक्षवेधी सूचना व अर्धा तास चर्चा आपण पुढे ढकलत आहोत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, प्रस्तावावरील चर्चेसाठी कोणत्या पक्षाला किती वेळ दिलेला आहे, हे आम्हाला कळले तर आम्ही त्याप्रमाणे नियोजन करु.

**सभापती** : मी आपल्याला दोन मिनिटात माहिती देतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेच्या माध्यमातून राज्यातील अतिशय गंभीर विषयावर चर्चा होणार आहे. संपूर्ण राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. मागील वर्षी दुष्काळाबाबत सभागृहात चर्चा झालेली आहे. मागील एका वर्षाच्या काळात शासनाने ज्या पद्धतीने दुष्काळाकडे दुर्लक्ष केले त्या पद्धतीने आजच्या विरोधी पक्षाच्या प्रस्तावाकडे देखील सरकार दुर्लक्ष करीत आहे. खरेतर ही चर्चा सुरु होत असताना मुख्यमंत्री महोदयांनी किंवा सभागृहाच्या नेत्यांनी सभागृहात उपस्थित असावयास पाहिजे. सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चा सुरु करण्यापूर्वी माझी आपल्याला विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित नसले तरी कमीत कमी सभागृहाच्या नेत्यांनी तरी सभागृहात उपस्थित असावयास पाहिजे. माननीय सभागृह नेत्यांकडे महसूल आणि मदत व पुनर्वसन विभाग आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांचे एका गंभीर विषयावर भाषण होणार आहे याची आम्हाला जाणीव आहे. मी आणि माननीय राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. विधान सभेत दुष्काळाच्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. माननीय सभागृह नेते विधान सभेत आहेत. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्याची नोंद घेऊन माननीय सभागृह नेते किंवा माननीय मुख्यमंत्री प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देतील.

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहाच्या काही प्रथा, परंपरा आहेत. हा प्रस्ताव माझा एकट्याचा नाही. हा दुष्काळ राज्यातील जनतेचा आहे. दुष्काळाची कारणे काहीही असतील, परंतु सर्वात मोठे कारण निसर्गाचे आहे. सभागृहात दुष्काळाच्या प्रस्तावावर चर्चा होत असताना सभागृहाचे नेते सभागृहात उपस्थित नाहीत. माननीय सभागृह नेते विधान सभेत आहेत. माननीय मुख्यमंत्री विधान सभेत उपस्थित आहेत.

..K-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

या सभागृहाला काही महत्व नाही काय ? सभापती महोदय, अतिशय गंभीर विषयावर चर्चा होत असताना मुख्यमंत्री महोदय किंवा सभागृहाच्या नेत्यांनी सभागृहात उपस्थित रहावे असे आपण सरकारला निर्देश द्यावेत.

**सभापती** : मी संसदीय कामकाज मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी मंत्री महोदयांना निरोप द्यावा व मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित रहावे. आपण चर्चेला सुरुवात करावी.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, नियम 260 अन्वये दुष्काळाच्या प्रस्तावावर किमान विरोधी पक्ष नेते बोलत असताना तरी सभागृहाच्या नेत्यांनी किंवा मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित राहायला पाहिजे.

सभापती : ठीक आहे, यासंदर्भात मी मंत्री महोदयांना निदेश दिले आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियम 260 अन्वये दुष्काळाचा प्रस्ताव दिलेला आहे त्यामध्ये सात ते आठ विषयांचा समावेश आहे, त्या विषयावर चर्चा होणार आहे, त्यामुळे त्या खात्याचे मंत्री किंवा राज्यमंत्री सभागृहात उपस्थित पाहिजेत. कृषी खात्याचे राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. सभागृहात राज्यातील दुष्काळावर चर्चा होणार असताना शासनाला व सभागृहाला दुष्काळाचे गांभीर्य नाही. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची ती चेष्टा होईल. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर आपण या बाजूला असताना सभागृहात मंत्री नसतील तेव्हा आपण बोलत होता.

सभापती महोदय, गेल्या तीन चार महिन्यापासून मी दुष्काळी भागात स्वतः काम करीत आहे, एका दिवसात मी 100 गावांना भेटी दिलेल्या आहेत, याबाबत मी भाषण करतांना बोलणार आहे. मंत्री महोदय उपस्थित नसताना सभागृहात चर्चा करणे बरोबर होणार नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी.

**सभापती** : मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, सभागृहात किमान राज्यमंत्री महोदयांनी तरी उपस्थित रहावे. आता मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.31 पासून 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

या नंतर सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सदनात संबंधित खात्याचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

**सभापती** : सदनात कृषी मंत्री उपस्थित आहेत. नियम 260 अन्वये असलेल्या प्रस्तावाला एकूण 2 तास 40 मिनिटांची वेळ देण्यात आली आहे. सदर प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी सत्ताधारी पक्षाला 36 मिनिटे आणि विरोधी पक्षाला 76 मिनिटे दिलेली आहेत.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये दुष्काळावर बोलण्यासाठी संधी दिली पाहिजे, अशी चर्चा झाली होती. या प्रस्तावावर 2 दिवस चर्चा झाली पाहिजे. माननीय विरोधी पक्षनेते एक ते दीड तास भाषण करतील असे मला वाटते. त्यांनी आपले भाषण 15 मिनिटांमध्ये संपवल्यास माझे काही म्हणणे नाही. या प्रस्तावावर सत्ताधारी पक्षाच्या अनेक सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे.

**सभापती** : या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी "नाही" म्हटलेलो नाही. परंतु आपण 2 दिवसांचा प्रश्न करु नये. या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी आज आपण 2 तास 40 मिनिटांमध्ये वाटप केले आहे. आवश्यकतेनुसार त्यात वाढ करू. या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी गटनेते /प्रतोदांनी सन्माननीय सदस्यांची नावे दिलेली आहेत, त्या व्यतिरिक्त कोणाचीही नावे स्वीकारली जाणार नाहीत. या प्रस्तावाकरिता आलेल्या सन्माननीय सदस्यांची नावे मी सदनाला वाचून दाखवितो. भारतीय जनता पक्षातर्फे श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, अनिल सोले, ना.गो. गाणार, शिवसेना पक्षातर्फे डॉ.निलम गोऱ्हे व श्री गोपीकिशन बाजोरिया, इंडियन नॅशनल कॉंग्रेस पक्षातर्फे सर्वश्री माणिकराव ठाकरे, आनंदराव पाटील, भाई जगताप, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री चंद्रकात रघुवंशी, जोगेंद्र कवाडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे रामराव वडकुते, सतीश चव्हाण, प्रभाकर घार्गे, नरेंद्र पाटील, ख्वाजा बेग, प्रकाश गजभिये, हेमंत टकले, विक्रम काळे, पुरोगामी पक्षातर्फे श्री.जयंत पाटील आणि श्री. कपिल पाटील.

आता विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.**: राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे

**मु.शी.**: राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनिल तटकरे, माणिकराव ठाकरे, जयंत पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, अमरसिंह पंडित, अमरनाथ राजूरकर, सतिश चव्हाण, जोगेन्द्र कवाडे, संदिप बाजोरिया, ॲड.रामहरी रुपनवर, अब्दुल्लाखान दुर्राणी, सुभाष झांबड, अशोक ऊर्फ भाई जगताप, आनंदराव पाटील, हरिसिंग राठोड, चंद्रकात रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.धनंजय मुंडे ( विरोधी पक्षनेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील विविध भागात यावर्षी तीव्र दुष्काळाची परिस्थिती निर्माण होणे, खरीप व रब्बी हंगामातील 16,750 पेक्षा जास्त गावांमध्ये 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी आलेली असणे, अपुऱ्या पावसामुळे संपूर्ण खरीप आणि रब्बी हंगामात शेतकऱ्यांना कोणतेही पिक न घेता येणे, खरीप, रब्बी हंगामातील पिकांच्या नुकसानीची अद्यापही भरपाई न मिळणे, पिक विम्याची रक्कम न मिळणे, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न बिकट होणे, शासनाने मात्र जनावरांच्या छावण्या बंद करण्याचा निर्णय घेणे, दुष्काळाच्या यादीत समाविष्ट झालेल्या 12 हजाराहून अधिक गावांना एनडीआरएफच्या निकषानुसार मदतीतून वगळणे, या गावांना राज्य सरकारकडूनही मदत न मिळणे, हाताला काम नसल्याने दुष्काळग्रस्त भागातील जनतेचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत असणे, कर्जबाजारीपणा दुष्काळ, अतिवृष्टी यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ होणे, मागील 15 वर्षात सर्वाधिक आत्महत्या सन 2015 या वर्षात होणे, एकाच वर्षात 3,228 हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, आत्महत्यांची न्यायालयाने दखल घेऊन त्या थांबविण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश देऊनही उपाययोजना न होणे, शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी कर्जमाफी हा एक ठोस पर्याय असतांनाही त्याबाबत निर्णय न घेण्यात येणे, सावकारांकडील कर्जमाफीचा लाभ शेतकऱ्यांना न मिळता सावकारांनाच होत असणे, कोरड्या

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

दुष्काळासोबतच पिण्याच्या पाण्याचीही तीव्र टंचाई निर्माण होणे, ग्रामीण भागासोबतच शहरी भागातही पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, लातूरसह अनेक मोठ्या शहरांमध्ये पाण्यासाठी उद्रेक होण्याची भिती असणे, पाणी टंचाईचेही बळी जात असणे, पाण्याअभावी रुग्णालयातील शस्त्रक्रिया बंद पडणे, दुष्काळामुळे उद्योगधंदे बंद होणे, पाणी टंचाई असतांना बाटलीबंद पाण्याचा गोरखधंदा मात्र जोरात चालू असणे, दुष्काळग्रस्त शेतकरी आणि जनतेला मंत्रीमंडळाच्या मराठवाडा दौऱ्यामध्येही कसलाही दिलासा न मिळणे, दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क, परिक्षा शुल्क माफीचा लाभ न मिळाल्याने त्यांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होणे, शेतकऱ्यांसाठीची मागेल त्याला शेततळे ही योजना फसवी असणे, मागणी असूनही मजूरांना काम न मिळणे, मजूरांच्या स्थलांतराच्या गंभीर प्रश्न निर्माण होणे, माहे फेब्रुवारी, मार्च महिन्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे शेतकऱ्यांच्या अनेक पिकांचे, फळबागांचे नुकसान होणे, या नुकसानीचे पंचनामे व मदत न मिळणे, शेतकऱ्यांना या दुष्काळी परिस्थितीत सर्वंकष मदत व कर्ज माफी करण्याची मागणी सातत्याने होत असणे, मात्र त्याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे, त्यामुळे शासनाविरुध्द निर्माण झालेला तीव्र संताप व पसरलेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, सन 2014 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये राज्यात सत्तांतर झाले. नव्याने सत्तेवर आलेले सरकार डिसेंबर, 2014 च्या हिवाळी अधिवेशनापासून ते 2016 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंत दुष्काळाची चर्चा करीत आहे. डिसेंबर, 2014 च्या हिवाळी अधिवेशनात, 2015 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात, 2015 च्या पावसाळी अधिवेशनात तसेच 2015 च्या हिवाळी अधिवेशनात दुष्काळावर चर्चा झाली. आता 2016 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दुष्काळावर चर्चा होत आहे. याचा अर्थ असा आहे की, राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि खानदेशातील काही भाग म्हणजे एकंदरीत संपूर्ण राज्यावर नैसर्गिक संकट आले आहे. यामुळे दुष्काळाला सामोरे जावे लागते. राज्याने यापूर्वी असंख्य दुष्काळ पाहिले आहे. सध्या राज्यात पडलेला दुष्काळ 1972 साली पडलेल्या दुष्काळापेक्षा गंभीर आहे.

यानंतर M-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे......

दुष्काळ ही कोणत्याही सत्ताधारी पक्षाला किंवा त्या त्या काळातील विरोधी पक्षाला किंवा समाजकारण करणाऱ्या राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांना शोभणारी गोष्ट नाही. परंतु हे नैसर्गिक संकट आहे. यापूर्वीच्या दुष्काळात आणि आताच्या दुष्काळात नेमका फरक काय आहे? आताचा दुष्काळ हा निसर्गाच्या अवकृपेमुळे निर्माण झाला आहे. यापूर्वी जेव्हा जेव्हा दुष्काळ पडला त्या दुष्काळामुळे तत्कालीन राज्यकर्त्यांमध्ये इच्छाशक्तीचा सुकाळ होता. त्यामुळे त्या दुष्काळी परिस्थितीला चांगल्याप्रकारे तोंड देता आले. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत राज्यकर्त्यांमध्ये इच्छाशक्तीचाही दुष्काळ पडावा यासारखे महाराष्ट्राच्या दुष्काळी भागातील जनतेसमोर दुसरे दुर्दैव नाही.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 5 मार्च, 2016 रोजी एक महत्वपूर्ण निर्णय घेतला. राज्य मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांना सांगण्यात आले की, ज्या जिल्हयांमध्ये, तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आहे त्या ठिकाणी जाऊन पाहणी करावी व त्याबाबतचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सादर करावा. त्या अहवालाच्या आधारे त्या दुष्काळी भागासाठी यथोचित मदत जाहीर केली जाईल, अशी अपेक्षा होती. सभापती महोदय, मी जे बोलत आहे ते सत्ताधारी पक्षातील माननीय सदस्यांनी प्रामाणिकपणे ऐकून घ्यावे अशी माझी विनंती आहे. मी कोणावर आरोप करु इच्छित नाही. राज्यकर्त्यांमध्ये इच्छाशक्तीचा दुष्काळ आहे असे मी म्हणतो त्यामागे एक कारण आहे. यापूर्वी जेव्हा जेव्हा राज्य दुष्काळाला सामोरे गेले आणि ज्यावेळी टंचाईसदृश परिस्थिती जाहीर केली गेली त्यानंतर किमान एका महिन्यात दुष्काळी भागातील जिल्हयाच्या पालकमंत्र्यांनी टंचाईसंबंधी बैठक घेऊन कितपत पाणी साठा उपलब्ध आहे, उद्या कोणत्या गावातील पाणी पुरवठा बंद होणार आहे, कोणत्या तलावात किती पाणी शिल्लक आहे, त्या तलावातून येणाऱ्या काळात किती पाणी उपलब्ध होणार आहे, चाऱ्याची परिस्थिती काय आहे, किती दिवस जिल्हयाला चारा पुरणार आहे, एखाद्या तालुक्यामध्ये पर्जन्यमान कमी झाले असेल तर तेथील चाऱ्याची व्यवस्था कशी केली जाणार आहे, दुष्काळामुळे शेतकरी व शेतमजुरांच्या हाताला कसे काम उपलब्ध करुन दिले जाणार आहे याचा आढावा घेतला होता. राज्यातील राज्यकर्त्यांनी मागील आठ महिन्यांच्या काळात टंचाईसंबंधी दुष्काळी भागातील जिल्हयात जाऊन एकही बैठक घेतली नाही. ही राज्यकर्त्यांची दुष्काळाकडे पाहण्याची दृष्टी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.......

सभापती महोदय, ही दुष्काळी परिस्थिती तुमच्या आमच्यामुळे निर्माण झालेली नसून निसर्गाच्या अवकृपेमुळे निर्माण झालेली आहे. राज्यावर आलेले हे संकट सरकार संधीमध्ये बदलू शकत होते. परंतु राज्य सरकारने या संकटामुळे स्वत:वरच संकट ओढवून घेतले आहे. दुष्काळी भागातील जनतेच्या मनामध्ये स्थान निर्माण करण्याची राज्य सरकारला फार मोठी संधी होती. विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अगोदर तुम्ही जनतेला जो विश्वास दिला होता तो विश्वास सार्थ करण्याची तुम्हाला संधी मिळाली होती.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी पालकमंत्री या नात्याने माझ्या जिल्हयात दुष्काळासंबंधी दोन बैठका घेतल्या, त्या बैठकीचे मिनिट्स मी अर्ध्यातासात सभागृहाला सादर करु शकतो.

श्री.सुनील तटकरे : बैठक घेऊन काय केले?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : संपूर्ण राज्याचा विषय उपस्थित केला गेला म्हणून मी बोललो. माझ्या जिल्हयात पालकमंत्री म्हणून मी दोन बैठका घेतल्या आहेत.

**सभापती** : मंत्री महोदयांना योग्य वेळी खुलासा करता येईल.

श्री.धनंजय मुंडे : मंत्री महोदयांनी जे भाष्य केले ते रेकॉर्डवर घ्यायला माझी हरकत नाही. मंत्री महोदय जर बैठकीचे मिनिट्स सभागृहाला सादर करणार असतील तर सर्वच मंत्र्यांनी घेतलेल्या बैठकीचे मिनिट्स आजच्या आज पटलावर ठेवावे, ते उद्या तयार करुन ठेवू नये.

सभापती महोदय, मंत्री महोदयांकडे जशी माहिती आहे तशी माझ्याकडेही माहिती उपलब्ध आहे. ज्यांनी बैठका घेतल्या त्यांनी जरुर घेतल्या आहेत. बैठक घेतली की नाही हा विषय महत्वाचा नाही. राज्यकर्त्यांच्या इच्छाशक्तीबाबत मी बोलत होतो. राज्यकर्त्यांमध्ये इच्छाशक्तीचा दुष्काळ आहे. त्याला मंत्री महोदयांनी पुष्टी दिली त्याबद्दल मी सत्ताधाऱ्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, मागील वर्षी राज्यात पर्जन्यमान अतिशय कमी झाले आहे. आपल्याला आठवत असेल की, याच सभागृहात मागील वर्षी पावसाळी अधिवेशन सुरु असताना ढगातून पाऊस पडत नव्हता. परंतु अधिवेशनाचा उल्लेख मात्र 'पावसाळी अधिवेशन' असा होत होता. खरीप पेरण्यापूर्वी राज्यात थोडासा पाऊस झाला, त्यामुळे राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

10-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M.3

SGB/ AKN/ KTG/ 14:50

श्री.धनंजय मुंडे.......

शेतकऱ्यांचे नशीब दुर्दैवी ठरले. पेरण्या केल्यानंतर 40 दिवस पावसाने उघडीप दिली. त्यामुळे काळ्या मातीत शेतकऱ्यांनी जे पेरले होते ते उगवायचा प्रश्न आला नाही. जे बियाणे पेरले होते ते उन्हामुळे करपून गेले. त्याच काळात आम्ही या सभागृहात सरकारला विनंती करीत होतो की, दुबार पेरणी करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत करावी. त्यावेळी दुबार पेरणी करण्याची वेळ निघून गेली होती. सरकारने 1500 रुपये प्रती हेक्टर मदत करण्याचा निर्णय घेतला. दुष्काळाकडे पाहण्याचा या सरकारचा दृष्टीकोन कसा असावा? दुबार पेरणीसाठी 1500 रुपये मदत मिळालेला एक शेतकरी दाखविला तरी मी सरकार सांगेल ती शिक्षा भोगावयास तयार आहे. पाऊस पडला नाही यात तुमचा, आमचा किंवा शेतकऱ्यांचाही दोष नव्हता. परंतु ज्या ज्यावेळी महाराष्ट्रात नैसर्गिक आपत्ती आली त्या त्यावेळी तत्कालीन राज्यकर्त्यांनी आपल्यापुढे आदर्श ठेवला आहे. लाखाचा पोशिंदा अडचणीत आला त्या त्यावेळी राज्यकर्त्यांनी आपले कोठार लाखाच्या पोशिंद्यासाठी उघडे केले. परंतु यंदाच्या दुष्काळात तसे घडले नाही.

सभापती महोदय, दुबार पेरणी ऐवजी काही शेतकऱ्यांनी तिबार पेरणी केली. परंतु पर्जन्यमान कमी झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती पीक लागले नाही. पावसाअभावी शेतकऱ्यांच्या जमिनीचे नुकसान झाले. मराठवाड्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. मागील वर्षी ऐन पावसाळ्यात मराठवाड्यातील ग्रामीण भागात टँकरने पाणी पुरवठा सुरु करावा लागला. भर पावसाळ्यात लातूरसारख्या शहरात 20-22 दिवस पाणी नव्हते. त्या काळात दुष्काळाबाबत नियोजन झाले असते तर कदाचित यंदाच्या दुष्काळाच्या काळात 3228 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्यातील काही आत्महत्या सरकार रोखू शकले असते असे माझे मत आहे.

नंतर एन.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

शेतकऱ्यांनी आत्महत्या का केल्या याचे एकच उदाहरण मी आपल्याला देतो. हे उदाहरण कोणालाही शोभणारे नाही. तशी माझी मानसिकता देखील नाही. आमच्या तडोळी गावात श्री.सातभाई नावाच्या एका शेतकऱ्याची साडेसात एकर जमीन आहे. या शेतकऱ्याने खरीपाची पेरणी केली. शेतकऱ्याचे जीवन कसे आहे, दुष्काळाची दाहकता किती आहे हे मी सांगत असताना काही माननीय मंत्री सभागृहात झोपत आहेत. असे असेल तर कसे व्हायचे ? त्या शेतकऱ्याने खरीपाची पेरणी केली. शेतकरी आपल्या प्रपंचाचे नियोजन कसे करतो हे मी सांगणार आहे. त्याच्या घरात लग्नाच्या मुली होत्या. खरीपाची पेरणी करताना पाऊस बरा झाला आहे असे त्याला वाटले. त्यामुळे त्या शेतकऱ्याने पाच एकर जमिनीवर सोयाबीन व अडीच एकर जमिनीवर कापूस पेरला. त्या सोयाबीन, कापसावर अंदाजित किंमत ठरवून श्री.सातभाई यांनी पेरणी झाल्यानंतर आपल्या दोन मुलींची लग्ने जमविली. पेरणी झाल्यानंतर पाऊस आला. त्याने सुपारी फुटली. 29 डिसेंबर तारीख काढली. पण खरीपाचे पीक आले नाही. त्यामुळे इकडून तिकडून व्याजावर पैसे घेऊन कसे तरी आपल्या मुलीचे लग्न लावावे असे त्याला वाटले. खरीपात जी परिस्थिती झाली तीच परिस्थिती रब्बीमध्ये झाली. तो पैशाची जमवाजमव करू शकला नाही. लग्नाची 29 तारीख जवळ आली. आठ दिवसावर लग्न आले. श्री.सातभाई यांना आठ दिवसांमध्ये पैशाची जमवाजमव करता येत नव्हती. मुलीचे लग्न कसे करायचे या विवंचनेत त्यांनी स्वतःला गळफास लावून आत्महत्या केली. या शेतकऱ्याची आत्महत्या नापिकीमुळे झाली नाही का ? साडेसात एकर जमीन असणाऱ्या शेतकऱ्याला त्या काळात थोडीशी भरीव मदत केली असती तर त्याला निश्चितच आधार मिळाला असता. पाऊस पडला नाही. त्याने जे पेरले ते उगवले नाही. अशा काळात आपण एकरी 15 हजार रूपये मदत सरकारने केली असती तर श्री.सातभाई नावाच्या शेतकऱ्याच्या खिशात दोन मुलींची लग्न करण्यासाठी पैसे आले असते. त्याला कोणा समोर हात पसरावे लागले नसते. हात पसरविताना कोणी पैसे दिले नाहीत म्हणून आपण आपल्या मुलीचे लग्न करू शकत नाही हा विचार त्याच्या मनात आला आणि त्याने आपली जीवन यात्रा संपविली. आम्ही आमच्या तालुक्यातील

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.धनंजय मुंडे...

सर्वपक्षीय लोकांनी एकत्र येऊन त्या दोन्ही मुलींची ज्या दिवशी लग्न ठरले होते त्या दिवशी म्हणजे दिनांक 29 डिसेंबर रोजी लग्न लावून दिले. हा आमचा मोठेपणा सांगत नाही. मी हे उदाहरण अशासाठी सांगितले की, याला कुठे तरी जबाबदार सरकार आहे. आपण त्यावेळी आपले कोठार रिकामे केले असते तर श्री.सातभाई सारख्या जेवढ्या म्हणून शेतकऱ्यांनी आपल्या प्रपंचासाठी आत्महत्या केल्या आहेत त्या आपण थांबवू शकलो असतो. ही दाहकता आहे.

सभापती महोदय, गेवराईमध्ये पाणी टंचाईमुळे एक 14 वर्षाची मुलगी विहिरीवर पाणी आणण्यासाठी गेली. सरकारचे नियोजन कसे आहे ते मी सांगतो. एकीकडे आपण दुष्काळाची दाहकता बघावी. गावापासून 4 कि.मी.अंतरावर विहीर अधिग्रहीत करण्यात आली होती. त्या विहिरीतील पाणी काढण्यासाठी मागासवर्गीयाची 14 वर्षाची मुलगी गेली. विहिरीतील पाणी शेंदत असताना तिचा पाण्यासाठी मृत्यू झाला. याला मला सरकारला जबाबदार धरावयाचे नाही. पण सरकारच्या एका नियोजनाला आम्ही जबाबदार धरू शकतो. अशा दुष्काळाच्या परिस्थितीच्या वेळी टँकरची व्यवस्था करायची नाही. टँकरला पैसे जास्त लागतात म्हणून चार कि.मी.वर असणाऱ्या विहिरीत पाणी असल्यामुळे ते घ्यावे असे सांगितले गेले. तहसीलदार आणि बीडीओ यांनी पाहणी करून सांगायचे की जा चार कि.मी.वरून पाणी आणा. हे दुष्काळाच्या काळातील पाण्याच्या पाण्याचे नियोजन आहे.

सभापती महोदय, माझ्या जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यात 135 गावे आहेत. आज तेथे पिण्याच्या पाण्याची परिस्थिती कशी आहे ? आमच्या बीड जिल्ह्यामध्ये 11 तालुके आहेत. त्यातील पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या क्रमांकाचे जे सधन तालुके आहेत त्यातील दुसऱ्या क्रमांकावर अंबाजोगाई तालुका आहे. त्या सधन तालुक्याची आज अशी परिस्थिती आहे. त्या 135 गावात टँकर, बोअरने, अधिग्रहीत विहिरीतून पाणी सुरू आहे. येणाऱ्या आठ ते दहा दिवसांमध्ये ते पाणी संपणार आहे. सबंध तालुक्यातील एकाही तलावामध्ये, विहिरीला, बोअरला पाणी नाही. 20

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

खेड्यांना पाणी पुरवठा करणारी एक जुनी योजना आहे. त्याचा एक आऊटपोस्ट एका गावात आला आहे. उद्या त्या एका आऊटपोस्टवरून 135 गावांना पाणी द्यावे लागणार आहे. याचे नियोजन कोणी करायचे ? हे पाण्याचे संकट आपण आणलेले नाही. आम्ही आणलेले नाही. हे संकट पाऊस न पडल्यामुळे निर्माण झाले आहे. हे सलग चौथे वर्ष आहे. आज शेतकरी सरकारकडे हात का पसरवित आहे ? शेतकऱ्याने कष्टाने आपल्या शेतात पेरणी केली. पण पाऊस आला नाही. जेथे थोडाफार पाऊस आला तेथे थोडा कापूस आला, सोयाबीन आले. एकीकडे निसर्गाच्या माऱ्यातून काही तरी पिकविले. मागच्या दोन वर्षी कापसाला भाव होता तो या वर्षी मिळाला का ? मागच्या दोन वर्षी शेतकऱ्याच्या कापसाला जे एकरी उत्पादन मिळाले ते यावर्षी मिळाले काय ? मागच्या दोन वर्षी सोयाबीनचे एकरी उत्पन्न मिळत होते ते शेतकऱ्याला मिळाले आहे काय ? त्याला उत्पन्न देखील मिळाले नाही आणि भावही मिळाला नाही. त्यामुळे मायबाप सरकारकडे शेतकरी आज हात पसरवित आहे की, बाबांनो कर्ज माफ करावे. राणा भीम देवी थाटात सरकारने डिसेंबरच्या अधिवेशनात व मधल्या अधिवेशनात निर्णय घेतला की, आम्ही कर्जाचे पुनर्गठन करीत आहोत. हे मी जबाबदारीपूर्वक सांगत आहे. मला या सरकारच्या प्रामाणिक इच्छेबद्दल कोणताच आरोप करावयाचा नाही. पण ज्यावेळी सरकारने पुनर्गठनाचा विषय काढला, निर्णय घेतला तेव्हा कुठल्याही एका माननीय मंत्र्यांनी जिल्ह्यामध्ये जाऊन किती शेतकऱ्यांचे किती राष्ट्रीय कृत बँकांनी कर्जाचे पुनर्गठन केले आहे हे पाहिले आहे काय ? कदाचित आपण माझ्या या म्हणण्याशी सहमत व्हाल. कर्जाचे पुनर्गठन झाले नाही म्हणून शेतकऱ्याला कर्जही मिळाले नाही. त्याच्या हातात काही नाही. सोनेनाणे एकत्र करून त्याने कशीबशी खरीपाची पेरणी केली. निसर्गाच्या संकटात त्यांनी मायबाप सरकारकडे हात पसरवून कर्ज माफीचा विषय काढला आणि ती सामान्य शेतकऱ्यांची भावना आम्ही रस्त्यावर उतरवून व्यक्त केली तर यात कुठलेही राजकारण करण्याचे कारण नाही. आम्ही मागणी केली म्हणून कर्ज माफी द्यायची नाही ? आपण ज्यावेळी मागणी केली त्यावेळी आम्ही द्यायचे. आपण विरोधी पक्षात असताना त्यावेळी कापसाला साडेसहा हजार प्रति क्विंटल भाव मिळाला पाहिजे अशी मागणी केली होती. मग आज आम्ही तेच मिळत नाही हे म्हणत आहोत.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

त्यात आमचे राजकारण आहे ? हा प्रसंग फार बाका आहे. अजूनही आपल्याकडे चार महिने आहेत. हे चार महिने सर्वात भयंकर संकटाचे आहेत. आजही आमच्या गावाकडचे नाव काढले की आमच्या पोटात गोळा येतो. आज गावागावातील परिस्थिती गंभीर आहे. लग्न झालेले तरूण तर गावातच राहिलेले नाहीत. आज गावात जे काही आहेत ते म्हातारेकोतारे आहेत. त्यांच्या गावांना टँकर देणे हे आपल्या हातामध्ये असताना सुद्धा 4 कि.मी.अंतरावरील विहीर आपण अधिग्रहीत केली. 5 कि.मी.वरील बोअर अधिग्रहीत केली. त्या म्हाताऱ्याकोताऱ्यांना कमरेवरून, डोक्यावरून आपल्या नियोजनामुळे पाणी आणावे लागत आहे.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

ही सरकारची जबाबदारी आहे असे आम्ही सांगायचे नाही काय, सरकारवर आक्षेप घ्यायचा नाही काय ?

सभापती महोदय, ऑगस्ट महिन्यात चारा छावण्या सुरु करण्यात आल्या, आम्ही त्याचे स्वागत केले. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी मराठवाड्याचा आणि सर्व जिल्ह्यांचा दौरा केला आणि भविष्यात कोणती परिस्थिती उद्भवणार आहे आणि त्यावर कोणत्या गोष्टींचे नियोजन करावे या संदर्भातील निवेदन माननीय मुख्यमंत्र्यांकडे दिले होते. ही जून महिन्यातील घटना आहे. त्यावेळी सरकारने तीन जिल्ह्यांमध्ये चारा छावण्या सुरु करण्याचा निर्णय घेतला. आम्ही त्या निर्णयाचे स्वागत केले.त्यास विरोध केला नाही. त्या छावण्या कोणाला मिळाव्यात याचाही आमचा काही विषय नाही. परंतु सरकारचे काय चालले आहे हे मला कळत नाही. राज्यातील जनता मूर्ख आहे, राज्यातील जनतेला काही कळत नाही, असे सरकारला वाटते काय ? चारा छावण्या व्यवस्थित सुरु असताना आणि चाऱ्याची आवश्यकता असताना मराठवाड्यातील दोन जिल्हाधिकाऱ्यांनी चारा उपलब्ध आहे असे सांगितले. परंतु मराठवाड्यातील 70 भागात पेरा झ ाालेला नाही हे आपणास सातबारा उताऱ्यावर दिसेल. असे असताना त्या ठिकाणी हवेतून चारा आला का ? सरकारने जिल्हाधिकाऱ्यांचे म्हणणे ग्राह्य धरुन चारा छावण्या बंद करण्याचा निर्णय घेतला. चारा छावण्या बंद केल्यामुळे आम्ही आक्रमक झालो. आपण चाऱ्यावर आक्रमक होता तसे कर्जमुक्तीवर आक्रमक व्हावे. सरकारने पंधरा दिवसांपूर्वी चारा छावण्या बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मंत्र्यांची बैठक झाली. मंत्री तालुक्याच्या ठिकाणी भेटी देण्यासाठी गेले. प्रत्येक मंत्री महोदयांच्या तालुक्यांच्या दौऱ्यावर मी लक्ष ठेवून होतो. माननीय मंत्री श्री.गिरीष बापट हे कोणत्या तालुक्याला भेट देण्यासाठी जातील याची मी वाट पाहत होतो. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे अंबेजोगाई येथे गेले होते. त्यांनी त्या तालुक्याची अतिशय चांगल्या पद्धतीने पाहणी केली. श्री.दिवाकर रावते साहेब, मी आपल्या सोबत होतो काय ? अंबेजोगाई तालुका टंचाईग्रस्त असताना तेथे एकही छावणी कशी दिसत नाही हे त्यांच्या लक्षात आले. फक्त वरवठी येथे ऑगस्टपूर्वी छावणी सुरु झाली होती. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी चारा छावणीबाबत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

प्रशासनाला विचारले असता, आमच्याकडे प्रस्तावच आलेले नाहीत असे प्रशासनाने सांगितले. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी माझ्या म्हणण्याला होकार दिलाच पाहिजे असा माझा आग्रह नाही. परंतु त्याच तालुक्यातील 26 प्रस्ताव प्रशासनाकडे प्रलंबित आहेत. सरकारने सर्व गुराढोरांची जबाबदारी घेतली असल्यामुळे दुष्काळ असला काय किंवा नसला काय याच्याशी काही देणे घेणे नाही. कारण या संदर्भात सरकारने कायदे केलेले आहेत. दुष्काळामध्ये छावण्यांची मागणी केली असताना, तसे प्रस्ताव आले नाहीत असे सांगण्याची अधिकाऱ्यांची हिम्मत कशी होते ? आमचे प्रस्ताव आहेत असे लोकांनी सांगितल्यानंतर आमच्याकडे प्रस्ताव आहेत असे प्रशासनाला सांगावे लागले. सरकारचे दुष्काळाबाबतचे असे नियोजन आहे काय, ही सरकारची दुष्काळाकडे पाहण्याची दृष्टी आहे काय ? हे राजकारण नाही. हे विरोधी पक्षाचे काम आहे. सरकारकडून चुका होत असतील तर त्या चुका दाखवून देणे आमचे कर्तव्य आहे.

सभापती महोदय, चारा छावण्याचा विषय निघाला आहे म्हणून सांगतो. लातूरमध्ये फार तुरळक छावण्या आहेत. परंतु बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये भयानक परिस्थिती आहे. मी आपणास एक उदाहरण सांगतो. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये लहानमोठी अशी एकूण 7 लाख 37 हजार 337 इतके पशुधन आहे. ही आकडेवारी सन 2012 मधील आहे. त्यानंतरच्या वर्षातील आकडेवारी माझ्याकडे नाही. त्यापैकी 82 हजार 309 जनावरांसाठी चारा छावण्यांची परवानगी दिलेली आहे. या ठिकाणी माननीय मंत्री डॉ.दीपक सांवत उपस्थित आहेत. मी त्यांना आपल्यामार्फत विचारु इच्छितो की,आजही उस्मानाबाद जिल्ह्यात चारा छावण्यांसाठी मागण्या आहेत की नाहीत हे त्यांनी सांगावे. त्या ठिकाणी जनावरांना चारा नसल्यामुळे चारा छावण्यांची मागणी आहे. तरी सुद्धा प्रशासन तेथे चारा छावण्या देत नाही.

डॉ.दीपक सांवत : सभापती महोदय, चारा छावण्यांची मागणी आहे हे बरोबर आहे. परंतु भूम आणि परांडा या तालुक्यांमध्ये निम्मे पशुधन असल्यामुळे त्या ठिकाणी सर्वात जास्त चारा छावण्या आहेत. तुळजापूर तालुक्यातून चारा छावण्यांची मागणी नाही. त्या तालुक्यातून फक्त एकच मागणी आली होती. कळम, वाशिममधून मागणी आली होती. धाराशीव येथून दोनच चारा छावण्यांच्या मागण्या आल्या. अजूनही भूम आणि परांडा येथे 13-14 चारा छावण्यांच्या मागण्या आहेत हे बरोबर आहे.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, कदाचित भूम आणि परांडा उस्मानाबाद जिल्ह्यात येतात. प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांना तालुकानिहाय माहिती पाहिजे असेल तर ती माहिती मी आपल्या परवानगीने पटलावर ठेवण्यास तयार आहे. किती तालुक्यांमध्ये किती छावण्यांची मागणी आहे, किती दिवसांपूर्वीची मागणी आहे, छावणी का देण्यात आली नाही. या विषयामध्ये मला जायचे नाही. या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्री डॉ.दीपक सावंत यांच्यासोबत माझी चर्चा झालेली आहे. त्यांनी एक गोष्ट मान्य केली की, या दोन तालुक्यांमध्ये सर्वाधिक पशुधन आहे आणि त्याच तालुक्यांमध्ये छावण्यांची मागणी आहे. काही ठिकाणी छावण्यांची मागणी असताना ती प्रकरणे प्रलंबित आहेत. मी जे बोललो ते खरे झाले. राज्य सरकारने या चारा छावण्या बंद करण्याचे कारण काय ? उस्मानाबाद जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी रब्बीमध्ये 3 लाख मेट्रीक टन चारा उपलब्ध झाला असे सरकारला सांगितले असेल आणि त्यानंतर पंधरा दिवसांनी माननीय मुख्यमंत्र्यांना मराठवाड्यामध्ये चारा उपलब्ध नाही, शेजारच्या पश्चिम महाराष्ट्रामध्ये चारा उपलब्ध नाही, तेव्हा कोकणातून चारा आणू असे सांगावे लागले. जर जिल्हाधिकारी दुष्काळाच्या परिस्थितीबाबत सरकारला चुकीची माहिती देत असतील तर त्याबाबत सरकार गांभीर्याने विचार करणार की नाही ? जिल्हाधिकाऱ्यांच्या विरोधात सरकार काही कारवाई करणार की नाही ? ज्या जिल्हाधिकाऱ्यांनी पंधरा दिवसांपूर्वी चारा उपलब्ध आहे असे सांगितले आणि त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांना कोकणातून चारा आणावा लागेल असे सांगावे लागत असेल तर ती गंभीर बाब आहे. आपले दुष्काळाच्या बाबतीतील असे नियोजन आहे काय ?

सभापती महोदय, या सरकारला कोणते नाव द्यावे याचा मी विचार करीत आहे. या सरकारला युतीचे सरकार म्हणावे, संघाचे सरकार म्हणावे, भाजप प्रणित सरकार म्हणावे, गोलमाल सरकार म्हणावे, जग्लरी सरकार म्हणावे, अशी ही बनवाबनवी म्हणावे की अशी ही फसवाफसवी म्हणावे,

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

या ठिकाणी दुष्काळासारख्या गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. परंतु या सरकारमधील राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांची कशी फसवणूक केली हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. माननीय मंत्री श्री.गिरीष बापट साहेब, मी जे मुद्दे मांडतो त्या बाबत आपल्या सुपीक डोक्यातून हे सांगावे की, आपले सरकार नेमके कोणत्या पिक्चरच्या टायटलमध्ये बसते. आपले सरकार गोलमाल मध्ये बसते, मालामाल मध्ये बसते की अशी ही बनवाबनवी या सिनेमामध्ये बसते हे आपण ठरवावे.

सभापती महोदय, निवडणुकीपूर्वी राज्यातील आणि देशातील सत्ताधारी पक्षाने शेतकऱ्यांना विश्वास दिला होता की, त्यांना उत्पादन खर्चाच्या वर 50 टक्के भाव देण्यात येईल. परंतु हिवाळी अधिवेशनात केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात एका रीट पिटीशनमध्ये ॲफेडेव्हिट सादर केले की, शेतकऱ्यांच्या शेती मालाला अशाप्रकारे 50 टक्क्याच्या वर भाव देता येणार नाही. महोदय, या सरकारने शेतकऱ्यांची ही फसवणूक केली नाही काय, ही त्यांची बनवा बनवी नाही काय, हा शेतकऱ्यांसोबत केलेला गोलमालपणा नाही काय, ही शेतकऱ्यांसोबत केलेली झूठी बात नाही काय ?

सभापती महोदय, मागच्या वर्षी म्हणजे दि.28 जून, 2015 रोजी माननीय कृषी मंत्र्यांनी बी.टी.कापसाचा दर कमी केल्याचे जाहीर केले. मात्र दुर्दैवाने आमच्या शेतकरी बांधवांनी त्यांच्या शेतामध्ये जून पूर्वीच पेरणी केली हाेती. परंतु या सरकारकडून मात्र जून महिन्यात बी.टी. कापसाचे दर कमी करण्यात आल्याचे सांगण्यात आले. मी विचारु इच्छितो की, या सरकारमध्ये काय चालले आहे ? अशी ही बनवा बनवी या सिनेमामध्ये अशोक सराफ याने दाढी लावून शरद तळवळकर यांना जशा प्रकारे फसविले होते तशा प्रकारे या सरकारने शेतकऱ्यांना फसविले आहे.

महोदय, या सरकारच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या घोषणा करण्यात आल्या. काल सुध्दा या सभागृहात माननीय मंत्र्यांनी निवेदन केले. वास्तविक पाहता नुकतेच माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाले होते. त्यामुळे इतक्या घाईघाईने निवेदन करण्याची आवश्यकता नव्हती. त्यांनी थोडा दम खायला हवा होता. काल सांगण्यात आले की, महाराष्ट्राच्या इतिहासात आमच्या सरकारने अशा प्रकारचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. महोदय, आम्हाला त्या व्यक्तीबद्दल आदर आहे. पण ते सभागृहात चुकीचे बोलले असतील, शेतकरी आणि दुष्काळाच्या बाबतीत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

चुकीचे बोलले असतील तर आम्ही विरोधी बाकावर बसलेले सदस्य ते कदापि सहन करणार नाही.

..2..



श्री.धनंजय मुंडे....

वास्तविक पाहता निवेदनावर बोलता येत नाही म्हणून आम्ही त्यावर काही बोललो नाही. परंतु कालच्या निवेदनाच्या बाबतीत आज राज्यातील सर्व वर्तमानपत्रात असे छापून आले की, रब्बी पिकांच्या बाबतीत आम्ही पहिल्यांदाच दुष्काळ जाहीर करुन ऐतिहासिक निर्णय घेऊन दाखविला आहे.

सभापती महोदय, डिसेंबर-2014 मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी 5 लाख शेतकऱ्यांचे सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करण्याची घोषणा केली होती. या सभागृहात सुध्दा सभागृह नेत्यांनी तशा प्रकारची घोषणा केली होती. आजची तारीख 10 मार्च, 2016 आहे. महोदय, मी जबाबदारीपूर्वक सांगतो. आपल्याला पुरावे पाहिजे असतील तर पुरावे सुध्दा देतो. 5 लाख शेतकऱ्यांचे सावकाराकडील कर्ज माफ करण्याची घोषणा करणाऱ्या सरकारला मी विचारु इच्छितो की, आपण 5 लाख शेतकऱ्यांचे सावकाराकडील कर्ज माफ करण्याची घोषणा केली असली तरी आज प्रत्यक्षात केवळ 16 हजार शेतकऱ्यांचेच सावकाराकडील कर्ज माफ झालेले आहे. कर्ज माफ झालेल्या 16 हजार शेतकऱ्यांची नावे सांगितली तर आपल्याला आश्चर्य वाटेल. सभापती महोदय, राज्यात गेल्या वर्षात 3,228 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. परंतु त्यामध्ये एकही शेतकरी भाटीया किंवा संचेती नावाचा नाही. कर्ज माफ करण्यात आलेल्या 16 हजार शेतकऱ्यांच्या नावाची यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. महोदय, हा योगायोग म्हणा किंवा दुर्दैव म्हणा, परंतु आत्महत्या केलेल्या 3,228 शेतकऱ्यांमध्ये एकही शेतकरी भाटीया किंवा संचेती नावाचा नाही. परंतु त्यांचे 3-3 लाख रुपयांचे कर्ज माफ झालेले आहे. मला कोणाला विरोध करावयाचा आहे असे नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की, ज्यांचे कर्ज खरोखरच माफ करण्याची आवश्यकता होती त्यांचे कर्ज माफ झाले आहे काय, हा खरा महत्त्वाचा विषय आहे. महोदय, डिसेंबर-2014 मध्ये सावकारांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते साहेब, आपण सुध्दा या निर्णयाच्या बाजूने आग्रही होता. मी सांगू इच्छितो की, कर्ज माफ करण्याची घोषणा केल्यानंतर तब्बल 9 महिने या संदर्भातील जी.आर. काढला गेला नाही, यासारखे दुसरे कोणतेही दुर्दैवं नाही. वारे वा शेतकऱ्यांचे सरकार ! वारे वा मायबाप सरकार !

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, या सरकारने सांगितले की, दुष्काळाला आपण तोंड देऊ शकत नाही, दुष्काळाला सामोरे जाऊ शकत नाही, दुष्काळ निवारणासाठी आपण कमी पडतो, आपली इच्छाशक्ती नाही. म्हणून या सरकारने पहिले पाऊल कोणते उचलले तर ते दुष्काळ दाबण्याचे होय. या सरकारकडून जाणीवपूर्वक दुष्काळ दाबण्याचा प्रयत्न केला गेला. मी या बाबतीत अनेक उदाहरणे देऊ शकतो. या सरकारने सुरुवातीला 12 हजार गावे टंचाई सदृश म्हणून जाहीर केली. वास्तविक पाहता आज सुध्दा पूर्णतः दुष्काळ जाहीर करण्यात आलेला नाही. 12 हजार गावे टंचाई सदृश जाहीर केल्यानंतर एक महिन्याच्या आत काही जिल्ह्यांमध्ये पुनर्सर्वेक्षण करण्यात आले. त्यानंतर काही हजार गावे सरकारने पुन्हा टंचाई सदृश म्हणून जाहीर केली. मी विचारु इच्छितो की, या सरकारला एक महिन्याच्या आत पुनर्सर्वेक्षण का जाहीर करावे लागले ? यामागील कारण म्हणजे या सरकारने अगोदरच्या सर्वेक्षणात जाणीवूपर्वक ती गावे दाबली होती. काही राज्यकर्त्यांच्या दबावापोटी इतर जिल्ह्यात पुनर्सर्वेक्षण केल्यानंतर ती गावे जाहीर करावी लागली. अशा प्रकारे या सरकारने दुष्काळ दाबण्याचे काम केले आहे. दुष्काळामध्ये ठिकठिकाणी छावण्या सुरु करण्याचे जाहीर केले. परंतु आज छावण्यांची मागणी असताना सुध्दा छावण्या दिल्या जात नाही. अशा प्रकारे या माध्यमातून दुष्काळ दाबण्याचा प्रयत्न या सरकारकडून सुरु आहे. ज्या गावात पाण्याच्या टँकरची आवश्यकता आहे त्या गावात जाणीवपूर्वक 4 कि.मी. अंतरावर बोअर किंवा विहीर अधिग्रहीत करण्यात येते. त्या गावातील लोकांना 4 कि.मी. अंतरावरुन पाणी आणावे लागत आहे. मी तर म्हणेन की, हे सरकार दुष्काळग्रस्त भागातील लोकांना कसल्याही प्रकारची मदत करीत नाही. एकप्रकारे या सरकारने त्यांना वाऱ्यावर सोडून दिले आहे.

सभापती महोदय, सुरुवातीला ज्यावेळी 12 हजार गावांमध्ये टंचाई सदृश परिस्थिती जाहीर केली त्यामध्ये माननीय राज्यमंत्री प्रा.राम शिंदे यांचा मतदारसंध असावयास समाविष्ट करावयास हवा होता. मुळात त्यांच्या मतदारसंघात दुष्काळ असताना सुध्दा त्यांचा मतदारसंघ दुष्काळी म्हणून जाहीर केला नाही. अशा प्रकारे या सरकारने मंत्र्यांच्या मतदारसंघातील दुष्काळ सुध्दा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दाबून टाकला.  माननीय राज्यमंत्री प्रा.राम शिंदे साहेब, मी जे सांगत आहे त्याच्याशी आपण

..4..



श्री.धनंजय मुंडे....

सहमत आहात की नाहीत ? माननीय राज्यमंत्र्यांचा मतदारसंघ दुष्काळाच्या निकषात बसत असताना सुध्दा त्यांच्या मतदारसंघाचा समावेश केला नाही.  यासाठी कोणाला जबाबदार धरायचे ?

सभापती महोदय, ज्या संकटांमुळे शेतकरी आत्महत्या करतात त्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची आकडेवारी सुध्दा सरकार माननीय उच्च न्यायालयात चुकीची देत आहे.  महोदय, किती ही फसवा फसवी करावी, किती ही बनवा बनवी करावी ? खोटे बोल पण रेटून बोल असा प्रकार या सरकारकडून सुरु आहे.

क्यू....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

डिसेंबर, 2014 च्या हिवाळी अधिवेशनात माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी 7000 कोटी रूपयांचे पॅकेज घोषित केले. 7000 कोटी रूपयांपैकी प्रत्यक्षात फक्त 3800 कोटी रूपये उपलब्ध करण्यात आले, उर्वरित रकमेचे काय झाले याबाबत सभागृहाला उत्तरात तरी कळावे. 7000 कोटी रूपयांचे पॅकेज जाहीर केले, 3800 कोटी रूपयेच मिळाले, उर्वरित कुठे गेले ? सन 2014 च्या खरीप हंगामात संपूर्ण राज्यात एकूण 26 जिल्हाधिकाऱ्यांकडून दुष्काळी परिस्थितीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानापोटी 4803 कोटी रूपये उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती, त्याच्यातील 1000 कोटी रूपयांचे वाटपच झाले नाही, ते कुठे आहेत, ही फसवणूक नाही का ? सन 2015 च्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नुकसानभरपाईपोटी निधी देण्यात येणार. डिसेंबर, 2015 च्या हिवाळी अधिवेशनातील पुरवणी मागणी, बाब क्रमांक 35 मध्ये 4228 कोटी रूपये मंजूर करण्यात आले. तसेच आपद्‌कालीन पाणीपुरवठा करण्यासाठी 150 कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला. मात्र दिनांक 12.01.2016 रोजी वित्त विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार मंजूर निधीपैकी 50 टक्के एवढाच निधी मंजूर करण्यात येईल. हे खरे आहे. ही जगलरी काय आहे ? 7000 कोटी रूपये जाहीर करायचे आणि पुन्हा वित्त विभागाने मध्येच एक शासन निर्णय काढायचा आणि संबंध योजनेला 50 टक्के कट द्यायचा. माझ्याकडे पुरावे आहेत. तुम्ही आताच्या पुरवणी मागण्यांत सुध्दा पहावे. 2500 कोटी रूपये खर्च झालेले नाहीत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सरकारने योग्य माहिती दिली पाहिजे होती. सरकारने माहिती दिली की, 2550 कोटी रूपये नाहीत तर 1900 कोटी रूपये आणि काही तरी खर्च झाले आहेत. माननीय राज्यपालांच्या तोंडी खोटे घातले आहे, एवढे हे खेटारडे आहेत. माननीय राज्यपालांच्या तोंडी खोटे घातले आहे. खरीप हंगामातील दुष्काळाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना देण्यात येत असलेल्या मदतीबाबतचा तपशील खरीप हंगामाकरिता शेतकऱ्यांना मदतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून आलेली एकूण मागणी 3578 कोटी रूपये, शासन स्तरावर वितरित करण्यात आलेला निधी 2536 कोटी

श्री. धनंजय मुंडे ....

रुपये आहे. प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या खात्यात झालेल्या रकमा 1929 कोटी रुपये आहेत. उर्वरित पैसे परत शासनाकडे आले. ही मागच्या महिन्याच्या शेवटच्या तारखेची नोंद सरकारने मला दिली आहे. हे का केले ? माननीय राज्यपालांच्या तोंडी खोटी माहिती घातली. 1900 कोटी रुपये तर 1900 कोटी रुपये सांगायचे. सरकारने माझ्याकडे माहिती दिली आहे. येत्या अधिवेशनात 100 हक्कभंग होतील. ही सावकारी कर्ज वाटपाबाबतीतील काही यादी आहे. मी आपल्याकडे देतो. सुरुवातीपासून माझा एक आग्रह होता. सरकार कुठे चुकले ? आम्ही पहिल्या दिवसापासून म्हणत होतो की, सरकारने सावकारांना लाससन्स दिले आहे, त्यामध्ये शेतकऱ्यांना कर्ज देण्याचा कुठेही उल्लेख नाही किंवा कायद्यात उल्लेख नाही. सावकारांनी शेतकऱ्यांना बेकायदेशीरपणे कर्ज दिले आहे. त्या बेकायदेशीरपणे दिलेल्या कर्जाची परतफेड तुम्ही कायदेशीरपणे करू नका, आम्ही असे म्हणत होतो. पण आज मी आपल्याला माहिती देतो की, या सावकारी कर्जमाफीच्या निर्णयाचा फायदा सर्वाधिक आत्महत्या झालेल्या बीड, उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्यांना झालेला नाही. एकही प्रकरण झालेले नाही. हा निर्णय शासनाचा आहे. मी याची माहिती आपल्याला देतो. माझ्याकडे विभागनिहाय माहिती आहे. कालही माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात किती तरी लाख रुपयांचा उल्लेख केला आहे. औरंगाबाद, नागपूर, अमरावती विभागातील एकूण 19 जिल्ह्यांतील 2,23,157 शेतकऱ्यांचे दिनांक 30 नोव्हेंबर, 2014 रोजी देय असलेले 156 कोटी रुपये कर्ज व त्यावरील दिनांक 30 जून, 2015 पर्यंतचे व्याज 15 कोटी रुपये असे 171 कोटी रुपये सावकारांना देऊन या भागातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, फक्त 16 हजार शेतकऱ्यांनाच फायदा झाला. यादी संबंधित विषयांची आहे. मी जबाबदारीने सांगत आहे. आपल्या सहकार विभागाने माझ्याकडे दिलेली ही माहिती आहे. कमीत कमी अशा नैसर्गिक संकटाच्या काळात तरी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांची अशी चेष्टा करू नका. एखाद्याच्या सदिच्छा तुम्हाला घेता येत नसतील तर अशी फसवणूक तरी करून त्या बायबाप शेतकऱ्याची बद्दुआ घेऊ



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

नका. फार लांब नाही. बघता बघात 14 महिने गेले आहेत. 38 महिने संपायला वेळ लागणार नाही. मात्र त्यावेळी हे शेतकरी तुम्हाला माफ करणार नाहीत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत आपण एक घोषणा केली होती. आपण सांगितले होते की, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाला सरकार एक विहीर देणार आहे. मी एका आत्महग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाची अवस्था सांगत आहे. धोतरा गाव, ता. केज, जि.बीड आहे, तेथे राजाभाऊ जाधव या नावाच्या शेतकऱ्याने दिनांक 21.07.2015 ला आत्महत्या केली. ती कर्जबाजारीपणाची आत्महत्या होती. त्या शेतकऱ्याचा मुलगा जीवन राजाभाऊ जाधव आहे. माझे खोटे वाटत असेल तर मी त्याचा मोबाईल नंबरही देतो. मोबाई नंबर 7057412349 आहे. एमआरईजीएसमधून त्याला विहीर दिली आणि त्याबाबतची वर्क ऑर्डर फेब्रुवारी महिन्यात दिली. आता प्रशासन सांगत आहेत की, तुम्ही विहिरीचे काम सुरू करा. जीवनने मला फोन केला आणि म्हणाला की, साहेब, माझा बाप मेल्यावर सरकारने मला 2/3 लाख रूपयांची विहीर दिली. आता मला मायबाप सरकार म्हणत आहे की, तुम्ही विहिरीचे काम सुरू करा. काम पूर्ण झाल्यावर जॉब कार्डप्रमाणे पैसे मिळतील. माझ्या बापाकडे 20 हजार रूपये असते तर बापाने आत्महत्या केली नसती. मायबाप सरकार विहीर देऊन म्हणत आहे की, 2-3 लाख रूपये खर्च करा. ही आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबाची अवस्था तुम्ही केली आहे. उद्या जर या जीवनने आत्महत्या केली तर यास जबाबदार सरकार म्हणून बापट साहेब तुम्ही असणार आहात. त्यावेळी जनता तुम्हाला माफ करणार नाही. तुम्ही एमआरईजीएसमधून धडक विहिरी द्या. जीवनने जॉब कार्ड काढायचे, पैसे गोळा करायचे, 8 दिवसांना पगार करायचा आणि विहीर करायची का ? आपण संकटात असलेल्याला संकटात घालत आहात, त्याचा आधार गेला आहे आणि अशा परिस्थितीत सरकारने त्याचा आधार व्हायचे तर तुम्ही आणखी गंभीर परिस्थिती निर्माण करून तोही आधार काढत आहात. सुधरा. 4 महिन्यांचा काळ आहे. आम्ही प्रत्येक वेळी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, कर्जमुक्तीबद्दल विषय काढला. तुम्ही सरकारमध्ये आल्यावर तुमची शेतकऱ्यांच्या बाबतीतील भावना किती वाईट आहे हे स्पष्ट झाले. वर्षभरातील काही माननीय मंत्र्यांची मुक्ताफळे आहेत. हेही



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

कारण आहे ज्यामुळे ग्रामीण भागातील दुष्काळी परिस्थितीतील शेतकऱ्यांना वाटत आहे की, हे सरकार आपले नाही.

....R

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.........

हे मंत्री आपले नाहीत, आपल्याला कोणाचा आधार नाही, आता आपण आपला प्रपंच सांभाळू शकणार नाही, त्यामुळे जीवनयात्रा संपवावी. आपल्या राज्याचे सहकार मंत्री यांचा कोठे-ना-कोठे शेतकऱ्यांशी संबंध येतो. ते असे म्हणाले की, "शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकारकडे नोटा छापण्याचे मशीन आहे का ?" भारतीय जनता पक्ष शेतकऱ्यांचा पक्ष आहे, असे म्हणता पण तुम्ही शेतकऱ्यांच्या जीवावर उठला आहात. तुमच्या खासदाराला लाज वाटत नाही ? मुंबईमध्ये बसून ते म्हणतात की, "शेतकऱ्यांची आत्महत्या ही एक फॅशन झाली आहे". ज्याप्रमाणे तुम्ही कपडे बदलता त्याप्रमाणे तुम्हाला शेतकऱ्याचे जीवन फॅशन वाटते का ? जनाची नाही तर मनाची तरी लाज वाटू द्या. नाही तर शेतकऱ्यांना पायातील काढायला वेळ लागणार नाही. आताच्या दौऱ्यात काही मंत्र्यांनी याचा अनुभव घेतला आहे. उद्या शेतकऱ्याने हातात रूमणे घेतले तर तो परिणामाचा विचार करीत नाही. शेतकऱ्याची पुंजी असते ती सगळी आभाळात उघडी असते. त्याची अशी चेष्टा करु नका. तो परिणामांचा विचार करणार नाही. सत्तेमध्ये आल्याआल्या सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले की, "मोबाईलचे कनेक्शन तुटू नये म्हणून मोबाईलचे बील भरण्यासाठी शेतकऱ्याकडे पैसे आहेत, लाईट बील भरण्यासाठी पैसे नाहीत." ही तुमची शेतकऱ्यांबद्दलची भावना आहे का ? सन्माननीय खासदार श्री.संजय धोत्रे असे म्हणाले की, "किसान मरते है तो मरने दो." वा, शेतकऱ्याने तुम्हाला मत दिले नाही का ? आपल्या देशाच्या माननीय पंतप्रधानांच्या 'मन की बात' मध्ये एकदा तरी शेतकऱ्यांचा विषय आला का ? गेल्या एक-दीड वर्षात माननीय पंतप्रधानांनी नाही, नाही ते विषय घेतले, पण शेतकऱ्यांच्या व्यथा एकदा तरी 'मन की बात' मध्ये आल्या का ? ही आपली शेतकऱ्यांबद्दलची भावना आहे ? मी आपल्यावर आरोप करीत नाही. मी देखील शेतकऱ्याचा पोरगा आहे. येथे आहे म्हणून सोडून द्या. पण मी जर बांधावर असतो तर मलाही हेच वाटले असते की, आमचे कोणी नाही, यांना मतदान दिले, चूक केली. तो एक पश्चात्ताप आणि प्रपंच सांभाळण्याचा एक पश्चात्ताप. मंत्री महोदय अशा प्रकारची वक्तव्ये करीत असतील तर सरकारकडून काय अपेक्षा करायची ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, मला या ठिकाणी काही सूचना करावयाच्या आहेत. चारा छावण्यांच्या बाबतीत आपल्याला काही अडचणी असतील तर दावणीला चारा द्या. आपलीच ही जुनी मागणी

...2...



श्री.धनंजय मुंडे.........

आहे. सरकारची भावना बघितली तर पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत सरकार खरोखर काय नियोजन करीत आहे, असा प्रश्न निर्माण होतो. येथे माननीय संसदीय कार्य मंत्री उपस्थित आहेत. आपल्या माध्यमातून मला त्यांना हात जोडून कळकळीची विनंती करावयाची आहे की, या बाजूचे सदस्य असोत की, त्या बाजूचे, ते कोणत्याही पक्षाचे असोत, पण ग्रामीण भागामध्ये येथून पुढे फिरताना सामान्य माणूस विचार न करता दिसले पुढारी की हाणतील. राज्याचे मुख्यमंत्री असो की, राज्याचे विरोधी पक्षनेते असोत, दिसले की ते मारतील.

सभापती महोदय, या सरकारने एलबीटीसाठी 7 हजार कोटी रुपयांचा निर्णय घेतला. 24 महापालिकेतील काही हजार व्यापाऱ्यांसाठी निर्णय घेतला. आम्हीही त्याचे स्वागत केले, विरोध केला नाही. पण पिण्याच्या पाण्यासाठी आपण काय केले ? आता आपण लातूर येथे दौरा केला. लातूर शहराला पिण्याच्या पाण्यासाठी भंडारवाडी तलावातून 37 कोटी रुपये खर्च करुन पाईपलाईन आणली. परंतु, त्या तलावात पाणीच नाही. पाहिजे तर आपण माझ्याबरोबर तलाव बघण्यास चलावे. या राज्यात पाण्याचे नियोजन कसे होणार आहे ? टँकरसाठी सरकारकडे पैसे नाहीत. एका तालुक्यात कमीत कमी 50 ते 60 टँकर सुरु असतील तर 10 ते 25 टँकर बंद आहेत. कारण, डिझेल भरण्यासाठी पैसे नाहीत. छावण्या सुरु करुन चार महिने झाले. अद्याप या छावण्यांना सरकारने पैसे दिलेले नाहीत. शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेच्या कामाची मर्यादेच्या बाहेर गरज आहे. परंतु, प्रशासन रस्त्याचे काम देत नाही. गावामध्ये रस्त्याच्या कामाला मंजुरी दिली जात नाही. एखाद्या गावात तलावाची साईट नसेल तर प्रशासन तरी काम कसे देणार आहे ? मनरेगाचे काम नाही, एमआरईजीएसचे काम नाही. कामाची मागणी खूप आहे. परंतु, कामच नाही, अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, जलयुक्त शिवार योजना असो किंवा आणखी कोणती योजना असो, सरकार कोणत्याही गोष्टीत आपली पाठ थोपटून घेत आहे. चार आण्याची कोंबडी आणि बारा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आण्याचा मसाला, अशी सरकारची अवस्था झाली आहे. जलयुक्त शिवार योजना यशस्वी आहे

...3....



श्री.धनंजय मुंडे.........

किंवा नाही, हे येणारा काळच ठरविणार आहे. मात्र, अशी जाहिरातबाजी सुरु आहे की, जलयुक्त शिवारची कामे सरकार करीत आहे आणि एवढे टीएमसी पाणी मिळणार आहे. पण वस्तुस्थिती ही आहे की, या कामांशी सरकारचा काही संबंध नाही.

सभापती महोदय, सन्माननीय कृषी राज्यमंत्री प्रा.राम शिंदे हे उदगीर तालुक्यात दुष्काळाची पहाणी करण्यासाठी आले होते. लातूर ते उदगीर या रस्त्यावर लोहारा गाव आहे. त्या ठिकाणी ते जाणार होते. त्या लोहारा गावात ते गेले असते तर कळले असते की, ते काम सरकार करीत आहे की, शेतकरी करीत आहे. नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरणाचे 20 कि.मी.चे काम शेतकरी स्वत: 2-5 हजार रुपये गोळा करुन करीत आहेत. मशिन आणि डिझेलही सरकारचे नाही. त्या ठिकाणी गावातील 1000 लोक आपल्या स्वागतासाठी थांबले होते. आपण आपल्या गाडीला साधा ब्रेकही लावला नाही. आपण काय पहाणी केली ? मी जबाबदारीने सांगतो आहे आणि खोटे असेल तर मंत्री महोदयांनी याबाबत खुलासा करावा. सबंध गाव त्या ठिकाणी थांबले होते. त्यांना आणखी काही नको होते. फक्त आम्ही आमच्या हाताने काम करीत आहोत, आमचे काम सरकारने बघावे, एवढीच त्यांची अपेक्षा होती. पण ते थांबले नाहीत. जलयुक्त शिवार योजनेमध्ये जी काही चांगली कामे होत आहेत, ती लोकसहभागातून होत आहेत, शासनाचा एक रुपया देखील त्यामध्ये नाही.

सभापती महोदय, एकीकडे सरकार दुष्काळ निवारणासाठी कर्ज घेत आहे आणि दुसरीकडे छावण्या, टँकरसाठी पैसे नाहीत. एमआरईजीएस, नरेगाची कामे सुरु नाहीत. हे काय चालले आहे ? आताची परिस्थिती हाताळली नाही आणि शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही तर काय होईल, याबाबत मंत्री महोदय आपापसात चर्चा करीत आहेत. लोकांमध्ये सरकारबद्दल वाईट चर्चा सुरु आहे, हे खरे आहे. आता ते काय म्हणतात की, दोन-चार महिन्यात पाऊस पडेल आणि सर्व व्यवस्थित होईल. पाऊस पडेल, चांगला पडेल, भगवंताकडे आपण सर्वजण मिळून प्रार्थना करु

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

की, चांगला पाऊस पडू दे. परंतु, चांगला पाऊस पडला तरी शेतकऱ्याच्या हातात पेरणी करण्यासाठी काय आहे, ते आज खाण्यासाठी मोहताज आहेत.

...4....



श्री.धनंजय मुंडे.........

सभापती महोदय, सरकार असे सांगत आहे की, प्रत्येक शेतकऱ्याला सरकार रेशनमधून धान्य देत आहे. हे खोटे आहे. कारण, सर्व रेशन कार्ड आधार कार्डाला जोडून घेण्यासाठी तहसीलदारांनी मागून घेतली आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.........

स्वस्त धान्य दुकानांमध्ये तीन-तीन महिन्यांपासून धान्य नाही. बीड किंवा उस्मानाबाद जिल्ह्यातील किती स्वस्त धान्य दुकानांमध्ये धान्य नाही, हे आपण कधी बघितले काय ? स्वस्त धान्य दुकानांमध्ये माल का नाही, तर तुमचे तहसीलदार कोणाचे ऐकायला तयार नाहीत. ते म्हणतात की, सरकारने आम्हाला सांगितलेले आहे की, सर्व ऑनलाईन करावयाचे आहे, आधार कार्डला रेशन कार्ड जोडावयाचे आहे. तुम्ही आधार कार्डला रेशन कार्ड जोडून घ्या आणि शेतकऱ्याला उपाशी मारा ? ही वस्तुस्थिती तुमच्या समोर कोणी मांडणार नाही. आपण अधिवेशन काळात त्या भागातील सर्व तहसीलदारांना बोलावून घ्यावे आणि काय परिस्थिती आहे, याबाबत त्यांच्याकडून माहिती घ्यावी. रेशन कार्डवर धान्य मिळत नाही, शेतात माल पिकलेला नाही, जनावरांसाठी चारा नाही, पोराबाळांना खायला अन्न नाही, मग शेतकरी काय खाणार आहेत ? पाऊस चांगला पडला तर शेतकऱ्यांनी पेरणी कशी करायाची ? कारण, त्यांना कोणी कर्ज देणार नाही, त्यांच्या 7/12 च्या उताऱ्यावर बोजा आहे, सावकार त्यांना कर्ज देण्यास तयार नाहीत, शेजाऱ्या-पाजाऱ्यांकडे पैसे नाहीत, नात्यागोत्यातील लोकांकडे पैसे नाहीत, मग येणाऱ्या पावसाळ्यात त्यांनी खरीपाची पेरणी कशा प्रकारे करावयाची ? राज्याचा विरोधी पक्षनेता म्हणून नाही तर शेतकऱ्याच्या मुलगा म्हणून मी शासनाच्या पाया पडून, हात जोडून शासनाला विनंती करतो की, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी. तुमच्या मनात पाप येईल की, हे विरोधासाठी विरोधी करीत आहेत. परंतु, सर्व शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून मी या ठिकाणी शासनाला सांगू इच्छितो की, शासनाने काहीही करावे. परंतु, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी. शासनाने नियम तयार करावेत. सावकारांनी दिलेल्या कर्जाचे 300 कोटी रुपये तुम्ही माफ केलेलेच आहेत. आपण सावकारांनी दिलेले कर्ज माफ करुन स्वत:ची पाठ थोपटून घेतली. आपण नियम करावेत की, सलग 3 वर्षापासून जी गावे दुष्काळी भागातील आहेत त्याच गावातील शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी. व्यापाऱ्यांना केलेल्या मदतीऐवढा भार तुम्हाला राज्याच्या तिजोरीवर घ्यावयाचा नसेल तर ती कमी करावी. एलबीटी रद्द केल्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी विधान सभेत आणि सभागृहाच्या नेत्यांनी आपल्या सभागृहात भाषण केले होते. मी ती भाषणे ऐकलेली आहेत. ते म्हणाले की, आम्ही शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाही. आम्ही येणाऱ्या

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.........

काळात शेतकऱ्याला मजबूत करु. शेतकरी कर्ज मागण्यासाठी बँके समोर लाईनमध्ये उभा राहणार नाही, अशा प्रकारे आम्ही शेतकऱ्यांना सामर्थ्यशाली करु. माननीय श्री.गिरीष बापट साहेब, आपण शेतकऱ्याला बौद्धिक पाजत आहात आणि मग व्यापाऱ्यांना 7 हजार कोटी रुपये देताना का नाही पाजले ? तुम्ही का म्हणालात नाही की, एलबीटी बंद करण्याची आवश्यकता नाही. राज्याच्या तिजोरीवर 7 हजार कोटी रुपयांचा भार टाकण्याची आवश्यकता नाही. आम्ही व्यापाऱ्यांना एवढे समर्थशाली करु की, व्यापारी तो टॅक्स सहज भरतील, असे आपल्याला का वाटले नाही. माननीय श्री.प्रकाश महेता साहेब, हा फरक आहे, तो आपण लक्षात घ्यावा. माझी आपल्याला हात जोडून विनंती आहे की, सन 1972 च्या दुष्काळापेक्षा या दुष्काळाची दाहकता जास्त आहे असे सांगितले जाते. सन 1972 च्या दुष्काळामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक साहेबांनी एवढे चांगले काम केले की, आजही राज्यातील जनता आणि तुम्ही, आम्ही त्यांचे नाव घेतो. दुष्काळाच्या वेळी केलेल्या कामातून स्व.वसंतराव नाईक साहेबांसारखे एक नेतृत्व पुढे आले आणि ते नेतृत्व आपल्या राज्याला मिळाले. आज तेच संकट आहे आणि ते आपण व्यवस्थित हाताळावे. आपण हे संकट व्यवस्थित हाताळले नाही तर ज्या जनतेने तुम्हाला डोक्यावर घेतले तिच जनता तुम्हाला पायाखाली घेतल्याशिवाय राहणार नाही. भगवंताने आपल्याला सद्‌बुद्धी द्यावी, अशी मी प्रार्थना करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी राज्यात आणि विशेषतः मराठवाड्यात दुष्काळाची परिस्थिती कशी आहे याचे विश्लेषण केलेले आहे. मी साडेतीन-चार महिन्यांपासून मराठवाड्यात काम करीत आहे. मराठवाड्यातील सर्वात शेवटच्या स्तरापर्यंत जाण्याचा प्रयत्न करणारे एकमेव मंत्रिमंडळातील सदस्य म्हणजे माननीय श्री.दिवाकर रावते साहेब आहेत. माननीय श्री.दिवाकर रावते साहेब आपण पर्यटन मंत्री नाहीत. काही मंत्री पर्यटनासाठी मराठवाड्यात जातात. मंत्री म्हणून त्या ठिकाणी कशा प्रकारे काम केले पाहिजे, प्रश्न कशा प्रकारे सोडविले पाहिजेत, शेतकऱ्यांना दिलासा कशा प्रकारे दिला पाहिजे हे थोड्या फार प्रमाणात माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांनी त्या ठिकाणी केल्याचे चित्र मला दिसत आहे. मी मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात काम केलेले आहे. मी मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यापासून लातूर जिल्ह्यापर्यंत काम केलेले आहे. (...अडथळा...) मी गेवराई येथून गेलो. गेवराईमध्ये बरेच मोठे लोक आहेत. म्हणून मी गेवराई येथे थांबलो नाही. मला ज्या ठिकाणी जाता आले त्या ठिकाणी मी गेलेलो आहे. मराठवाड्यात खूप भीषण परिस्थिती आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, लोकांना 8-10 किलो मीटर अंतरावरुन पाणी आणावे लागते. परंतु, मी सांगू इच्छितो की, लोकांना 8-10 किलो मीटर अंतरावरुन नाही तर 20 किलो मीटर अंतरावरुन पाणी आणावे लागत आहे. मराठवाड्यातील ग्रामीण भागातील मुले नांदेड, लातूर आणि औरंगाबाद या तीन प्रमुख शहरात शिक्षणासाठी येतात. ती मुले एस.टी. स्टँड व रेल्वे स्टेशनवर हमाली करतात. आपण माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांना विचारावे. मी सुभेदारी विश्रामगृहामध्ये थांबलो होतो. मी सकाळी उठून वृत्तपत्र घेण्यासाठी चालत एस.टी. स्टँडवर गेलो. त्यावेळी काही मुली एस.टी. स्टँडवर हमाली करीत होत्या. त्या मुलींनी चांगले जीन्स व टॉप्स परिधान केलेले होते. मी त्या मुलींना विचारले की, तुम्ही हमाली का करीत आहात ? त्या मुलींचे म्हणणे ऐकल्यानंतर मी दोन दिवस जेवण केले नाही. त्या मुलींनी मला सांगितले की, आम्ही दिवसातून एकदाच जेवण करतो आणि शिक्षण घेतो. मी त्यांना विचारले की, असे किती विद्यार्थी आहेत ? त्या विद्यार्थीनीने मला सांगितले की, आम्ही

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...........

युनिव्हर्सिटीतील जवळपास 1 हजार ते 1200 विद्यार्थी अशा पद्धतीने जीवन जगत आहोत. मी ताबडतोब माझे सहकारी श्री.विवेक पाटील यांना फोन केला आणि त्यांना सांगितले की, आपल्याला यावर गंभीरपणे विचार करायला पाहिजे. मी युनिव्हर्सिटीमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची बैठक घेतली. मी त्यांना सांगितले की, आपण अशा विद्यार्थ्यांची यादी तयार करावी. त्याच बैठकीमध्ये मी विद्यार्थ्यांची एक समिती नेमली आणि त्यांना सांगितले की, तुम्ही अशा विद्यार्थ्यांची यादी तयार करावी, मी तुमच्या भोजनाची व्यवस्था करतो. मी रोज 1 हजार विद्यार्थ्यांना माझ्या पक्षाच्या आणि माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीने भोजन देत आहे. ज्या विद्यार्थ्यांची परिस्थिती चांगली आहे म्हणजे जो श्री.मेटे यांचा मुलगा आहे, श्री.जयंत पाटील यांचा मुलगा आहे, त्यांना आम्ही यातून रद्द केलेले आहे. माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांना याची कल्पना आहे. ते स्वतः त्या ठिकाणी जाऊन आलेले आहेत.

सभापती महोदय, मागील दुष्काळावरील चर्चेच्या वेळी बोलताना मी सांगितले होते की, आम्ही 500 कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्याचा प्रयत्न केला. आम्ही त्यातून 200 कार्यकर्त्यांची निवड केली. आम्ही रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी प्रमाणे कार्यकर्त्यांची निवड केली नाही. आम्ही प्रत्यक्ष कार्यकर्त्यांची निवड केली. आज माझे 150 कार्यकर्ते मराठवाड्यामध्ये काम करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांना याची कल्पना आहे. आम्ही प्रत्यक्ष गावागावामध्ये जात आहोत. आम्ही वर्तमानपत्रामध्ये किंवा टीव्हीवर बातम्या दिल्या नाहीत किंवा आम्ही हे काम करीत आहेत हे सांगण्यासाठी आम्ही मीडियाकडे देखील गेलो नाही. त्यांचे दारिद्र्य, त्यांची गरिबी आम्हाला दाखवावयाची नाही. आम्ही हे काम मनापासून करीत आहोत. आम्ही प्रत्येक ठिकाणी जाऊन तेथे काम करीत आहोत. मी स्वतः माननीय मुख्यमंत्री महोदयांना 8-10 वेळा भेटलो. आम्ही तेथे काम करीत आहेत हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यांनी सांगितले की, जयंत पाटील साहेब आपण पोकलेन मशिन लावून संपूर्ण मराठवाडा खोदून काढू आणि त्यासाठी पाहिजे तेवढे पैसे देऊ.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

आम्ही इतकेच करुन थांबलो नाही तर औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील डावरवाडी भागात साडेतीन ते चार कोटी रुपयांची कामे केली आहेत. त्या ठिकाणी तीन पोकलेन मशीनद्वारे कामे सुरु आहेत, लोकवर्गणीतून डिझेलसाठी लोकांनी आठ लाख रुपये निधी गोळा केला असून कामे करण्यात आली आहेत. शासनाची किती तरी मशीनरी धुळखात पडलेली आहे. ती मशीनरी आणून संपूर्ण मराठवाड्यात खोदकामे केली पाहिजेत. औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर बाबुलटेल येथील तळ्याचे काम तेथील शेतकऱ्याने अडविले आहे, कारण शासनाने त्यांचे पैसे दिले नाहीत. त्या ठिकाणी पाण्याचा साठा होऊ शकतो. त्या ठिकाणी सरकारी अधिकारी कोणतेही काम करण्यास तयार नाहीत. संपूर्ण मराठवाड्यात पोकलेन मशीनद्वारे तळे, नदी व नाल्यांची खोली वाढविण्यात येत आहे. असे केल्यामुळे पुढील वर्षात तरी त्या ठिकाणी पाण्याचा साठा होऊ शकेल. गंगापूर व लोणी ही लहान गावे आहे, वैजापूर येथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अतिशय भयंकर आहे, ग्रामीण भागातील रस्त्यांची अतिशय दयनीय अवस्था आहे. मराठवाड्यातील ग्रामविकास मंत्री असून कोणतेही कामे करण्यात आली नाहीत, त्या भागात डांबरी रस्ते नाहीत, गंगापूर येथे मी 42 गावातील सरंपचांची बैठक घेतली होती. त्या बैठकीला ते लोक आवर्जुन आले होते. त्यावेळी मला श्री.दिवाकर रावते यांची आठवण येत होती. श्री.रावते साहेबांची ओघवती भाषणे व त्यांनी दुष्काळात केलेली कामे मला आठवत होती. याच बेंचवरुन ते सभागृहात भाषण करीत होते. रावते साहेब गावात गेले की, त्यांच्याजवळ 100 माणसे जमा होत होती. मी त्यांची तारीफ करीत नाही, त्यांनी जी चांगली कामे केली त्याचा उल्लेख जरुर केला पाहिजे. ते अलिबागचे आहेत, अलिबागचा माणूस हा नेहमी लढवय्या असतो. श्री.दिवाकर रावते यांनी प्रत्यक्षात कामे केली आहेत.

सभापती महोदय, मराठवाड्यात शासकीय यंत्रणा कोठेही काम करताना दिसत नाही. गंगापूर शहरात अतिशय भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्या ठिकाणी चार-चार दिवस पिण्याचे पाणी मिळत नाही. अशा ठिकाणी सरकार कोणती उपाययोजना करणार आहे, गेल्या जून महिन्यापासून सरकारला काही करता आले नाही. आता पुढील तीन महिन्यात कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी पाणी देण्यासाठी सरकार कोणत्या तातडीच्या उपाययोजना करणार आहे. या विषयाबाबत सरकारला गांभीर्य नाही, सभागृहात या विषयावर अतिशय

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

गांभीर्याने चर्चा झाली पहिजे. संसदीय कार्यमंत्री श्री.गिरीष बापट आपण स्वत: जाऊन पहा, लोकांची भेट घ्या. तुम्ही औरंगाबादचा दौरा काढा. 1200 मुले आणि मुली कामे करीत आहेत, त्यांनी मला फोन केला की, जयंत पाटील तुम्ही जे काम करीत आहात ते आम्ही कधीही विसरणार नाही. काही मदत लागली तर आम्ही करण्यास तयार आहोत. त्या लोकांनी मला स्वत:हून फोन केला आहे. आम्ही कोणाकडेही मदत मागितली नाही, जे मदत देतील ते मदत घेतो. आज चार गावात आमच्या पोकलेन मशीनद्वारे कामे चालू आहेत त्यासाठी मी चार गावात डिझेलसाठी पैसे पाठविले आहे. औरंगाबाद ग्रामीण येथील कोळघर गावात मी साडेचार किलोमीटर चालत गेलो, तेथे रस्ता नाही, पलिकडील रस्ता खराब झालेला आहे. सोमवारी माझी पत्नी औरंगाबाद येथे जाणार आहे, 150 कार्यकर्ते घेऊन आम्ही तेथे काम करीत आहोत. उद्या सकाळी कोळघर गावात पोकलेनद्वारे कामे करण्यात येणार आहेत.

सभापती महोदय, औरंगाबाद शहराला लागून तीसगांव आहे, राज्यमंत्री महोदय श्री.विजय देशमुख यांची व माझी भेट झाली असती, परंतु 15 मिनिटांसाठी आमची चुकामूक झाली आहे. मला थोडा वेळ लातूर येथे थांबावे लागले होते, मी तुम्हाला भेटण्यासाठी येणार होतो, तीसगांव येथे 13 हजार लोकसंख्या आहे. हे गांव संपूर्ण दलित वस्तीचे आहे. मी त्या गावातील लोकांना सांगितले की, मंत्री महोदय श्री.दिलीप कांबळे माझे मित्र आहेत मी त्यांना येथे घेऊन येतो. तीसगांव येथे 99 टक्के दलितवस्ती आहे, त्या ठिकाणी पिण्यासाठी पाण्याचा थेंबही नाही. आज त्या ठिकाणी पोकलेन मशीनद्वारे कामे सुरु आहेत. पुढील वर्षी तरी आम्हाला पाणी मिळेल अशी त्या लोकांना आशा आहे, सर्व सरकारी यंत्रणा ठप्प झालेली आहे. त्या ठिकाणी कोणीही शासकीय अधिकारी जात नाही. 4 मार्च रोजी मी औरंगाबाद येथील आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढला होता. पोलीस माझ्याकडे येऊन विचारणा करु लागले ते स्वत: मला भेटले नाही, श्री.विवेक पाटील यांना ते म्हणाले की, 2000 लोक मोर्च्याला येतील काय ? रायगडवरुन 1500 लोक येणार आहेत काय ? सकाळी 11 वाजेपासून ते सांगत होते की, 3000 शेतकरी येतील. त्यातील रायगडचे जास्त येतील. आमचे रायगडचे 200 निरीक्षक तेथे आहेत, आम्ही ग्रामीण भागात जाऊन जी कामे केली आहेत, त्यामुळे त्या मोर्च्यासाठी 3000 गाड्या भरुन लोक आले होते, तेथे लोक दोन

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

दिवसांच्या भाकऱ्या बांधून, वर्गणी काढून मोर्च्यासाठी लोक आले होते. 3000 गाड्यांची माझ्याकडे नोंद आहे, ती नोंद मी मागवून घेतली आहे, मी ते कागद सभापती महोदयांना देणार आहे. मोर्च्यात आलेल्या प्रत्येक माणसाचे नाव व मोबाईल क्रमांक मी नोंदवून घेतला आहे, प्रत्येक गाडीवाल्याकडे एक अर्ज दिला होता, त्या अर्जामध्ये नावे व मोबाईल क्रमांक नमूद करण्यात आलेला आहे. यासंदर्भातील रेकॉर्ड मी मंत्री महोदयांना देखील देणार आहे. 42,200 लोकांची माझ्याकडे नोंद आहे. औरंगाबाद शहरात गेल्या 20 वर्षात असा मोर्च्या निघाला नाही असे तेथील लोक सांगत आहेत, शेकाप पक्ष कोठे आहे, आम्ही स्वतः शेतकऱ्यांपर्यंत जाऊन पोहचलो आहोत, त्यांच्या सुख दु:खात सामील झालो आहोत, आमच्या परीने आम्ही मदत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आम्ही तेवढ्यावर थांबलो नसून त्यांना सहानुभूती दिली.

सभापती महोदय, गाडीत बसून एक दिवसाची ट्रीप काढून दुष्काळी भागाची पाहणी होऊ शकत नाही. मंत्री महोदय, श्री.दिवाकर रावते यांच्यासारखी पाहणी करायला पाहिजे. मी अनेक गावांची नावे सांगू शकतो. परंतु मला इतर विषय देखील मांडायचे आहेत. अनेक गावांना मी भेटी दिल्या आहेत, तेथे प्रत्यक्ष काम कसे करायचे हे समजून सांगितले आहे. आम्ही म्हाळगी प्रबोधनीमध्ये प्रशिक्षण घेतले नाही. परंतु आम्ही अभ्यास वर्गात शिक्षण घेतले आहे. आम्ही शेतकऱ्यांची बांधिलकी घेतील, एक विचार घेतला, शेतकऱ्यांजवळ जाऊन कसे बसावे, त्यांच्याशी कसे बोलावे हे आम्ही प्रत्यक्ष जाऊन पाहिले आहे. सकाळी उठल्यावर मला मराठवाड्यातून 200 लोकांचे फोन येतात. त्यांच्याजवळ जाऊन आम्ही त्यांची सुख दु:खे समजून घेतली आहेत. मराठवाड्यात अतिशय भयानक परिस्थिती आहे. हे सरकार आल्यापासून मराठवाड्यात 13084 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, आत्महत्यांची नोंद मंत्री महोदय श्री.दिवाकर रावते यांच्याकडे असेलच. आपणाला बोलण्यास मर्यादा आहेत, आपण जास्त बोलू शकत नाहीत, परंतु या सभागृहात तुम्ही प्रत्येक वेळी सांगत होता की, सरकारकडे माझी मागणी अशी आहे की, मराठवाड्यासाठी खास बाब म्हणून योजना राबविणे आवश्यक आहे. सन 2012 पासून मराठवाड्यात पाऊस पडलेला नाही. गेल्या चार वर्षापासून मराठवाडा पाण्यासाठी तडफडत आहे. मराठवाड्यातील सर्व शासकीय योजनांना खास बाब म्हणून निधी वळविला पाहिजे. मी विदर्भात गेलो नाही, मी मराठवाड्यात काम करीत आहे. मराठवाड्यातील दुष्काळाची तीव्रता अतिशय

.....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

भयानक आहे. मराठवाड्यातील कोणत्याही जिल्ह्यातील असे एकही शहर नाही की त्या ठिकाणी आठ दिवसातून पाणी मिळते. लातूर शहराला दोन महिन्यातून एकदा पाणी मिळते. ही काय परिस्थिती आहे, संसदीय कार्यमंत्री आता आपणाला बरेच दिवस झाले आहेत, मागील सरकारने काय केले हे आता सांगत बसू नका. मागील सरकारने वाटोळे केले म्हणून तुम्हाला जनतेने निवडून दिले आहे. हे गाऱ्हाने आम्ही किती दिवस ऐकत राहणार आहे, आपण पण आता जुने होत चालला आहात. मी एका तहसील कार्यालयात गेलो होतो. मी त्यांना विचारले की, कोणत्या योजनांसाठी किती तरतूद आहे. त्यांनी सांगितले की, साहेब मंत्री येतात, आश्वासन देतात, आम्हाला आदेश देतात की, ताबडतोब काम सुरु करा. आम्ही त्यांच्या समोर ताबडतोब एस म्हणतो, कारण त्यांच्यापुढे आम्ही काही बोलू शकत नाही. दोन दिवसानंतर जिल्हापरिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य गेल्यावर तहसीलदार त्यांना उत्तर देतात की, साहेबांना सांगायला काय होते, साहेब पैसेच पाठवित नाहीत तर आम्ही काय करणार ? ही बाब त्यांना माहिती नाही. त्यानंतर मी आयुक्त कार्यालयात गेलो, गेल्या तीन वर्षात मराठवाड्यात विहिरींच्या कामांची देयके देण्यात आलेली नाहीत.

या नंतर सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील ....

ही काय परिस्थिती आहे ? मी काही चुकीचे बोलत असल्यास खाली बसेन. मी तेथे प्रत्यक्ष गेलो आहे. आपण गेला नाहीत. मी प्रत्येक गावामध्ये गेलो, तळमळीने गेलो, कोणाला दाखविण्यासाठी गेलो नाही. मी कोठेही माझा फोटो काढला नाही, मी कोठेही टी.व्ही. कॅमेरा घेऊन गेलो नाही. विहिरींची बिले तातडीने दिली गेली पाहिजेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी साडेदहा कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. परंतु काल आम्हाला असे सांगण्यात आले की, आम्ही आतापर्यंत 2400 कोटी रुपये खर्च केले आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी असे सांगितले की, त्यांना माहितीच्या अधिकारात फक्त 1900 कोटी रुपयांची माहिती प्राप्त झाली आहे. राज्य शासनाकडून असे सांगितले जात आहे की, ही रक्कम टप्प्याटप्प्याने खर्च करीत आहोत. मागील वेळी शासनाने असे सांगितले होते की, तुम्हाला तातडीने मदत करु. शासनाने लोकांच्या अपेक्षा वाढविल्या आहेत. परंतु प्रत्यक्षात लोकांना काही मिळत नाही. आज लोक थांबलेले आहेत. पुढील 2 महिन्यांमध्ये आमच्या सारखा कोणताही आमदार किंवा मंत्र्यांना लोक फिरु देणार नाहीत. मी एका गावातील बाल आश्रमात गेलो होतो. तेथे अनेक लहान मुले होती, ती मुले उघडी होती. त्यानंतर तेथील शाळेत गेलो व चौकशी केली असता त्या शाळेला 3 वर्षापासून कोणतेही अनुदान मिळालेले नाही, शिक्षकांचे अनुदान मिळालेले नाही. औरंगाबाद जिल्ह्यातील सदर शाळा आहे. सदर शाळेचे नाव मी नंतर सांगतो. शासनाने या संदर्भात ए,बी,सी व डी वर्गवारी केली आहे. मी बालगृह आणि आश्रमशाळेतील सर्व शिक्षक आणि संस्था चालकांची भेट घेतली व त्यांच्या समवेत बैठक घेतली मी त्यांना विचारले की, तुम्ही मुलांना जबाबदारीने शाळेत घेतले, परंतु त्यांना व्यवस्थित ठेवत नाहीत. सर्व संस्था चालकांनी सावकारांकडून, बँकांकडून आणि तेथील मारवाड्यांच्या दुकानातून उधारीवर माल घेऊन तेथील मुलांना जगवत आहेत. कांबळे साहेब, आपण तेथे जावे. ज्या बोगस शाळा आहेत, त्यांना अनुदान देऊ नका. परंतु ए,बी,सी व डी वर्गांपैकी कमीत कमी "अ" आणि "ब" वर्गांच्या बालगृहे आणि आश्रमशाळांना अनुदान द्यावे. तेथील मुले उपाशी तडफडत आहेत, त्यांना खऱ्या अर्थाने दिलासा देणे अत्यावश्यक आहे. या संदर्भात आम्ही बजेटवर बोलताना या विषयी बोलू. कांबळे साहेब, माझी अपेक्षा आहे की, मी आपल्याला तेथे घेऊन जाईन, आपण सेक्रेटरींना सुध्दा तेथे घेऊन जाऊ. तेथे ज्या चुका असतील, त्या आपण दुरुस्त करु सभापती महोदय,

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील ....

दुष्काळाचे धोरण आज जाहीर केले आहे. परंतु पाऊस पडल्यानंतर उस्मानाबाद, कळंब, तुळजापूर आणि बीडच्या काही टप्प्यामध्ये दिलासा मिळाला. त्यावेळी आमचे प्रशिक्षण शिबीर सुरु होते. आम्ही त्याचवेळी निर्णय घेतला की, शेतकऱ्यांना तातडीने बियाणे पुरवू. आम्ही आमच्या संस्थांमार्फत 2 कोटी रुपयांचे बियाणे वाटले. मेहता साहेब, गुजराथमधील शेतीकरिता बियाणे पाहिजे असल्यास त्यांना सुध्दा बियाणे देऊ. सभापती महोदय, आम्ही महाबीज कंपनी आणि बाजार समित्यांकडून बियाणे खरेदी केले. पुढील हंगामात ज्यावेळी चांगला पाऊस पडणार आहे असे हवामान खात्याकडून सांगितले जाते त्यावेळी शासनाने शेतकऱ्यांना मोफत बियाणे दिले पाहिजे अशी या चर्चेच्या निमित्ताने माझी मागणी आहे. शेतकऱ्यांकडे काही नसल्यामुळे त्यांना खरोखर जगवायचे असल्यास कमीत कमी त्यांना मोफत बियाणे देण्याची घोषणा करावी. दुष्काळाच्या काळातील शेतकऱ्यांची वीज बिले संपूर्णपणे माफ केली पाहिजेत अशी माझी मागणी आहे. माझे मित्र व सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे मला 4-5 वेळा भेटले. ते त्यांच्या पक्ष शिबिराच्या वेळी आले होते, त्यावेळी त्यांनी मला विचारले की, भाई तुम्ही या ठिकाणी काय करीत आहात. मी त्यावेळी त्यांच्या समवेत दोन तास चर्चा करुन मी काय करीत आहे, हे दाखविले. सभापती महोदय, माझ्या हॉस्टेलवर अनेक मुले आहेत, मेहता साहेब, माझ्यासारखा लहान माणूस यासंबंधी काम करीत आहे. आपण म्हाडाचे मंत्री आहात. म्हाडाच्या एक-एक अधिकाऱ्याने ठरविल्यास ते जिल्ह्यातील एक-एक होस्टेलला मदत करु शकतील. होस्टेलमधील मुलांना शासनामार्फत मोफत जेवण दिले पाहिजे. प्रत्येक मंत्र्यांनी एक एक खात्याकडे हे काम द्यावे. मी सध्या एक हजार विद्यार्थ्यांना मोफत जेवण देत आहे. सध्या अतिशय गंभीर परिस्थिती आहे. तेथे शेतकऱ्यांची मुले आणि ग्रामीण भागातील मुली आहेत. आपण तेथे प्रत्यक्ष येऊन भेट द्यावी. आपल्या डोळ्यातून पाणी आल्याशिवाय राहणार नाही. त्या मुली पी.एचडी. करीत आहेत, सिनेट करीत आहेत. आपण सर्वांना नव्हे तर होस्टेलमध्ये शिक्षण घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत जेवण देण्याची घोषणा या चर्चेच्या निमित्ताने करणे अत्यावश्यक आहे. सभापती महोदय, आपण आम्हाला नेहमीप्रमाणे साचेबध्द रिप्लॉय देणार असल्यास तो आम्हाला नको आहे, आम्ही रिप्लाय ऐकणारच नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी मागील दुष्काळी चर्चेच्या वेळी सांगितले होते की, आम्ही संपूर्ण मराठवाडा

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील ....

खोदून काढू. त्याकरिता शासकीय मशिनरी घेऊ व आवश्यकता वाटल्यास खाजगी मशिनरी भाड्याने घेऊ व त्यांचे डिझेल शासनामार्फत देऊ. सभापती महोदय, आपण एखाद्या मंत्र्यांची नेमणूक करावी मी त्यांना तेथे घेऊन जातो व सर्व परिस्थिती दाखवितो. मी आज सकाळी कोळघरमध्ये साडेतीनशेची पोकलेन पाठविली व त्यामार्फत तेथे काम करीत आहोत. या संदर्भात आपण आमच्या समवेत चर्चा करावी, हे विधायक काम आहे. मला या बाबतीत कोणतीही अपेक्षा नाही. मी अतिशय लहान माणूस आहे, आमचा पक्ष लहान आहे, माझी ताकद काय आहे ? परंतु आज मी आमदारकी आणि पैशापेक्षा वेगळा आनंद उपभोगत आहे. मी गरीब लोकांना मदत करण्याचे काम केले आहे. मी त्यांच्यासोबत बसून भाकरी आणि चटणी खाण्याचा जो आनंद उपभोगला तो माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा आनंद आहे. सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने आम्ही 4-5 मागण्या करीत आहोत, त्यांचा गांभीर्याने विचार होणे अत्यावश्यक आहे. औरंगाबाद जिल्ह्यात दुकानदारांकडून वाटप होणारे रेशन योग्य नाही. पुढील महिन्यात आम्ही त्या संदर्भात काम करणार आहोत. योग्य आणि गरजू माणसाला रेशन धान्याचा पुरवठा झाला पाहिजे. आपण मराठवाड्याला डोळ्यासमोर ठेऊन पॅनेल म्हणून काम केल्यास त्यांना खऱ्या अर्थाने दिलासा दिल्यासारखे होईल. परंतु सध्या दिवस काढण्याचे काम सुरु आहे, असे मला वाटते. राज्यात मनरेगाचे एकही काम सुरु नाही. मी आयुक्त कार्यालयात गेलो होतो. माननीय आयुक्त लातूरला गेले होते. त्यानंतर मी उपायुक्तांना भेटलो असता ते उभे राहत नाहीत, त्यांचा शिपाई सुध्दा उभा राहत नाही. आम्ही 5-6 आमदार तसेच 10-12 माजी आमदार तेथे गेलो होतो. त्यावेळी मी माझ्या पध्दतीने त्यांचा योग्य तो समाचार घेतला. तेथे विहिरींचे साडेसात कोटी रुपये शिल्लक आहेत. परंतु बिले दिली जात नाहीत. या बाबत तुम्ही काही सांगितले आहे का, पैसे देऊ नका असे वरून आदेश गेले आहेत का ? परंतु या संबंधी कोणतेही उत्तर मिळाले नाही. तीन वर्षांपासून विहिरींचे बिले देण्यात आली नाहीत. मराठवाड्याचा वेगळ्या दृष्टीने पाहिले तरच तेथील दुष्टचक्र संपणार आहे. सभापती महोदय, आपण मराठवाड्यातील किती प्रकल्प सुरु करणार आहात ?

यानंतर V-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

मी आज सकाळी माननीय मंत्री श्री.गिरीष महाजन यांची भेट घेतली. आम्ही तुमच्याकडे छोटी छोटी कामे घेऊन येतो. आम्हाला छोटी छोटी कामे करायची आहेत. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे मराठवाडयामध्ये गेली 20-25 वर्षे काम करीत आहेत. मराठवाड्यामध्ये उस्मानाबाद, बीड आणि लातूर या तीन जिल्हयात तीव्र पाणी टंचाई आहे. निलंगा येथे आम्ही भेट दिली, तेथे आणखी वेगळी परिस्थिती आहे. मराठवाड्यातील लोकांचा राजकीय पुढाऱ्यांवर विश्वास उरलेला नाही. आम्ही जो मोर्चा काढला त्यामध्ये 70 टक्के तरुण मंडळींचा सहभाग होता. गंगापूरचे 42 सरपंच आणि 4 सभापती मोर्चात सामील झाले होते. प्रथमच तुमच्यासारखी मंडळी मराठवाड्यात येऊन दुष्काळी भागात काम करण्याचा प्रयत्न करीत आहेत हे पाहून आम्ही पक्षभेद विसरुन काम करावयास तयार आहोत असे त्यांनी सांगितले. हे चित्र राज्य सरकार बदलणार आहे की नाही? मराठवाड्यातील जनतेला या चर्चेमधून दिलासा मिळेल अशी आम्हाला अपेक्षा आहे. नियमानुसार केवळ अडीच तासाची चर्चा होऊ नये म्हणून मी माननीय सभापतींना विनंती केली की, पूर्ण दोन दिवस या प्रस्तावावर चर्चा घेण्यात यावी. आंबेजोगाई येथे 200 तरुण स्वखर्चाने आले होते. त्यांचे म्हणणे होते की, आमच्यासाठी बोलणारे तुमच्यासारखे लोक आहेत त्यामुळे आम्हाला आनंद होत आहे.

सभापती महोदय, मराठवाड्यात चारा छावण्यांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. चारा छावण्यांबाबत शासकीय यंत्रणा काम करताना दिसत नाही. शासनाच्या मनामध्ये खूप काही करण्याची इच्छा असली तरी अधिकारी ऐकत नाहीत ही स्थिती राज्यात निर्माण झालेली आहे. माननीय मंत्री श्री.गिरीश बापट हे मान्य करतील. अधिकाऱ्यांना दुष्काळाविषयी चिंता वाटत नाही.

सभापती महोदय, तलाठयापासून आयुक्त दर्जापर्यंतचे अधिकारी दुष्काळाबाबत गंभीर नाहीत. एकही तलाठी गावामध्ये मुक्काम करीत नाही. मराठवाड्यातील कोणताही तलाठी किंवा मंडळ अधिकारी गावात रहात नाही. कारण गावकरी आणि शेतकरी त्यांच्या दारात जाऊन त्यांना सरकारी मदतीविषयी हैराण करुन सोडतात. गेल्या वर्षी महाराष्ट्रात 2590 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. राज्यात यावर्षी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी उच्चांक गाठला आहे. 2001 मध्ये 65, 2002 मध्ये 122, 2003 मध्ये 180, 2004 मध्ये 640, 2005 मध्ये 2376, 2006 मध्ये 2076, 2008

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

मध्ये 1966, 2009 मध्ये 1905, 2010 मध्ये 1741, 2011 मध्ये 1511, 2012 मध्ये 1473, 2013 मध्ये 12076, 2014 मध्ये 1961 आणि 2015 मध्ये 2590 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. दरवर्षी ही आकडेवारी वाढत आहे.

सभापती महोदय, जोपर्यंत नारपार योजना पूर्ण होत नाही, तापी नदीचे पाणी उचलून गोदावरी नदीमध्ये टाकले जात नाही आणि गोदावरीचे पाणी मराठवाडयात येत नाही तोपर्यंत या परिस्थितीमध्ये बदल होईल असे मला वाटत नाही. भौगोलिक परिस्थिती याला कारणीभूत आहे. मराठवाडयामध्ये पावसाचे ढग जुलै महिन्यात जातात, ही स्थिती आम्ही बदलू शकत नाही. परंतु या चर्चेच्या माध्यमातून मराठवाडयात कायमस्वरुपी पाणी पोहोचविण्याची योजना तयार करण्याबाबत राज्य सरकारची भूमिका काय राहणार आहे? मी केवळ टीका करण्यासाठी बोलत नाही.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना मी भेटलो होतो. रायगड जिल्हयामध्ये 1200 ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी 300 ते 400 ग्रामपंचायती आर्थिकदृष्टया सक्षम आहेत. त्यांना निधी देण्यास शासनाने आम्हाला परवानगी द्यावी. शासनाने त्याबाबत नियंत्रण ठेवावे. 25 ते 30 कोटी रुपये बजेट असलेल्या ग्रामपंचायतीला निधी देण्यास शासनाने आम्हाला परवानगी द्यावी. खारघर येथील ग्रामपंचायतीचे बजेट 40 कोटी रुपयांचे आहे. आम्ही त्यांना 5 कोटी रुपयांचा निधी द्यावयास तयार आहोत. गंगापूर येथे आम्ही 1 कोटी रुपये खर्चून पोकलेन मशीन्स उपलब्ध करुन दिल्या, त्यातून 42 गावांना व 4000 एकर क्षेत्राला पाणी मिळू शकेल अशी स्थिती निर्माण झालेली आहे. आम्ही जे काम केले आहे तेथे तुम्ही परवानगी देऊ शकता. ग्रामपंचायत खर्च करण्यास तयार आहे, त्यांना आम्ही पत्र देतो. शासनाने याबाबत स्वतःचे नियंत्रण ठेवावे. जलसिंचन विभागाचे अभियंता नियंत्रणासाठी नेमावेत. आम्ही निधी देण्यास तयार आहोत. आमच्या कार्यकर्त्यांची पोकलेन मशिन्स आहेत त्या वापरण्यासाठी परवानगी द्यावी, निधी आम्ही देणार आहोत. हे काम शासन करु शकते. त्यात कोणतीही अडचण येणार नाही. आवश्यकता वाटत असेल तर भारतीय जनता पक्षाच्या आमदारांनी कार्यक्रमाचा श्रीगणेशा करुन नारळ फोडावा. आम्हाला नारळ फोडण्यात इंटरेस्ट नाही. मी प्रत्यक्ष काम करणारा आमदार आहे. गेली 3 ते 4 महिने मी मराठवाडयातील भागांमध्ये काम करीत आहे. या चर्चेच्या निमित्ताने धोरणात्मक निर्णय

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.....

घेतले गेले नाही तर सभागृहात उभे राहून भाषण करण्याला काही अर्थ उरणार नाही. या चर्चेच्या माध्यमातून शासनाकडून दुष्काळावर मात करण्यासाठी ठोस निर्णय आणि घोषणा होणे अपेक्षित आहे. आम्ही रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत निधी देण्यास तयार आहोत. सहकार विभागाने आम्हाला अनुमती द्यावी. शासन याबाबत निर्णय घेऊ शकते. परंतु विभागाचे सचिव निर्णय अडविण्याचे काम करीत असतील तर त्यांना ठामपणे विरोध करण्याची धमक मंत्री महोदयांनी दाखविली पाहिजे. सचिव काड्या घालण्याचे काम करणार असतील तर माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांना निर्णय घेण्याचे अधिकार द्यावेत.

नंतर डब्ल्यू.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील...

सभापती महोदय, या ठिकाणी जे चित्र आहे ते त्यांना कळलेले नाही. आपण अच्छे दिनची घोषणा केली. पण आज प्रत्यक्षात वेगळे चित्र आहे. मी पुढच्या आठवड्यामध्ये मराठवाड्यातील किमान 100 सरपंचांना माननीय मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी घेऊन येत आहे. माझे म्हणणे एवढेच आहे की, ज्या गोष्टी करण्यासारख्या आहेत त्या आपण करू शकतात की नाही ? नियम भरपूर आहेत. पण नियमाला वळण लावून काम करणे महत्त्वाचे आहे. तेच आम्ही रायगडमध्ये करतो. आम्ही कधी आपल्याला विरोध केला आहे काय ? जे कायद्यात बसते ते कोणीही करेल. कायद्याच्या बाहेर जाऊन जनतेच्या हितासाठी काम करण्यामध्ये जो आनंद आहे तो वेगळा आनंद आहे. आपण आमचा अनुभव बघत आहात. आम्ही कधीच कुणाला अडविलेले नाही. या चर्चेच्या निमित्ताने आम्ही रिप्लाय घेणार नाही. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना, गट नेत्यांना विनंती करणार आहे. धोरणात्मक आणि ठाम निर्णय असतील तरच आम्हाला या चर्चेवर उत्तर पाहिजे आहे. नाही तर आम्हाला उत्तर नको आहे. ज्या गोष्टी आम्ही येथे प्रत्यक्षपणे मांडलेल्या आहेत, ज्या मी अनुभवल्या आहेत आणि जे आम्ही करायला मागत आहोत त्यास शासन साथ देणार नसेल तर मग त्याचा काय उपयोग आहे ? त्या पद्धतीचे काम आपण करणार नसाल तर कशा प्रकारे काम करायचे हा वेगळा विषय आहे. एका कर्मचाऱ्याने एक हजार रूपये दिले तरी मराठवाड्यातील सर्व विद्यार्थी जेवू शकतील. श्री.जयंत पाटील काही नोटा छापत नाही. श्री.जयंत पाटील यांनी सन्माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांना सांगितले की, पैसे द्यावे तर ते नक्की देतील. असे अनेक बापट मी उभे केले आहेत. मी हे एक उदाहरण दिले आहे. श्री.बापट साहेब हे माझे चांगले मित्र आहेत. माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांना आणीबाणीच्या काळात मी जेवणाचा डबा देत होतो. ते बाकीचे काही खात नव्हते. माझे वडील आणि ते एकाच जेलमध्ये होते. त्यामुळे त्यांचे आणि माझे संबंध आणीबाणीपासूनचे आहेत. शेवटी राजकारण हे वेगळे असते. ते माझ्या वडिलांच्या बरोबरीचे आहेत तरी पण ते मला मित्रासारखे वागवतात.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील...

सभापती महोदय, माझी आपल्याकडून एकच अपेक्षा आहे. या चर्चेला उत्तर देताना राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय जाहीर केले पाहिजेत. अमुक एवढी मदत केली असे सांगून चालणार नाही. आपण हिवाळी अधिवेशनातील उत्तर पहावे. त्यावेळी 10500 कोटी रूपये दिले असे सांगितले होते. मी जेव्हा अर्थ खात्यात गेलो तेव्हा प्रत्यक्षात 2400 कोटी रूपये आल्याचे मला सांगण्यात आले. त्यामध्ये वेगळी भावना होती. नुसत्या घोषणा नको. विदर्भामध्ये काय झाले यावर मी बोलणार नाही. तेथे देखील दुष्काळ असेल. मी तेथे अन्याय करायला मागत नाही. तेथे पिण्याच्या पाण्याची गैरसोय नसावी असे मला वाटते. आपण माझ्या बरोबर मराठवाड्यामध्ये यावे. तेथे पाण्याची काय परिस्थिती आहे हे आपण पहावे. तेथील कायम विनाअनुदानित तत्त्वाच्या शाळांना तातडीने अनुदान दिले पाहिजे. मराठवाड्यासाठी सर्व गोष्टी आपण खास बाब म्हणून केल्या पाहिजेत अशी माझी मागणी आहे. मी ज्या ज्या भागात गेलो, वेगवेगळ्या स्तरावर गेलो तेथे मला अनेक अडचणी दिसल्या. मी माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते साहेबांना सांगू इच्छितो की, आपण जेव्हा मराठवाड्याच्या दौरा करणार असाल त्यावेळी मला सोबत घेऊन जावे. आज महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची अपेक्षा आहे की, या अधिवेशनातून आम्हाला काही तरी मिळेल. ही चर्चा दोन-अडीच तास न करता तीन दिवस करावी. 2 तास 40 मिनिटे बोलून हा प्रश्न सुटणारा नाही. हा प्रश्न पिढ्यानपिढ्याचा होऊन बसला आहे. ही चर्चा गांभीर्याने घेत नसाल त्याला काहीच अर्थ नाही. आज आम्ही सभागृहात पोटतिडकीने का बोलत आहोत ? आज अधिकारी ज्या पद्धतीने आम्हाला उत्तरे देतात, ज्या पद्धतीची ट्रीटमेंट देतात ते बरोबर नाही. आज आमदारांचा प्रोटोकॉल सांभाळला जात नाही. मी देखील या सभागृहात 16 वर्ष आमदार म्हणून आहे. मी या सभागृहात नेहमी अभ्यासपूर्ण बोलत आलो आहे. मी कधी वेडेवाकडे बोलत नाही. असे असताना अधिकारी वाटेल तशी उत्तरे देत असतील तर त्याचे दु:ख आम्हाला होते. अशा प्रकारची वर्तणूक अधिकाऱ्यांकडून होत असेल तर दुष्काळ आपण संपवू शकणार नाही. दुष्काळ असाच राहील. तेथे असेच लोक उपाशी राहतील, तडफडत राहतील. तडफडणाऱ्या शेतकऱ्यांना, त्यांच्या मुलांना या चर्चेच्या निमित्ताने खऱ्या अर्थाने आधार मिळेल, आशा वाटेल अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. तसेच याबाबत सरकार धोरणात्मक ठाम असा निर्णय घेऊन शेतकऱ्यांचे पुढील जीवन समृद्ध करेल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे विचार संपवितो. ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामराव वडकुते)**

**पृ.शी.:** पर्यटन धोरण 2016

**मु.शी.:** पर्यटन धोरण 2016 संबंधी माननीय पर्यटन राज्यमंत्र्यांचे निवेदन

प्रा.राम शिंदे (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर श्री.अजित....

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचा मुद्दा

**तालिका सभापती (श्री.रामराव वडकुते)**: सन्माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया यांचा औचित्याचा मुद्दा आहे. त्यांनी तो मांडावा.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

दिनांक 8 मार्च, 2016 रोजी बारावीचा भूगोल विषयाचा पेपर होता. बीड येथे वैद्यनाथ महाविद्यालयातील प्राचार्याने चुकीचे वेळापत्रक दिल्यामुळे 55 विद्यार्थ्यांना भूगोलाच्या पेपरला मुकावे लागले. ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, चुकीचे वेळापत्रक देणाऱ्या प्राचार्यावर कारवाई करण्यात यावी आणि 55 विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेला बसण्याची संधी द्यावी. या संदर्भात तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे, अशी माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे.

--------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे

**मु.शी.:** राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनील तटकरे,माणिकराव ठाकरे, जयंत प्र. पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, अमरसिंह पंडित, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संदीप बाजोरिया, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री अब्दुल्लाखान दुर्राणी, सुभाष झांबड, अशोक ऊर्फ भाई जगताप, आनंदराव पाटील, हरिसिंग राठोड, चंद्रकात रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु...)

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहात नियम 260 अन्वये राज्यातील दुष्काळी परिस्थिती संदर्भात जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सभागृहात राज्यातील तीव्र दुष्काळाच्या परिस्थितीवर चर्चा सुरु आहे. सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित नाहीत, ते कदाचित खालच्या सभागृहात उत्तर देण्याच्या उद्देशाने तेथे उपस्थित असतील. परंतु या सभागृहाचे नेते श्री.एकनाथराव खडसे साहेब जे महसूल, कृषी आणि मदत कार्य विभागाचे मंत्री आहेत, ते देखील सभागृहात उपस्थित नाहीत. तसेच अधिकारी गॅलरीमध्ये संबंधित विभागांचे प्रधान सचिव देखील उपस्थित दिसत नाहीत. या सर्व गोष्टीवरुन दुष्काळाच्या परिस्थिबाबत सरकारला किती गांभीर्य आहे हे दिसून येते. कालच माननीय राज्यपालांनी त्यांच्या अभिभाषणामध्ये हे सरकार अतिशय संवेदनशील आहे, अशा प्रकारचा उल्लेख केला. या सरकारला कोणत्याही प्रकारच्या संवेदना नाहीत. राज्यात भीषण दुष्काळी

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

परिस्थिती निर्माण झाली असताना आणि त्यासंबंधी सदनामध्ये चर्चा सुरु असताना सभागृहाच्या नेत्यांनी सभागृहात उपस्थित राहू नये यावरुन या प्रश्नाबाबत सरकारला किती गांभीर्य आहे हे स्पष्ट होते.

सभापती महोदय, काही भागात अतिवृष्टी होते तर काही भागात अपुरा पाऊस पडतो त्यामुळे ओला किंवा सुका दुष्काळा पडतो. अशाप्रकारच्या घटना यापूर्वी घडलेल्या आहेत. सन 1972 मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी जे निर्णय घेतले त्याचा उल्लेख आपण येथे वारंवार करतो. आज राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडलेला आहे. यापूर्वी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती कधीही ढासळली नव्हती इतकी त्यांची परिस्थिती ढासळलेली आहे. राज्यात इतक्या मोठ्यात प्रमाणात शेतकऱ्यांच्या कधीच आत्महत्या झाल्या नव्हत्या. अशा संकटाच्या परिस्थितीमध्ये शासनाने मदतीची भूमिका घ्यायला पाहिजे.

सभापती महोदय, आज आपल्या सर्वांना मराठवाड्यातील दुष्काळाची तीव्रता दिसत आहे. सरकार त्या ठिकाणी पाण्याचे नियोजन कशाप्रकारे करणार आहे त्याबाबत कुठेही स्पष्टता नाही. आज महाराष्ट्रातील धरणांमध्ये फक्त 31 टक्के पाणी साठा आहे. परंतु मराठवाड्यातील धरणांमध्ये फक्त आठ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. पुढील तीन-चार महिन्यामध्ये हे आठ टक्के पाणी लोकांना कशाप्रकारे उपलब्ध करुन देणार आहात हा गंभीर प्रश्न शासनासमोर आहे. परंतु त्याबाबतचे कोणतेही नियोजन शासनाकडून होताना दिसत नाही.

सभापती महोदय, मराठवाड्यामध्ये दुष्काळी परिस्थिती आहे. त्या ठिकाणी जनावरांसाठी चारा उपलब्ध नाही. मराठवाड्यात चारा उपलब्ध नसल्यामुळे राज्यातील इतर भागांतून चारा उपलब्ध करुन देण्यात येईल अशाप्रकारची वक्तव्ये माननीय मुख्यमंत्री आणि मंत्री महोदयांनी केल्याचे आम्ही ऐकली आहेत. परंतु प्रत्यक्षात त्या ठिकाणी काय परिस्थिती आहे, तेथे चारा निर्माण करण्याची परिस्थिती आहे काय किंवा तसा प्रयत्न केला आहे काय ? याबाबत काहीही उपाययोजना केल्याचे आम्हाला दिसून आले नाही. आम्ही अमुक इतका चारा उपलब्ध करुन दिला अशी फक्त

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

आकडेवारी सांगायची. मागेल त्याला छावणी देण्यात येतील असे सांगायचे परंतु प्रत्यक्षात अर्ज आल्यावर चारा छावणी द्यायचे नाही. आपण भूम व परांडा येथे छावण्या दिल्या. काही ठिकाणी चारा छावण्या दिल्या नसताना त्या दिल्या असे सांगण्यात आले. काही ठिकाणी चारा छावण्या सुरु असताना त्या बंद करण्यात आल्या. जिल्हाधिकारी किंवा प्रशासन सरकारला चुकीची माहिती देतात आणि त्यानुसार सरकार निर्णय घेते. माननीय मंत्री प्रत्यक्ष घटना स्थळी जाऊन पाहणी करतात किंवा कसे याची सुद्धा शंका येते. उन्हाळा तोंडावर असताना आणि चारा छावण्याची गरज असताना चारा छावण्या बंद करण्याचा निर्णय शासन घेते, याला काय म्हणावे ?

सभापती महोदय, राज्यात दुष्काळ असल्यामुळे त्या-त्या भागात रोजगार देण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपण मनरेगाच्या माध्यामातून मोठ्या प्रमाणात रोजगार देण्याचा प्रयत्न करतो. परंतु परभणी, बीड, उस्मानाबाद या जिल्ह्यांत मनरेगाच्या माध्यमातून जी कामे घेण्यात आली ती मजुरांना कमी आणि कंत्राटदारांना जास्त प्रमाणात दिली जात आहेत. काही घोटाळे झाले तर ते आमच्यावर येईल या भीतीने तेथील अधिकारी सुट्टीवर गेले आहेत.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जलयुक्त शिवार योजना जाहीर केली. या योजनेच्या माध्यमातून वर्षाला पाच हजार गावे आणि पुढील पाच वर्षात 25 हजार गावे दुष्काळमुक्त करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. ही योजना राबविण्यासाठी त्यांनी शिरपूर पॅटर्नचा आधार घेतला. सन्माननीय सदस्य श्री.अमरिश पटेल यांच्या मतदारसंघामध्ये शिरपूर पॅटर्न राबविण्यात आला आहे. सन्मानीय सदस्य श्री.अमरिश पटेल यांनी सूतगिरण्यांच्या माध्यमातून किंवा अन्य संस्थेच्या माध्यमतून सेवानिवृत्त झालेले भूवैज्ञानिक श्री.खानोलकर यांना सोबत घेतले व या कामासाठी पोकलेन आणि ट्रक उपलब्ध करुन दिले.

यानंतर श्री.बोर्डे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

त्या ठिकाणी कामाला सुरुवात झाली आणि त्या जमिनीत पाणी आले. त्या ठिकाणी कोरडवाहू असलेला बराचसा भाग ठिबक सिंचन आणि इरिगेशनच्या माध्यमातून सुजलाम् सुफलाम् झाला. शिरपूर पॅटर्न महाराष्ट्रात राबवावयाचा आणि महाराष्ट्र दुष्काळमुक्त करावयाचा असा उद्देश कदाचित माननीय मुख्यमंत्र्यांचा असू शकेल. या माध्यमातूनच माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भातील घोषणा केली असावी. शिरपूर पॅटर्न आणि जलयुक्त शिवार अभियानामध्ये जी कामे घेतली जातात त्यामध्ये जमीन-अस्मानचा फरक आहे. या माध्यमातून आपल्याला कामे झालेली दिसतील, परंतु त्यामुळे दुष्काळ हटणार नाही. काही दिवसांनी त्या ठिकाणी पाणी साठणार नाही, पाणी झिरपणार नाही किंवा विहिरीला सुध्दा पाणी येणार नाही. मी स्वत: या विषयी श्री.खानोलकरांशी चर्चा केली. त्यांनी मला सांगितले की, मी प्रत्यक्षपणे तेथील कामांची पाहणी करण्यासाठी गेलो होतो. त्यांनी सांगितले की, नाला खोल करीत असताना त्या ठिकाणच्या संपूर्ण रेती व मुरुमाचा लेअर ज्यातून पाणी जमिनीमध्ये झिरपू शकते ते खुले करण्याची आवश्यकता आहे. ते लेअर खुले केल्यानंतरच त्या जमिनीमध्ये पाणी झिरपू शकते आणि एक-दीड किलोमीटर पर्यंत ते पाणी जाऊ शकते. परंतु त्या पाण्याचा तेवढा दबाव आणि पाण्याचा मोठा साठा करुन ते लेअर खुले करेपर्यंत जमिनीमध्ये पाणी जिरु शकत नाही. या गोष्टी त्यांनी राज्य सरकारला भूवैज्ञानिक म्हणून एकदा नव्हे अनेक वेळा स्पष्टपणे सांगितलेल्या आहेत. परंतु तरी सुध्दा आपण गाव शिवार योजना घेत आहात. गाव शिवार योजनेमध्ये 9 फुटाच्या खाली जाऊ नका असे सांगितले जाते. परंतु 9 फुटामध्ये कुठेही पाणी झिरपण्याची शक्यता फार कमी असते. एखाद्या विहिरीला पाणी लागले तर मी चांगले काम केले म्हणून अधिकारी तीच विहीर दाखविण्यासाठी नेतात. परंतु संपूर्ण जमिनीचा स्ट्राटा कसा आहे, त्याची भूवैज्ञानिकांच्या माध्यमातून तपासणी केली जाते का, हा सुध्दा महत्त्वाचा भाग आहे. मी तर म्हणेन की, जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला जात आहे. त्यामुळे त्या गावांतील दुष्काळ संपणार नाही, परंतु पैसा मात्र खर्च होईल.

सभापती महोदय, राज्याच्या धर्तीवर केंद्र सरकारने मनरेगा योजना देशात सुरु केली. यामागे कल्पना होती की, महाराष्ट्रात जशी रोजगार हमी योजना आहे तशी योजना संपूर्ण देशात लागू करावी. म्हणून कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या श्रीमती सोनीया गांधी यांनी तशा प्रकारचे सूचीत केले.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

मनरेगा सारख्या महत्त्वपूर्ण योजनेवर आमच्या केंद्र सरकारने प्रचंड निधी राखून ठेवला होता. प्रत्येक राज्याने त्या योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त पैसे उचलले. या योजनेसाठी पैसा कमी पडू दिला जात नव्हता. यावेळी सुध्दा केंद्र सरकारला अर्थसंकल्पामध्ये त्याच योजनेला पुढे न्यावे लागले. माननीय पंतप्रधान श्री.मोदीजींना सुध्दा त्याच योजनेवरील निधी वाढवावा लागला. परंतु यामध्ये आमच्या राज्याचा वाटा किती आहे, आपल्या राज्याला या योजनेमध्ये जो वाटा मिळावयास पाहिजो तो मिळतो काय, तो वाटा मिळण्यासाठी राज्य सरकारकडून प्रयत्न केले जातात काय ? नाही. आपल्या राज्य सरकारने या योजनेप्रती मागच्या वर्षापासून अत्यंत उदासीनता दाखविण्यास सुरवात केली आहे. सभापती महोदय, आमचे सरकार असताना मनरेगाच्या माध्यमातून आपल्या राज्याला 1200-1300 कोटी रुपयांपर्यंत निधी येत होता. परंतु अजूनही आपण यापुढे जाऊ शकलो नाही. आपल्या आजूबाजूची राज्ये 2500-3000 कोटी रुपयांपर्यंत निधी घेऊ जात आहेत. प्रत्येक राज्याचे मुख्यमंत्री या योजनेतून अधिकाधिक निधी खेचून नेत आहेत. या माध्यमातून आपण राज्याचा विकास करु शकतो आणि पाणी संचित करु शकतो त्यामुळे अनेक जण याकडे लक्ष केंद्रित करतात. ओरिसा राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.पटनायक हे दिल्लीला गेल्यानंतर ते पहिली भेट मनरेगाच्या विभागाला देतात. त्यांची आग्रही मागणी असते की, या योजनेतून आमच्या राज्याला जास्त पैसा का दिला नाही. आपल्या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी, माननीय मंत्र्यांनी त्या कार्यालयाला भेट दिल्याचे मला वाटत नाही. आमच्या राज्याला वर्षाला 1200-1300 कोटी नव्हे तर 3 ते 4 हजार कोटी रुपये मिळायला पाहिजे हे सांगण्यासाठी माननीय मुख्यमंत्री वा मंत्री महोदय तेथे गेल्याचे दिसत नाही. यामध्ये शासनाची उदासीनता दिसून येते. मुळात माननीय मुख्यमंत्री हे रोजगार हमी योजना समितीचे अध्यक्ष असतात. या योजनेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही योजनेतून एवढ्या प्रचंड प्रमाणावर केंद्र सरकारकडून आपल्याला निधी मिळत नाही. दीड वर्षापूर्वी नवीन राज्य सरकार सत्तेवर आले. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली एकदाही रोजगार हमी योजनेच्या बाबतीत बैठक घेतलेली नाही. एका बाजूला जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून 24 हजार गावांना दुष्काळमुक्त करणार असे सांगायचे आणि दुसऱ्या बाजूला त्या बाबतीत नियोजन मात्र केले जात नाही. आपण शिरपूर पॅटर्न स्वीकारले असले तरी त्या पध्दतीने

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

नियोजन किंवा काम सुरु नाही, ही वस्तुस्थिती आहे. राज्यात किती पाऊस पडतो, त्यातील किती पाणी अडवावयास पाहिजे, शेवटी कुठे पाणी अडवावयास पाहिजे या संदर्भात कसल्याही प्रकारचे नियोजन नाही. जलयुक्त शिवार अभियानाची कामे करण्यापूर्वी ठेकेदारांना सिमेंटचे प्लग करण्याबाबत सांगितले जाते. त्यानंतर शेतीमध्ये पाणी अडविण्याची, बांधावर पाणी अडविण्याची किंवा पाणी झिरपत आणण्याची कोणतीही व्यवस्था कुठेही केल्याचा उत्साह अधिकारी दाखवित असल्याचे चित्र दिसत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, आम्ही या योजनेसाठी कुठेही पैसा कमी पडू देणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी गाव शिवार योजनेसाठी 1100 कोटी रुपये जाहीर केले होते. परंतु प्रत्यक्षात अर्थसंकल्पामध्ये 200 कोटी रुपये ठेवले. ज्यावेळी रोजगार हमी योजना आपल्या राज्यात लागू केली, त्यावेळी ती योजना राबविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे कर जमा केले. परंतु नंतर आमच्या सरकारने हा कर योजनेच्या अंमलबजावणीसाठी एकत्र करुन त्या बाबत कायदा केला. त्यासाठी एक तरतूद केली. 2 हजार कोटी रुपये रोजगार हमी योजनेखाली खर्च केले पाहिजे अशा प्रकारची कायद्यात तरतूद केली. परंतु या सरकारकडून सांगताना 1100 कोटी रुपये देतो असे सांगायचे आणि प्रत्यक्षात अर्थसंकल्पामध्ये मात्र केवळ 200 कोटी रुपयांची तरतूद करायची हे योग्य नाही. गाव शिवार योजना ही राज्याची आहे आणि राज्याने ही योजना आणली अशा प्रकारचा अविर्भाव निर्माण करुन जनतेला सांगितले जाते की, आम्ही 24 हजार गावे दुष्काळमुक्त करणार आहोत. गाव शिवार योजना हे भ्रष्टाचाराचे कुरण झाले आहे. राज्यात शिरपूर पॅटर्न अंतर्गत वेगळ्या प्रकारचे काम सुरु आहे. परंतु याकडे कोणाचे लक्ष नाही. या योजनेच्या माध्यमातून आपण जनतेला सांगता की, आम्ही राज्य दुष्काळमुक्त करू. परंतु हे फसवेपणाचे आहे, हे मी या निमित्ताने लक्षात आणून देतो.

महोदय, आज पाण्याचा प्रश्न हा सर्वात महत्त्वाचा आहे. आज मराठवाड्यात पिण्यासाठी पाणी नाही. त्या भागात पाण्याचे नियोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

मराठवाड्यातही दुष्काळ आहे. आपण विदर्भातील परिस्थितीचा बारकाईने विचार केला पाहिजे की, मागच्या 2-3 वर्षांत पश्चिम विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात आत्महत्या का होत आहेत ? आपण राज्याचा एकत्रितपणे विचार करतो, त्यावेळी असे दिसते की, शेतकरी आत्महत्या करेपर्यंत पोहचला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थोडक्या नाहीत. अमरावती विभागाच्या पश्चिम भागातील 4/5 जिल्ह्यांत दीड हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. पश्चिम विदर्भाचे असे चित्र आहे. पश्चिम विदर्भ कापसाचा प्रदेश आहे. शेतकऱ्यांनी कापूस पाहिजे तसा होत नाही, पाहिजे तसे चार पैसे मिळत नाहीत, त्यासाठी कॅश क्रॉप म्हणून सोयाबीन लावले आणि काय परिस्थिती निर्माण झाली ते पहा. मागच्या 2-3 वर्षांपासून सोयाबीनला कुठेही साथ मिळालेली नाही. यावर्षी सोयाबीनचे जेवढे बियाणे लावले तेवढे सुध्दा निघाले नाही. शेतकऱ्यांनी अपेक्षेने सोयाबीन लावले की, आम्हाला यातून कापसापेक्षा बऱ्यापैकी आर्थिक लाभ मिळेल. पण यामुळे शेतकरी पूर्णपणे पहिल्यापेक्षा खचून गेला. सोयाबीनला पूर्वीच्या वर्षीपेक्षा कमी भाव मिळाला. एकीकडे उत्पादन नाही तर दुसरीकडे भाव नाही. कापसाच्या संदर्भातही तीच अवस्था आहे. सांगितले गेले की, तेथील कापसाचे उत्पादन वाढले. केंद्रावर जास्त कापूस आला. पहिल्यापेक्षा कापूस वाढला असेल तर तो सिंचनाची व्यवस्था असलेल्या भागांमध्ये वाढला. कोरडवाहू जमिनीत बहुसंख्य शेतकऱ्यांचा कापूस वाढलेला नाही. उलट कापसाचा पेरा कमी झालेला आहे. शेतकऱ्यांना उत्पादन देखील मिळालेले नाही. भावसुध्दा ढासळले आहेत. 2-3 वर्षांपासून शेतकऱ्यांवर आर्थिक दबाव आलेला आहे. त्यामुळे तेथील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेतकऱ्यांकडे शासनाचे कोणत्याही प्रकारचे लक्ष नाही. मागच्या वेळी नागपूरच्या अधिवेशनात सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विचारले होते की, पॅकेज जाहीर केले, त्या प्रमाणात तूट किती लावली, किती पैसा जाहीर करीत आहात, प्रत्यक्षात काय देत आहात, लोकांना काय सांगत आहात ? माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांनी जाहीर केले की, आम्ही दुबार पेरणीकरिता दीड हजार रूपये देऊ. राज्यातील कोणत्याही शेतकऱ्यांना 1 पैसा सुध्दा दुबार पेरणीकरित मिळालेला नाही. माननीय संसदीय कामकाज मंत्री म्हणून सदन चालविण्यापेक्षा सदनात मांडलेले प्रश्न सुटले पाहिजेत म्हणून मंत्रिमंडळात चर्चा केली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

पाहिजे. कोणत्याही शेतकऱ्यांना 1500 रूपये दिलेले नाहीत. फक्त माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेब यांनी घोषणा मंत्री म्हणून सांगायचे की, आम्ही असे करीत आहेत, शेतकऱ्यांना माननीय मंत्री मदत करीत आहेत. आता परत अवकाळी पावसाच्या संदर्भात घोषणा करून टाकली आहे की, सर्व देऊ. प्रत्येक वेळी घटनेनंतर माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांची घोषणा आणि ती घोषणा 'फूस' काहीच होत नाही. शेतकऱ्यांच्या पदरी काहीही पडलेले नाही.

सभापती महोदय, सन 1972 पासून सन 2000 पर्यंत कापूस एकाधिकार योजना होती. मात्र व्यापाऱ्यांनी दिलेला भाव अधिक असायचा. त्यामुळे कापूस एकाधिकाराची मागणी फारशी कोणी करीत नव्हते. कापूस फेडरेशन सुरू करा, कापूस पर्चेसिंग करून भाव ठरवून द्या, बोनस द्या हे कधी केले जात नव्हते. राज्यातील 2-4 वर्षांपासूनची परिस्थिती अशी आहे की, व्यापारी कमी भावात कापूस खरेदी करू लागला आहे. आज शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च सुध्दा निघू शकत नाही, इतका कमी भाव कापसाला मिळत आहे. आज शासनाने तशा प्रकारची कापूस खरेदी करण्याची व्यवस्था उभी केली पाहिजे हाती. परंतु त्या संदर्भात कोणतेही भाष्य करण्यास शासन तयार नाही. इतर महाराष्ट्रात देखील तशीच स्थिती आहे. सोयाबीनचेही तसेच आहे. कापसाला कुठेही भाव नाही. कापूस खरेदीची व्यवस्था नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत शेतकरी उन्हाळी पीक घ्यावे, भाजीपाला काढावा, केळी, संत्री पिकवावी, त्याला तरी चार पैसे मिळतील, इतर ओलिताखालील पिकांच्या माध्यमातून तरी 4 पैसे घरात येतील या अपेक्षेने बसला होता. परंतु काय परिस्थिती झाली आहे हे आपण पाहत आहात. शेतकऱ्यांनी भाजीपाला टाकून दिला आहे. कवडीमोल भावही मिळालेला नाही. भाजीपाला लागवडीचा खर्च सुध्दा निघाला नाही. विजेचे बिलसुध्दा तो देऊ शकलेला नाही.

सभापती महोदय, नागपूरला आपले अधिवेशन असताना कोणी व्यापारी संत्री घ्यायला तयार नाही अशी स्थिती होती. आपल्याला माहीत आहे. शेतकरी रस्त्यावर संत्र्याचे ढीग लावून जागरण करीत बसला होता. काही 4 पैसे मिळाले पाहिजे असे त्याला वाटत होते. 10-15-20 रूपये डझन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

या भावाने संत्री जात होती. परंतु असे देऊन सुध्दा घेणारे कोणी नव्हते. संत्रा पिकविणाऱ्यांचीही अवस्था आपण डोळ्यांनी अधिवेशनाच्या वेळी पाहिली आहे. जळगावच्या केळी उत्पादकांनीही रस्त्यावर केळी फेकली. केळीला, कांद्याला भाव मिळाला नाही.

सभापती महोदय, आमच्याकडे शेतकऱ्यांनी रताळे लागवड केली. रताळे निघू लागली. काढणीचा खर्च 250 रूपये आणि 1 पोते रताळे 100 रूपये अशी अवस्था होती. शेतकऱ्यांनी काय पिकवायचे, कसे जीवन जगायचे, त्यातून कसा मार्ग काढायचा हा प्रश्न निर्माण झाला आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, चारा नाही. रोजगार हमी योजनेची कामे नाहीत. पाहिजे त्याला काम देऊ शकत नाही. शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था डबघाईला आली आहे. कोणत्याही कृषी मालाला राज्यात भाव नाही. आपले जीवन कसे जगावे हा प्रश्न राज्यातील शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. संपूर्ण शेतकरी होरपळून निघत आहे. मात्र आपले निरनिराळे माननीय मंत्री निरनिराळे स्टेटमेंट देत आहेत. शेतकऱ्यांच्या जखमेवर चोळणारी स्टेटमेंट माननीय मंत्र्यांकडून होत आहेत. कालच माननीय मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे नागपूरला म्हणाले की, विदर्भात काही तेवढा दुष्काळ नाही. शेतकरी काय आहे, दुष्काळ काय आहे हे त्यांना काय समजणार आहे ? कोणीही माननीय मंत्री विदर्भातील शेतीशी संबंधित नाहीत. शेतीमध्ये काय असते, कसे उत्पन्न निघते, कसा भाव दिला पाहिजे, आर्थिक स्थिती काय आहे, बँकेकडून त्याला कर्ज मिळते की नाही, किती वंचित आहेत, कर्ज न मिळाल्यामुळे तो शेती करू शकतो की नाही हे त्यांना माहीत नाही. शेतकऱ्यांच्या मुलाबाळांची स्थिती काय आहे हेही त्यांना माहीत नाही. आत्महत्या झालेल्या शेतकऱ्याच्या घरात 2 महिन्यात त्याच्या पत्नीला सुध्दा आमहत्या करावी लागली आहे. हे उदाहरण विदर्भातील आहे. यवतमाळमधील पिंपरी गावात माननीय मुख्यमंत्री गेले होते, त्याच घरात महिन्याभरात शेतकऱ्याच्या पत्नीने आत्महत्या केली. मी आता कसा चरितार्थ चालवू, मला कर्ज मिळालेले नाही, या विचाराने त्या महिलेने, भगिनीने आत्महत्या केली. विदारक असे दृश्य आहे. आपण योजना काढत आहोत. मात्र शासनावर कुठेही अंकुश नाही असे चित्र राज्यात निर्माण झाले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे........

सभापती महोदय, मंत्री महोदयांमध्ये कशा प्रकारची चर्चा सुरु आहे, या बाबतचा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या भाषणात केला आहे. त्यांच्यामध्ये कशा प्रकारची कुजबुज सुरु आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. संसदीय समित्यांच्या बैठकांना दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उपस्थित असतात. त्या ठिकाणी ते सांगतात की, आमचे काही खरे नाही. सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून, मंत्री महोदयांकडून अशा प्रकारची प्रतिक्रिया का यावी ? कारण, या सरकारचे नियंत्रण सुटलेले आहे. कोणत्या योजनेला लोकांचा प्रतिसाद मिळणार आहे, कोणती योजना लाभदायक ठरणार आहे, हे सरकारला कळेनासे झाले आहे.

सभापती महोदय, अलीकडेच सरकरने मागेल त्याला शेततळे, ही योजना जाहीर केली आहे. या योजनेसाठी 50 टक्के शेतकऱ्यांचा हिस्सा आणि 50 टक्के सरकारची सबसिडी, असे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे की, शेतामध्ये आलेले पाणी जर प्लॅस्टिकच्या सहाय्याने साठवून ठेवले तर ते वर्षभर टिकेल. पण सरकारची ही योजना प्लॅस्टिकशिवाय आहे. आता कदाचित आपण सुधारणा करीत असाल. पण सरकारच्या या योजनेचा शासन निर्णय माझ्याकडे आहे. माझ्या जिल्ह्याचा अनुभव असा आहे की, गेल्या दोन महिन्यापूर्वी या योजनेचा शासन निर्णय निघाला असताना आतापर्यंत एकाही शेतकऱ्याने या योजनेसाठी अर्ज केलेला नाही. त्याचे कारण हे आहे की, ही योजना प्लॅस्टिकविरहित आहे आणि शेतकऱ्याने 50 टक्के पैसे भरावयाचे आहेत. या शासन निर्णयानुसार शासनाचा उद्देश असा असावा की, शेतामध्ये जिरलेले पाणी जवळच्या विहिरींना लागेल. परंतु, मला हे निदर्शनास आणावयाचे आहे की, आपण शेतामध्ये बंडिंगची कामे करीत आहोत, त्यामुळे शेतातील पाणी अन्य कोठेही वाहून जात नाही, ते शेतातच जिरते. मग अशा प्रकारे प्लॅस्टिकविरहित शेततळे घेऊन आणखी किती पाणी आपण शेतात जिरवू शकणार आहोत ? प्लॅस्टिक टाकले तरच पाणी वर्षभर पुरु शकेल आणि शेतकरी हॉर्टिकल्चरच्या माध्यमातून उत्पन्न घेऊ शकणार आहे. आपण नगर जिल्ह्यामध्ये किती तरी प्लॅस्टिकसह बांधलेली शेततळी पाहिली असतील, चंद्रपूर भागात पाहिली असतील. अशी शेततळी अनेक भागात आहेत व त्याचा फायदाही शेतकऱ्यांना होत आहे. मग

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे......

शासनाने ही प्लॅस्टिकविरहित शेततळी कोणत्या उद्देशाने करावयाची ठरविली आहेत, याबाबत देखील या ठिकाणी खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शेतकरी आपल्या शेतामधून उत्पन्न काढण्याचा प्रयत्न करीत असतो. चांगले उत्पन्न काढावयाचे असेल तर औषध फवारणी आणि अन्य गोष्टींसाठी शेतकऱ्याकडे चार पैसे असले पाहिजेत. परंतु, गेल्या तीन-चार वर्षांपासून दुष्काळी परिस्थिती आहे, उत्पादन नाही आणि म्हणून उत्पन्न नाही, शेतमालाला भाव नाही. त्यामुळे आज त्याची अशी परिस्थिती नाही की, तो शेतीला चार पैसे लावू शकेल. त्याची तेवढी आर्थिक शक्ती राहिलेली नाही. आज तो कर्जबाजारीही झालेला आहे.

सभापती महोदय, आपल्या सर्वांना माहीत आहे की, माननीय श्री.अ.र.अंतुले हे मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील छोट्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले होते. राज्यातील लाखो शेतकरी प्रवाहामध्ये नाहीत, ते कोठे तरी थांबलेले आहेत, त्यांना बँकांमधून कर्ज मिळत नाही, ते शेती करु शकत नाहीत, त्यांची कर्जे माफ केली तर ते शेतकरी मूळ प्रवाहामध्ये येऊ शकतील आणि त्यामुळे त्यांनी कर्जमाफीचा निर्णय घेतला. त्यानंतर काँग्रेस पक्षाच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखाली आणि सन्माननीय श्री.शरदचंद्र पवार साहेब कृषी मंत्री असताना त्यांनीही जे शेतकरी प्रवाहामध्ये नाहीत, थांबलेले आहेत, ज्यांची आर्थिक स्थिती डबघाईस आलेली आहे, ज्यांना कर्ज मिळू शकत नाही, ज्यांना राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज पुरवठा होऊ शकत नाही, ज्यांची कर्जे माफ केल्याशिवाय भविष्य सुधारु शकणार नाही, अशा शेतकऱ्यांच्या 71 हजार कोटी रूपयांच्या कर्जमाफीचा अतिशय महत्वपूर्ण निर्णय घेतला होता. त्यामुळे मोठ्या संख्येने शेतकरी पुन्हा बँकेकडे येऊ लागले, त्यांना कर्ज मिळू लागले आणि ते शेतीमधून उत्पन्न काढू लागले. त्या नंतरच्या कालावधीत ही तात्पुरती उपाययोजना आहे, किती शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली आहे, किती आत्महत्या आपण थांबवू शकलो आहोत, असे प्रश्न विचारले जाऊ लागले. परंतु, मी आपल्याला सांगू इच्छितो की, गेल्या चार वर्षापासून सतत दुष्काळी परिस्थिती आहे, अपुरा पाऊस पडलेला आहे, अतिवृष्टी आहे, गारपीट झालेली आहे व त्यामुळे मोठ्या संख्येने शेतकऱ्यांचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नुकसान झाले आहे. शेतकरी पुन्हा आर्थिक संकटात सापडला आहे. त्यांना आज बँकांच्या

...3....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे........

माध्यमातून कर्ज मिळू शकत नाही. म्हणून आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत की, कर्जमाफी करावी. आम्हाला जाणीव आहे की, आम्ही जर ही मागणी करीत आहोत तर आमचे सरकार आल्यानंतर प्रथम आम्हाला कर्जमाफीची घोषणा करावी लागणार आहे. कोणत्याही राष्ट्रीय स्तरावरील पक्ष, राज्य सरकारमधील, सत्तेमधील असणारा किंवा सत्तेमधून जाणारा पक्ष असला तरी त्यांच्याकडून अशा प्रकारची मागणी फार विचारपूर्वक केली जात असते. आम्ही कर्जमाफीची मागणी करीत आहोत याचा अर्थ असा आहे की, आमचेही शासन आल्यानंतर आम्हाला सर्वात अगोदर कर्जमाफी करावी लागेल. म्हणूनच आम्ही व्यापक प्रमाणावर कर्जमाफीसंबंधीचे आंदोलन चालवीत आहोत. कारण, आज तशी स्थिती आहे. व्याज माफी करावी, पुनर्वसन करावे, अशी मागणी आम्ही केलेली नाही. सध्याची परिस्थिती अतिशय बिकट आहे. गेल्या चार वर्षापासून नापिकी, अपुरा पाऊस, अतिवृष्टी या परिस्थितीत शेतकरी वेढला गेला आहे. त्यामुळे यामधून कर्जमाफीशिवाय दुसरा कोणताही मार्ग असू शकत नाही. याकडे आपण या दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, अनेक बाबतीत असा प्रश्न पडतो की, एकदा निर्णय घेतल्यानंतर शासन त्यावर ठाम का रहात नाही ? सरकारला राजकारण का करावे लागते, जगलरी का करावी लागते ? घोषणा करायच्या आणि नंतर बनवाबनवी करायची, हे बरोबर नाही. दुष्काळी काळात आपण जनतेबरोबर, शेतकऱ्यांबरोबर अशा प्रकारे बनवाबनवी करीत असाल तर जनता आपल्याला माफ करणार नाही. संपूर्ण राज्यातील 24 हजार गावात दुष्काळ आलेला आहे, असे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते. ज्यावेळी देशाचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले की, यानंतर 50 टक्के आणेवारी ऐवजी 67 टक्के आणेवारी खालच्या शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्यात येईल. ही घोषणा आपण सर्वांनी ऐकली आहे आणि वर्तमानपत्रातून वाचलीही आहे. केंद्र सरकारकडून तशा प्रकारचे आदेश देखील निर्गमित झाले आहेत. केंद्र सरकारने एप्रिल, मे, 2015 च्या दरम्यान हे आदेश राज्य शासनाला पाठविले आहेत.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

आम्हाला आनंद वाटला की, अशा प्रकारे आदेश दिले गेले असतील तर विदर्भातील अनेक गावांचा त्यामध्ये समावेश होईल, विदर्भातील अनेक गावे आणेवारीमध्ये येतील, आमच्या भागात दुष्काळ सदृश परिस्थिती जाहीर होईल. परंतु, शासनाने पुन्हा आपले शब्द फिरविले. केंद्र शासनाचा आदेश तोच होता. राज्य शासनाने केंद्राच्या आदेशाप्रमाणे जे आदेश दिले होते त्या संदर्भात राज्य शासनाने जानेवारीमध्ये पुन्हा शासन निर्णय निर्गमित केला की, 50 टक्क्याच्या आत आणेवारी असलेल्या गावांचाच यादीमध्ये समावेश करावा आणि दुष्काळ सदृश परिस्थितीमध्ये त्याच गावांना मदत दिली गेली पाहिजे. त्यातून कापूस पीक वगळण्यात आले. कापसाला मदत मिळणार नाही, ज्या ठिकाणी विमा काढला असेल त्या ठिकाणी मदत मिळणार नाही, मागील वेळी ज्या पिकांसाठी मदत मिळाली त्याही ठिकाणी मदत मिळणार नाही, मग मदत कोणाला देण्याबाबतचा शासन निर्णय आहे ? एकीकडे तुम्ही म्हणता की, 67 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असणाऱ्या सरसकट गावांना मदत करावी, केंद्र शासन तसा शासन निर्णय निर्गमित करते, माननीय पंतप्रधान घोषणा करतात आणि टाळ्या मिळवितात. परंतु, नंतर 50 टक्के नाही तर त्यातून सुद्धा काही पिके वगळण्याचे काम राज्य शासन करीत आहे. तुम्ही किती दिवस शेतकऱ्यांना फसविणार आहात ? यवतमाळ जिल्ह्यात सर्वात जास्त आत्महत्या झालेल्या आहेत. मागील वर्षी यवतमाळ जिल्ह्यात 272 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या आणि यावेळी शासनाच्या रेकॉर्ड प्रमाणे एवकट्या यवतमाळ जिल्ह्यात 400 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. असे असताना यवतमाळ जिल्ह्यातील किती गावे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आली ? यवतमाळ जिल्ह्यातील फक्त 2 गावांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला. माननीय महसूल राज्यमंत्री आमच्या जिल्ह्यातील आहेत. आमच्या जिल्ह्यातील फक्त 2 गावांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला आणि त्यासाठी फक्त 5 लाख रुपये मदत आलेली आहे. माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब बुलडाणा जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्या जिल्ह्यात 250 कोटी रुपये आले. परंतु, आमच्या पालकमंत्री महोदयांना ते जमले नाही की काय, असे आम्हाला वाटते. नंतर आमच्या जिल्ह्यातील जी यादी पाठविण्यात आली ती यादी नामंजूर करण्यात आलेली आहे. म्हणजे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांवर शासन कशा

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

प्रकारे अन्याय करीत असेल आणि जी गावे आणेवारीमध्ये येत असताना ती वगळण्याचा प्रयत्न होत असेल तर यापेक्षा दुसरे दुर्दैव असू शकत नाही. शासनाच्या या निर्णयामुळे विदर्भातील जवळपास 10 हजार गावे वंचित राहिलेली आहेत. त्या भागातील शेतकरी आत्महत्या करतात. मागील 3 वर्षापासून कोणतेही उत्पादन मिळत नाही. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नाही. आज शेतकरी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये जीवन जगत आहेत. जलयुक्त शिवार योजना ही फेल्युअर असलेली योजना राबविली जाते. भ्रष्टाचाराचे कुरण असलेली ही योजना आहे. शिरपूर पॅटर्न प्रमाणे कामे न होता 9 फुटापर्यंत विहिरी खोदल्याचे दाखववे, त्यातील 4 विहिरी दाखववयाच्या, त्या विहिरींना पाणी आहे किंवा नाही हे दाखववयाचे ? श्री.खानोलकर हे भूवैज्ञानिक आहेत. ते आरएसएसचे कट्टर कार्यकर्ते आहेत. माननीय श्री.भागत साहेब त्यांच्या घरी थांबले होते. त्यांनी माननीय श्री.भागवत साहेबांना सांगितले की, शिरपूर पॅटर्नच्या नावावर राज्यात जे काही सुरु आहे ते अत्यंत चुकीचे आहे. यामुळे काहीही साध्य होणार नाही. ते तत्काळ बंद केले पाहिजे आणि माननीय श्री.भागवत साहेबांनी तेथूनच मुख्यमंत्री साहेबांना फोन करुन सांगितले की, हे सर्व चुकीचे सुरु आहे. कदाचित, आरएसएसचा कार्यकर्ता तरी खोटे बोलणार नाही. मुख्यमंत्री महोदयांनी श्री.खानोलकर साहेबांना बोलावून त्यांच्या बरोबर एक तास चर्चा केली. मला श्री.खानोलकर साहेबांचा फोन आला की, आता शिरपूर पॅटर्न प्रमाणेच काम होईल आणि 8 दिवसात तशा प्रकारचा शासन निर्णय निर्गमित होईल. परंतु, अद्याप तो शासन निर्णय निर्गमित झाला नाही आणि तशा प्रकारे काम करण्याची शासनाची इच्छा देखील नाही.

सभापती महोदय, माझा सांगण्याचा उद्देश असा आहे की, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. त्या माध्यमातून सिंचनाची व्यवस्था होत असताना आणि आपल्या सर्वांच्या समोर त्याचे उदाहरण असताना शासनाला तशा प्रकारचा शासन निर्णय निर्गमित करण्यास कोणत्या अडचणी आहेत ? मुख्यमंत्री महोदयांना वाटते की, हे करावयास पाहिजे तर मग एक-दीड महिना होऊन देखील शासन निर्णय का निर्गमित झालेला नाही ? अद्यापही तशा प्रकारचा शासन निर्णय निर्गमित झालेला नाही. जलयुक्त शिवार योजना हे ठेकेदारीचे आणि भ्रष्टाचाराचे कुरण करुन ठेवलेले आहे. या योजनेच्या माध्यमातून 25 हजार गावे नाहीत तर केवळ 10 गावे सुद्धा जलयुक्त होणार नाहीत.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.........

अधिकारी कशा प्रकारे चांगले काम झालेले आहे हे दाखविण्यासाठी आपल्याला त्या ठिकाणी घेऊन जातील आणि सांगितील की, या विहिरींना पाणी आलेले आहे, त्या विहिरींना पाणी आलेले आहे. आपल्याला काही दिवस त्या विहिरींमध्ये पाणी दिसेल. परंतु, जोपर्यंत रेती किंवा मुरुमातील लेअर ओपन होत नाहीत, 30-40 फुटापर्यंत खोदकाम करीत नाही तोपर्यंत जमिनीमध्ये पाण्याचा साठा होऊ शकणार नाही. अशा चुकीच्या पद्धतीने योजना राबविली तर त्यावर प्रचंड खर्च झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून त्यादृष्टीकोनातून विशेष लक्ष देण्याची गरज आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या चांगल्या सूचना केलेल्या आहेत त्याचा शासनाने स्वीकार केला पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी सभागृहात चांगल्या सूचना मांडल्या तर शासनाने त्याची अंमलबजावणी का करु नये ? माननीय श्री.दिलीप कांबळे साहेब, फक्त नोंद केल्याने काही होत नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी चांगली सूचना केली. ती सूचना फार खर्चिक किंवा नाकारण्यासारखी नाही. परंतु, कोणी प्रतिक्रिया व्यक्त केल्या नाहीत. त्यांनी सांगितले की, मी काही वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मोफत भोजन देतो आणि त्यांच्या फीचे पैसे देखील भरतो. शासनाला वसतिगृहातील मुलींच्या शिक्षणासाठी महिन्याला काही निधी द्यावा लागतो, आपण तो पैसा त्या ठिकाणी देऊ शकलो नाही.....

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब आपण आणखी किती वेळ बोलणार आहात ? आपल्याला सायंकाळी 7.00 वाजता सभागृहाचे कामकाज संपवावयाचे आहे. आपण थोडक्यात मुद्दे मांडून आपले भाषण पूर्ण करावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, दुष्काळ निवारणासाठी जी पावले उचलण्यात आलेली आहेत ती योग्य आहेत किंवा नाही, आपण त्यावर विनाकारण खर्च करीत आहोत की काय, याही संदर्भात शासनाने अवलोकन केले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी त्या दृष्टीकोनातून ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचना शासनाने स्वीकारल्या तर त्यामध्ये काही कमीपणा आहे, असे मला वाटत नाही. मागील वेळी माननीय मुख्यमंत्री, माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी केलेली भाषणे आम्ही ऐकलेली आहेत. त्या सर्व भाषणांमध्ये जलयुक्त शिवार योजनेचा उल्लेख

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.माणिकराव ठाकरे.........

करण्यात आलेला आहे. मुख्यमंत्री महोदयांनी या योजनेमध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. कारण, सध्या शिरपूर पॅटर्नच्या माध्यमातून जी कामे सुरु आहेत ती तांत्रिकदृष्ट्या कितपत बरोबर आहेत याची एकदा पडताळणी केली तर जो अनाठायी खर्च होणारा आहे तो होणार नाही.

..2C-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.....

चुकीच्या पध्दतीने योजना राबविण्यात येत आहेत, प्रथम सिमेंट प्लगचे काम करुन घेण्यात येत आहे, कोणाला तरी कंत्राट दिले जाते, त्यामध्ये पाणी साठते किंवा नाही हे पाहण्यात येत नाही. त्यातून पाणी झिरपण्याची कोणतीही व्यवस्था करण्यात येत नाही. जमिनीत काय डाटा आहे, याबाबत भूवैज्ञानिक यांच्याकडून तपासणी न करता फक्त 9 फूट खोली करण्यात येते. अशा प्रकारची कोणतीही तपासणी न करता ही योजना राबविण्यात येत आहे. पूर्वी देखील अशा प्रकारची योजना राबविण्यात येत होती. शासनाने आता जलयुक्त शिवार योजना सुरु केली आहे, ही योजना 24 हजार गावांमध्ये राबविण्यात येणार आहे, या योजनेची कामे प्रत्यक्षात होतील किंवा नाही व त्या ठिकाणी पाण्याचा साठा होईल किंवा कसे याबाबत आम्ही साशंक आहोत.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या संदर्भात मी उल्लेख केला होता. जनावरांच्या चाऱ्याबाबत अतिशय भयंकर परिस्थिती निर्माण झालेली आहे. विदर्भातील अनेक गावांतील जनावरांना चारा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे, विदर्भाचे दोन भाग आहेत, पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भ. पूर्व विदर्भात धानाचे उत्पन्न घेण्यात येते, त्या ठिकाणी पाऊस बऱ्यापैकी झालेला आहे. परंतु धानाला या वर्षी भाव कमी मिळाला आहे. पश्चिम विदर्भातील कोणत्याही उत्पादित मालाला भाव मिळालेला नाही. मराठवाड्यात पाहणी करण्यासाठी चार ते पाच वेळा दिल्ली येथील केंद्रीय पथक आले होते. मला असे वाटले होते की, मुख्यमंत्री महोदय विदर्भाचे असल्यामुळे विदर्भात दिल्लीचे केंद्रीय पथक पाहणी करण्यासाठी येईल. परंतु केंद्रीय पथक विदर्भात आले नाही. पथक आले नाही ही बाब आम्ही समजू शकतो. परंतु मदतीपासून देखील विदर्भातील जनता वंचित राहिलेली आहे. आणेवारीच्या गावांची कपात करायची असेल तर ती विदर्भातील गावांची करण्यात येते. मदतीमधून कापूस पीक वगळायचे असेल तर ते देखील विदर्भातील वगळण्यात येते. यवतमाळ जिल्ह्यातील फक्त दोन गावांचा समावेश दुष्काळ सदृश्य यादीत करण्यात आलेला आहे. महसूल राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत, त्यानंतर त्यांनी प्रस्ताव पाठविला होता, परंतु तो नामंजूर करण्यात आलेला आहे. मला कळत नाही की, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे ज्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत त्या बुलडाणा जिल्ह्यांसाठी 250 कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात सर्वात जास्त आत्महत्या

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.....

झालेल्या आहेत, तरी देखील त्या जिल्ह्यातील फक्त दोन गावे दुष्काळात समाविष्ट करण्यात आली असून त्यासाठी फक्त 5 लाख रुपये मदत देण्यात आली आहे. न्याय देत असताना सर्व जिल्ह्यांना योग्य न्याय देतो असे लोकांना वाटले पाहिजे. पालकमंत्री त्या ठिकाणचे आहेत म्हणून आपल्या सोईचे करुन घेतात किंवा जिल्हाधिकाऱ्यांना सांगून सोईचे करुन घेण्यात येत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना बुलडाणा जिल्ह्याची वस्तुस्थिती माहिती आहे काय ?

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला बुलडाणा व सर्व जिल्ह्याची वस्तुस्थिती माहिती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी रेकॉर्डवर चुकीचे निवेदन करु नये.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, बुलडाणा जिल्ह्याला निधी देण्याबाबत माझी काहीही अडचण नाही. ज्या जिल्ह्याला निधी दिला नाही त्या जिल्ह्याची आणेवारी वस्तुस्थितीच्या आधारे काढली पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलडाणा जिल्ह्यांसाठी 250 कोटी रुपये दिले. बुलडाणा जिल्ह्यातील 1500 गावे 50 टक्केच्या आत आणेवारीची आहेत. आपण यवतमाळ जिल्ह्यांबाबत बोलावे. दुसऱ्या जिल्ह्याचे चुकीचे झाले असे आपण कसे म्हणत आहात ?

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा गैरसमज होत आहे, बुलडाणा जिल्ह्याला जास्त निधी दिला याबाबत मला काही म्हणायचे नाही. 50 टक्केच्या आत आणेवारीची 1500 गावे बुलडाणा जिल्ह्यात आहेत. तशीच यवतमाळ जिल्ह्यात 50 टक्के आणेवारीच्या आतील 2050 गावे आहेत, हा रिपोर्ट महसूल मंत्र्यांना मंत्रालयात पाठविण्यात आलेला आहे. माझा बोलण्याचा उद्देश असा होता की, जो न्याय लावला जात आहे तो सर्वांना सारख्या प्रमाणात लावला पाहिजे. यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळी गावांची संख्या 2050 असताना त्या ठिकाणी आवश्यक ती मदत मिळालेली नाही.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्याबाबत माझा कोणताही आक्षेप नाही. ज्या गावांमध्ये दुष्काळ आहे त्या ठिकाणी दुष्काळ जाहीर झाला पाहिजे या मताची मी आहे. परंतु बुलडाणा जिल्ह्यासाठी 250 कोटी रुपये दिले व आमच्या जिल्ह्यात फक्त 5 लाख रुपये दिले असे सन्माननीय सदस्य म्हणत आहेत. श्री.एकनाथराव खडसे महसूल मंत्री आहेत म्हणून बुलडाणा जिल्ह्याला जास्त निधी देण्यात आला असा आपण अर्थ काढू नका. बुलडाणा जिल्ह्यातील 1500 गावांची आणेवारी 50 टक्केच्या आत आहे. त्या भागात दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे. त्या जिल्ह्याला न्याय मिळणे सहाजिक आहे. एवढाच माझा उद्देश आहे. यवतमाळ बाबत मला काहीही म्हणावयाचे नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : माझा देखील वेगळा उद्देश नाही, दोन्ही जिल्ह्यातील गावांमध्ये दुष्काळ मोठ्या प्रमाणात आहे, दोन्ही जिल्ह्यांना निधी मिळायला पाहिजे होता.

**सभापती** : मुख्यमंत्री महोदयांना निवेदन करायचे आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण थांबवावे.

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** विद्यमान सरकारमधील मंत्री केंद्रीय गृह मंत्रालयाने मंत्र्याकरिता जी आचारसंहिता निर्देशित केली आहे त्याचे पूर्णपणे पालन करीत आहेत किंवा नाही.

**मु.शी.:** विद्यमान सरकारमधील मंत्री केंद्रीय गृह मंत्रालयाने मंत्र्याकरिता जी आचारसंहिता निर्देशित केली आहे त्याचे पूर्णपणे पालन करीत आहेत किंवा नाही या विषयावर सर्वश्री शरद रणपिसे, संजय दत्त, धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 289 अन्वये सूचना.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री शरद रणपिसे, संजय दत्त, धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी विद्यमान सरकारमधील मंत्री केंद्रीय गृह मंत्रालयाने मंत्र्याकरिता जी आचारसंहिता निर्देशित केली आहे त्याचे पूर्णपणे पालन करीत आहेत किंवा नाही या विषयावर नियम 289 अन्वये सूचना दिली होती, त्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मी पुढील निवेदन करीत आहे :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

....5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे मी दुपारी सांगितल्याप्रमाणे फक्त एखादा दुसरा प्रश्न अपण विचारावा.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांवर आमचा विश्वास आहे, सेवा हक्क विधेयकाला आम्ही काही सुधारणा सूचविल्या होत्या त्या त्यांनी स्वीकारल्या होत्या. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल आमची कोणतीही तक्रार नाही. परंतु मुद्दा असा आहे की, भारताचे पंतप्रधान माननीय श्री.नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयाने ही आचारसंहिता स्वीकारलेली आहे.

या नंतर श्री.सांगळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

तो त्यांनी नाकारलेला नाही. देशाच्या पंतप्रधानांनी केंद्रीय मंत्रिमंडळापासून विविध राज्याच्या मंत्रिमंडळांपर्यंत कोड ऑफ कंडक्ट स्वीकारला आहे. अशा परिस्थितीत माझी माननीय मुख्यमंत्र्यांकडून अशी अपेक्षा आहे की, आपण सुध्दा याबाबतीत कठोर भूमिका घ्यावी. समजा एखादा मंत्री असल्यास नैतिकता आहे, कोड ऑफ कंडक्ट आहे, आचारसंहिता आहे, तर आपण त्यांना सांगितले पाहिजे की, आपण तात्पुरते बाजूला व्हा, मी पंतप्रधान कार्यालयाशी बोलतो. तो पर्यंत तुम्ही राजीनामा द्या, अशी आपण भूमिका मांडली पाहिजे. या भूमिकेला व विश्वासार्हतेला मेहरबानी करुन आपण तडा जाऊन देऊ नका, अशी माझी आपल्याला विनंती आहे. आपण या सभागृहाचा मान राखावा. जो पर्यंत पंतप्रधान कार्यालयाकडून या विषयी निर्णय घेतला जात नाही, तो पर्यंत सदर मंत्री महोदयांना सभागृहात घेऊ नये. आपण त्यांच्याशी विचारविनिमय करावा. अन्यथा काँग्रेस पक्षाचे शिष्टमंडळ माननीय पंतप्रधान कार्यालयात जाणार आहे. आम्ही त्यांना ही गोष्ट दाखविणार आहे की, आपल्या कार्यालयाचे कोड ऑफ कंडक्ट आहे, याबाबत आपण आम्हाला निर्णय द्यावा.

श्री.देवेंद्र फडणवीस : माननीय श्री.शरद रणपिसे यांना अतिशय नम्रपणे सांगतो की, यामध्ये कोड ऑफ कंडक्ट आणि कॉन्स्टिट्यूशनल एन्फोर्सबिलिटी असे दोन भाग आहेत. आता कॉन्स्टिट्यूशनल एन्फोर्सबिलिटी नाही, या संदर्भातील निर्णय आपण बाजूला ठेऊ. आपण त्याच्या मॉरेलिटीवर येऊ. आपण ती या ठिकाणी मांडत आहात. मॉरेलिटीमध्ये पंतप्रधांनाप्रमाणे सर्वांनी कोड ऑफ कंडक्ट स्वीकारला आहे. कोड ऑफ कंडक्ट स्वीकारल्यानंतर त्याचे उल्लंघन होत आहे का, असा मुद्दा आहे. मी आपल्याला हेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की, प्रस्तुत प्रकरणात कोड ऑफ कंडक्टचे उल्लंघन होतच नाही. यामुळे मंत्र्यांनी राजीनामा देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी शेवटचा प्रश्न विचारावा.

श्री.शरद रणपिसे : त्या मंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतर दोन महिन्यांच्या आत पद सोडले पाहिजे. प्रॉफिट आहे की लॉस आहे याची आम्ही नंतर माहिती काढू. सरकारशी त्याचा संबंध आहे का, याबाबत आम्ही नंतर माहिती काढू. मूळ मुद्दा असा आहे की, रजिस्ट्रार ऑफ कंपनी ॲक्टच्या वेबसाईटवर त्यांचे नाव आहे. He is at fault. त्यांनी दोन महिन्यांच्या आत राजीनामा द्यावयास

श्री.शरद रणपिसे....

पाहिजे होता. आम्ही या तांत्रिक मुद्याबद्ल पंतप्रधानाकडे विचारणा करु. त्यांनी दोन महिन्यांच्या काळात त्यांनी राजीनामा का दिला नाही तसेच त्यांचा राजीनामा का घेतला नाही, हा माझा प्रश्न आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : माननीय श्री.शरद रणपिसे ज्येष्ठ सदस्य असून त्यांना सर्व नियमांची माहिती देखील आहे. मी त्यांना पुन्हा सांगतो की, त्यात सरसकट राजीनामा असा उल्लेख केलेला नाही, त्यात निकष दिलेले आहेत. त्या निकषानुसार आता त्यांच्याकडे जे पद आहे, यामुळे ते राजीनाम्यास पात्र होत नाहीत. मी सदनाला एक उदाहरण सांगतो. कृपया ते राजकीय दृष्ट्या घेऊ नये. मला कोणावर आरोप करायचा नाही. कोड ऑफ कंडक्ट हा केवळ मंत्र्यांना लागू नाही तर In case of Ministers or persons holding Minister's status or rank यांनाही लागू आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे की, देशाच्या ज्येष्ठ नेत्या माननीय सोनियाजी युपीएच्या को-ऑर्डिनेशन कमिटीच्या अध्यक्षा होत्या व त्यांना कॅबिनेटचा रँक होता. त्याच वेळी त्या नॅशनल हेरॉल्ड कंपनीच्या बोर्डावर देखील होत्या. परंतु ऑफिस ऑफ प्रॉफिटचा विषय आल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. कारण ऑफिस ऑफ प्रॉफिट कोड ऑफ कंडक्ट व कॉन्स्टिटयूशन प्रमाणे चालत नव्हते. परंतु त्यांनी नॅशनल हेरॉल्डचा राजीनामा दिला नाही. कारण ते कोड ऑफ कंडक्टअंतर्गत चालत होते. म्हणून मला आपल्याला नम्रपणे सांगायचे आहे की, ज्या स्नेहाने त्या सदर पदावर होत्या, त्या स्नेहाने सन्माननीय सदस्य व मंत्री श्री.तावडे या पदावर कायम आहेत. मी आपल्याला आश्वस्त करतो की, आमच्याकडून एखादी चूक झाली असल्यास ती आम्ही सुधारु परंतु चुक झाली नसताना आमच्याकडून चूक झाली आहे, असा आरोप आमच्यावर करु नका.

श्री.शरद रणपिसे : प्रॉफिट आणि लॉस हा नंतरचा भाग आहे. या नियमामध्ये असे म्हटले आहे की, त्या संबंधित मंत्र्यांनी दोन महिन्यांच्या आत राजीनामा दिला पाहिजे. त्यात असे वर्डिंग आहे की, "sever तोडून टाकेन all connections, short of divesting" पूर्णपणे तोडून टाकेन. प्रॉफिट आणि लॉस हा नंतरचा प्रश्न आहे. माझा मुद्दा असा आहे की, दोन महिन्यांच्या आत संबंधित मंत्र्यांनी राजीनामा दिला नाही, म्हणून या सभागृहाची दिशाभूल झाली आहे. यामुळे कोड ऑफ कंडक्टचे उल्लंघन झाले आहे. कोड ऑफ कंडक्ट पंतप्रधान कार्यालयाने स्वीकारला आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : नियम 289 अन्वये चर्चा करीत असताना मी अपवाद म्हणून 2-3 प्रश्न विचारण्याची संधी दिली. नियम 289 च्या चर्चेत सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचा सुध्दा सहभाग होता. आपल्याला या संदर्भात प्रश्न विचारायचा असल्यास आपण तो विचारावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात सदनाला स्पष्टीकरण दिलेले आहे. सत्तेत काम करीत असताना सत्ताधाऱ्यांकडून पारदर्शक कामाची जनतेला अपेक्षा असते. ती पारदर्शकता कायम चौकटीत बसू शकेल, अशा पध्दतीची असू शकत नाही. काय मान्य होऊ शकेल, काय त्या चौकटीच्या बाहेर आहे, याची जरूर वेगवेगळी इंटरप्रिटिशन्स करता येतील. परंतु अशा पध्दतीने कोणाच्या मनात शंका निर्माण होणार असल्यास शक्यतो मंत्री महोदयांनी राज्याचा कारभार करीत असताना इतर कोणत्याही संस्थांमध्ये आपला सहभाग दिसू नये व तसा सहभाग कागदोपत्री असू नये एवढी खबरदारी घेण्याची सूचना केली तरी, प्रश्न असा आहे की, त्यात काही चांगली कामे असतात. त्यात सर्वसाधारण नियम म्हणून नाही तर काही चांगल्या सार्वजनिक कामांमध्ये मंत्र्याचा सहभाग देखील आवश्यक असतो. त्या संस्थेमध्ये त्यांनी मानद संचालक म्हणून राहणे सुध्दा अपेक्षित असते. उदाहरण सांगायचे झाल्यास राष्ट्रीय किंवा राज्याचे काही कार्यक्रम असतात. त्या ठिकाणी त्यांचा सहभाग असणे त्या प्रकल्पाला किंवा मोहिमेला निश्चितच उपकारक ठरू शकते. परंतु या संदर्भात आपण आपल्या सर्व सहकाऱ्यांशी चर्चा करुन आपल्या दृष्टीने मॉडेल ठरेल असा कोड ऑफ कंडक्ट करता आल्यास तो कायम पथदर्शी म्हणून आपल्याला सर्वांसमोर ठेवता येईल. आपण तेवढी सुधारणा करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चांगली सूचना केली आहे. यासंबंधी जरूर विचार केला जाईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, नियम 289 अन्वये सदनात कोड ऑफ कंडक्टवर चर्चा झाली व त्यात सन्माननीय श्री.शरद रणपिसे आणि विरोधी पक्षाच्या इतर सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्री महोदयांचा राजीनामा मागितला. माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करीत

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

असताना नियम वाचून दाखविले. त्यांनी नियम वाचून दाखवित असताना कोणत्या नियमान्वये माननीय मंत्री राजीनाम्यास पात्र नाहीत, हे अतिशय कौशल्याने सदनाला सांगितले. त्यांनी ज्या मॉरलच्या बाबतीत सदनाला उदाहरण दिले त्याच मॉरलच्या बाबतीत त्यांनी राजीनामा घ्यावयास पाहिजे होता, अशी सदनाची मागणी होती. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे माननीय मुख्यमंत्र्यांच्या विश्वासार्हतेच्या बाबतीत जे बोलले, तीच विश्वासार्हता आमची सुध्दा आहे. मंत्री महोदयांच्या बाबतीत सुध्दा तीच विश्वासार्हता असू शकते. तो वाद नाही. कागदोपत्री जो वाद समोर आला व त्यावर सदनात चर्चा झाली, त्यावर आपले जे मॉरल आहे, त्यानुसार माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांचा राजीनामा घेणे क्रमप्राप्त होते.

यानंतर EE-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

पण ते झालेले नाही. या संदर्भात सरकारच्या वतीने निवेदन करण्यात आले आणि पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले की, माननीय मुख्यमंत्र्यांनी संबंधित मंत्री महोदयांना पाठिशी घातले. म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सदस्य बहिर्गमन करतात)

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना पुन्हा एकदा नम्रपणे सांगू इच्छितो की, कोणालाही पाठिशी घालण्याचे कारण नाही. सभापती महोदय, एखाद्या व्यक्तीला तुम्ही साप साप म्हणून लाठी मारायची हे कितपत योग्य आहे याचा विचार झाला पाहिजे. गुन्हा घडला असेल तर निश्चितपणे त्यांच्यावर कारवाई होईल. अतिशय स्पष्ट तरतुदी असताना मी सभागृहाला सांगू इच्छितो की, जर याच न्यायाने बघितले गेले तर आचारसंहिता आजची नसून 1964 पासून ही आचारसंहिता लागू आहे. त्याचा जर विचार केला तर तत्कालीन मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या संदर्भात ते कंपन्यांवर संचालक आहेत म्हणून चौकशी सुरु आहे. मला या विषयात राजकारण आणायचे नाही. कोणाला पाठिशी घालून वाचविण्याचा विषयच नाही. मंत्री महोदयांनी आचारसंहितेचे उल्लंघन केलेले नाही. आचारसंहिता इन्फोर्सेबल नाही. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना नम्र विनंती करतो की, आपण राजकीयदृष्टया एखाद्या मंत्र्यांना अशा प्रकारे टार्गेट करणे योग्य नाही.

-----

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे

**मु.शी.:** राज्यातील मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होणे या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनील तटकरे, माणिकराव ठाकरे, जयंत प्र. पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, अमरसिंह पंडित, अमरनाथ राजूरकर, सतिश चव्हाण, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संदीप बाजोरिया, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री अब्दुल्ला खान दुर्राणी, सुभाष झांबड, अशोक ऊर्फ भाई जगताप, आनंदराव पाटील, हरिसिंग राठोड, चंद्रकात रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत, मी देखील काही सूचना केलेल्या आहेत. विरोधी पक्षाकडून दुष्काळाच्या काळात सातत्याने वेगवेगळया मागण्या सरकारकडे केल्या जातात.

**सभापती** : सभागृहाचे कामकाज सायंकाळी 6.00 वाजता संपवावे असे अनेक माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये निर्णय झालेला आहे की, सभागृहाचे कामकाज सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत चालविण्यात यावे. या प्रस्तावावर बोलणाऱ्या सदस्यांची यादी फार मोठी असून आतापर्यंत फक्त तीन वक्त्यांनी विचार मांडले आहेत. आज जर सभागृहाचे कामकाज सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत घ्यायचे झाले तर उद्या उशिरापर्यंत कामकाज करावे लागेल. त्यामुळे आपण एक तास अधिक कामकाज करु. उद्या शुक्रवार असल्यामुळे आज सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत सभागृहाची बैठक सुरु राहील. माझी माननीय सदस्यांना विनंती आहे की, भाषणामध्ये कोणत्याही मुद्याची द्विरुक्ती न करता मतदार संघापुरते विचार मांडावेत. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, दुष्काळाच्या अनुषंगाने माननीय सदस्यांनी शासनाला काही सूचना केलेल्या आहेत, मी देखील काही सूचना केलेल्या आहेत. सदनामध्ये

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.....

ज्यावेळेला दुष्काळाच्या संदर्भात चर्चा होते त्यावेळेला माननीय सदस्य त्यांच्याकडे मतदारसंघातील जी माहिती उपलब्ध असते त्या माध्यमातून जनतेच्या व्यथा सभागृहात मांडून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. मागील अधिवेशनामध्ये आणि याही अधिवेशनामध्ये विरोधी पक्षनेते आणि माननीय सदस्यांनी राज्यातील दुष्काळाच्या संदर्भातील स्थिती विशद करुन शासनाकडून न्याय मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. कदाचित शासनाचा विरोधी पक्षाकडून मांडण्यात आलेल्या माहितीवर पूर्णपणे विश्वास नसावा. अधिकाऱ्यांकडून जी माहिती दिली जाते तीच योग्य आहे अशी शासनाची धारणा असावी.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे)**

सभापती महोदय, अलीकडे माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्यात एक नवा प्रयोग केला. मराठवाड्यातील सर्व जिल्हयांमध्ये मंत्री महोदयांना दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यास सांगितले. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटला की नाही, जनावरांच्या छावण्याची काय स्थिती आहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे की नाही, त्या दृष्टीने कोणती पावले उचलावी लागतील, पीक परिस्थिती काय आहे, रोजगार हमी योजनेच्या कामांची काय स्थिती आहे याची जिल्हयामध्ये प्रत्यक्ष जाऊन माहिती घ्यावी, शेतकऱ्यांना आणि नागरिकांना दुष्काळाच्या अनुषंगाने मदत करण्यासाठी आलेल्या सूचनांचे निराकरण करण्यासाठी मंत्री महोदयांना पाठविले होते. मंत्री महोदयांनी केलेल्या पाहणीच्या अनुषंगाने शासनाने तेथील प्रश्न सोडविण्याकरिता कोणते निर्णय घेतले हे सभागृहाला विशद केले तर दुष्काळी भागातील जनतेला दिलासा मिळू शकतो. आमची अशी माहिती आहे की, अनेक मंत्र्यांना पाहणी दौरा आटोपता घ्यावा लागला. वृत्तपत्रातून बातमी वाचावयास मिळाली की, दुधाला भाव मिळावा म्हणून दुष्काळी भागातील शेतकरी मंत्री महोदयांची भेट घेण्यासाठी आले असता त्यांच्यावर मंत्र्यांच्या स्वीय सहाय्यकांनी हल्ला केला. मंत्र्यांनी केलेल्या दौऱ्यावर तेथील जनतेने बहिष्कार घातला होता. या पाहणी दौऱ्याच्या संदर्भात शासनाकडून अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. मंत्र्यांचे म्हणणे ऐकून त्या अनुषंगाने निर्णय घेणे गरजेचे होते. कदाचित या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देत असताना सदनामध्ये निर्णय जाहीर केले जातील अशी आमची अपेक्षा आहे.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.....

सभापती महोदय, राज्यामध्ये दुष्काळी स्थिती आहे, विदर्भ आणि पश्चिम विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती ढासळली असताना पुन्हा एकदा राज्यात गारपीट आणि अवकाळी पाऊस झाल्याने मोठया प्रमाणात पिकाची हानी झाली. विदर्भातील गोंदिया, भंडारा, नागपूर व पश्चिम विदर्भातील यवतमाळ, वाशिम, अमरावती या जिल्हयांमध्ये गारपीट व अतिवृष्टी झाली. मोठया प्रमाणात शेतातील उभ्या पिकाचे नुकसान झाले. कापणीला आलेला गहू वादळी वाऱ्यामुळे जमीनदोस्त झाला. कापूस व सोयाबीनचे पीक आले नाही. त्यामुळे उन्हाळी लागवड केलेल्या पिकाचे अतोनात नुकसान झाले.

सभापती महोदय, मराठवाडयात नांदेड जिल्हयामध्ये सुध्दा अशाच प्रकारे शेतातील उभ्या पिकाची हानी झाली. पश्चिम महाराष्ट्रात व नाशिक जिल्हयात द्राक्ष पिकाचे नुकसान झाले. आंब्याच्या मृग बहाराचे नुकसान झाले. एकीकडे दुष्काळी परिस्थिती, ढासळलेली आर्थिक स्थिती आणि पुन्हा गारपीट व अवकाळी पाऊस यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. फळबागांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. कधीही भरुन न येणारे हे नुकसान असल्यामुळे बँकेचे कर्ज कसे फेडायचे असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे.

नंतर 2एफ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

आज आम्ही शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची मागणी करीत आहोत. आमचे शासन सत्तेवर आल्यानंतर देखील आम्हाला त्याची घोषणा करावी लागणार आहे. आज कर्ज माफी केल्या शिवाय दुसरा कोणताही मार्ग होऊ शकत नाही. यासाठी आपण प्रभावी पॅकेज दिले पाहिजे. विमा मिळतो म्हणून पैसे द्यायचे नाही, मागच्या वेळी पैसे दिले म्हणून आता द्यायचे नाही व आता कुठे तरी देतो असे दाखवायचे अशी दुटप्पी भूमिका राज्यकर्त्यांनी दाखविणे योग्य नाही. मी जास्त काही बोलणार नाही. कर्ज माफी संबंधी शासनाने घोषणा करावी. सरसकट सर्व पिकांकरिता शासनाने भरीव असे पॅकेज जाहीर करावे व ते शेतकऱ्यांना द्यावे. नागपूरला शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केले होते. पण नंतर त्यातील अर्धा निधी कमी केला. दुबार पेरणीचे पैसे देतो असे आपण सांगितले. पण एकाही शेतकऱ्याला दुबार पेरणीचे दीड हजार रूपये मिळालेले नाहीत. शेततळ्यांसाठी 50 टक्के सबसिडी देतो असे सांगण्यात आले. आपण जाहीर केलेल्या योजनेसंबंधात एकही अर्ज यवतमाळमधून आलेला नाही. अशा प्रकारे आपण दुष्काळाला तोंड देऊ शकणार नाही. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठा आहे. आज यवतमाळ जिल्ह्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठा आहे. या सगळ्या विषयाकडे शासनाने लक्ष घालावे. आज राज्यात प्रचंड मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडलेला आहे. आज शेतकऱ्यांची आर्थिकस्थिती ढासळलेली आहे. तेव्हा शेतकऱ्यांना मदत करण्याची भूमिका या शासनाने घ्यावी अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे विचार संपवितो.

.....

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, विरोधी पक्षातर्फे म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

आज राज्याची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. कधी नव्हे तो पाऊस झालेला नाही. मग तो विदर्भात असेल, मराठवाड्यात असेल किंवा संपूर्ण महाराष्ट्र राज्यात असेल. पावसाचे प्रमाण अतिशय कमी झाले आहे. ज्या काळामध्ये पिकाला उभारी येते त्याच दोन महिन्यांमध्ये अजिबात पाऊस न झाल्यामुळे त्याचा परिणाम सर्वत्र पिकावर झालेला आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणावर टंचाई निर्माण झालेली आहे. विशेषतः मराठवाड्यातील उस्मानाबाद, बीड, जालना, लातूर या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाई हा प्रकार दरवर्षी जाणवतो. केवळ मजूर आणि गरीब शेतकरी हे शेतीवरच अवलंबून असतात. आज शेतकरीच अडचणीत आलेला आहे. हेच शेतकऱ्याच्या अडचणीचे कारण झालेले आहे. आज खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना काय पाहिजे आहे ? आज शेतकऱ्यांना सिंचनाच्या प्रकल्पाची गरज आहे. उत्तम बियाणे, वेळावेळी कर्ज, त्यावरील व्याज माफी, खतावर सबसिडी, उत्पादनावर आधारित भाव द्यावा एवढीच शेतकऱ्याची खऱ्या अर्थाने मागणी आहे. त्याच बरोबर शेतीच्या पाण्याचे सिंचनासाठी नियोजन हे अत्यंत महत्वाचे आहे. कृषि पंपाना विजेचे कनेक्शन व पूर्णवेळ वीज ही त्यांची छोटीशी मागणी आहे. गेल्या 55 वर्षातील युती शासनाची 5 वर्षे सोडली तर शेतकऱ्यांचे प्रश्न कायम ठेवले गेले आहेत. आज सतत आरोप होत राहिले आहेत की, या सरकारने हे केले आहे, ते केले आहे. पाणी टंचाई आहे, गुरांसाठी चारा नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या देखील आमच्यावर आलेल्या आहेत. परंतु, ही वस्तुस्थिती नाही. गेल्या दीड वर्षामध्ये कर्जबाजारी होऊन एवढ्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असे म्हणणे बरोबर नाही. 50 वर्षांच्या काँग्रेसच्या कारकिर्दीमध्ये सिंचनाचे प्रकल्प पूर्ण झाले असते, शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने पाणी मिळाले असते तर शेतकऱ्याला आत्महत्या करण्याची गरजच पडली नसती ही वस्तुस्थिती आहे. 70 हजार कोटी रुपये खर्च करुन एक टक्कासुद्धा पाणी शेतीला मिळत नसेल तर त्याचा देखील कुठे तरी विचार समोरुन होण्याची आवश्यकता आहे असे माझे स्पष्ट मत

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

आहे. या दीड वर्षातच शेतकरी कर्जबाजारी झाला आहे काय ? गेल्या कित्येक वर्षापासून कधी ओला, कधी कोरडा दुष्काळ पडत आहे. त्यामुळे कर्जात वाढ होत असल्यामुळे त्याचा हा सर्व परिणाम आहे. मघाशी येथे आत्महत्येचे आकडे वाचून दाखविण्यात आले. बोलावे तर कसे बोलावे हा देखील एक महत्वाचा प्रश्न आहे. आता सरकारी आकडे वाचून दाखविण्यात आले. ते काही बरोबर नव्हते. नागराज समितीचा अहवाल हा अत्यंत महत्त्वाचा आहे. सन 2000-2001 मध्ये 3022 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. 2001-2002 मध्ये 3536 आत्महत्या झाल्या. 2002-2003 मध्ये 3695 आत्महत्या झाल्या. 2003-2004 मध्ये 3836 आत्महत्या झाल्या आहेत. 2004-2005 मध्ये 4147 आत्महत्या झाल्या. 2005-2006 मध्ये 3926 आत्महत्या झाल्या. 2006-2007 मध्ये 4238 आत्महत्या झाल्या. 2007-2008 मध्ये 4453 आत्महत्या झाल्या. कर्जमाफीचे जे वर्ष होते त्यात आत्महत्या कमी झाल्यात का ? कर्जमाफीने आत्महत्या थांबल्या असत्या तर कर्जमाफीचा विचार होऊ शकला असता. परंतु, 2008-2009 मध्ये 3802 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. 2009-2010 मध्ये 2872 आत्महत्या झाल्या. हे कर्ज माफीचे वर्ष होते. त्यानंतर 2010-2011 मध्ये 3141 आत्महत्या झाल्या. 2011-2012 मध्ये 3337 आत्महत्या झाल्या. 2012-2013 मध्ये 3786 आत्महत्या झाल्या. 2013-2014 मध्ये 2348 आत्महत्या झाल्या. 53275 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. ही काही चांगली गोष्ट आहे असे मी मानणार नाही. परंतु, त्या आत्महत्येचे राजकारण केले गेले. केवळ 30 टक्के शेतकऱ्यांच्या विधवांना किंवा कुटुंबियांना मदत दिली गेली आणि 70 टक्के आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची थट्टा केली गेली. तो शेतकरी दारू पिऊन मेला, आजारीपणाने मेला, कर्ज काढून मेला अशा प्रकारचे वाट्टेल तसे आरोप झाले. 70 टक्के आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना कोणतीही मदत न देता त्यांच्या जखमेवर मीठ चोळले गेले. हे कोणीही विसरलेले नाही. आज आम्ही या सर्व गोष्टींचा विचार करीत आहोत. हा प्रश्न राजकारणाचा नाही. प्रश्न आहे तो आजपर्यंतचा आपल्या राज्यातील कृषि विकास दराचा.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शोभा फडणवीस....

मी गेली 26 वर्षे या विधान मंडळामध्ये आहे. महाराष्ट्रामध्ये चांगला पाऊस पडला तर कृषि विकासाचा दर 7.5 टक्के इतका आणि पाऊस कमी पडला तर तो दर -2.5 टक्के इतका राहतो. हा आकडा मी गेले कित्येक वर्ष आर्थिक पाहणीमध्ये बघते आहे. परंतु, या वर्षी त्यात काही प्रमाणात वाढ झाली असून कृषि विकासाचा दर थोड्या फार प्रमाणात का होईना आपल्याला वाढलेला दिसतो. हे कोणामुळे झाले असे मी म्हणत नाही. 50 वर्षे ज्यांनी राज्य केले त्यांनी आता विचार करण्याची गरज आहे. मला फक्त एका गोष्टीचे नवल वाटते. आजही मराठवाड्यात पिण्याच्या पाण्यासाठी टँकर लावावे लागत आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यात एक हजार कोल्हापुरी बंधारे तत्कालीन पाटबंधारे मंत्री श्री.पद्मसिंह पाटील यांनी बांधले. त्यावेळे पासून मला मराठवाड्यात कोणतेही पाण्याचे नियोजन दिसले नाही. मी उस्मानाबाद जिल्ह्यात फिरले. तेथे फिरून सगळी पाहणी केली. तेथे विहिरीला काळा दगड लागतो. तेथे पाण्याचे झरे लागत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे एक हजार कोल्हापुरी बंधारे बांधताना पिण्याच्या पाण्याचा कुठेही विचार केला गेला नाही. यातील पाणी केवळ ऊसासाठी वापरले गेले आणि साखर कारखाने निर्माण झाले. परंतु, पिण्याच्या पाण्याची टंचाई आयुष्यभर नव्हे तर वर्षोंवर्षे त्या लोकांच्या नशिबात येऊन पडलेली आहे ही वस्तुस्थिती टाळता येणार नाही. येथे सांगण्यात आले की, आम्ही एका जिल्ह्यात जाऊन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या विहिरीला भेट दिली. मी देखील बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यात फिरले. बुलढाणा जिल्ह्यात फिरत असताना आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या विहिरीला भेट दिली. त्या विधवेला विहीर मिळाली आहे. मी सगळ्यांसमोर विचारले की, तुला किती हप्ता मिळाला आहे, किती पैसे मिळाले आहेत, तुला पैसे द्यावे लागले की, सरकारनेच तुला पैसे दिले ? तिने सांगितले की, नाही. मला सरकारनेच पैसे दिले. माझ्यावर हप्ता वगैरे काहीच शिल्लक नाही. माझ्या विहिरीचे काम 70 फुटापर्यंत झाले असून अजून मला 10 फूट विहीर खोदावयाची आहे.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

त्या महिलेकडे पाहताना मला एक गोष्ट जाणवली की, ती महिला शेतामध्ये तट्टयांच्या घरामध्ये राहत आहे. मी धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यात फिरले त्या ठिकाणीही मला शेतकरी तट्टयांच्या घरामध्ये राहत असल्याचे पहावयास मिळाले. शेतावर राहणारा शेतकरी तट्टयांच्या घरामध्ये राहत आहे, त्याला स्वतःचे चांगले घर असावे असे वाटत नाही काय ? आपण इतके वर्षे त्याच्या घराच्या बाबतीत विचार केला नाही. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या विधवेला घर मिळावे याचा आपण कधी विचार केला नाही. हा एक सामाजिक प्रश्न आहे, सहानुभूतीचा प्रश्न आहे, माणुसकीचा प्रश्न आहे. आपण हा प्रश्न एकत्र येऊन सोडविला पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, मराठवाड्यामध्ये मागील 25 वर्षापासून दुष्काळी परिस्थिती आहे. चारा छावण्या, पाणी टंचाई, टँकर पुरवठा हे शब्द मी नेहमी ऐकत असते. मराठवाडा विभागातून चार मुख्यमंत्री झाले तरी देखील त्या भागाची पाण्याच्या संदर्भात इतकी वाईट परिस्थिती असावी, याचे मला दुःख वाटते. मला या ठिकाणी एक गोष्ट सांगावीशी वाटते. त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री श्री.शंकरराव चव्हाण होते, मला त्यांच्याबद्दल आदर आहे. मी एक छोटी कार्यकर्ती होते. मी त्यावेळी दहा हजार शेतकऱ्यांचे एक प्रचंड आंदोलन केले होते. आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयाला घेराव घातला होता. त्यावेळी त्यांनी मला फोन करुन सांगितले," तू घेराव उठव, मी तुझ्या भेटीला आल्याशिवाय राहणार नाही." कै.शंकरराव चव्हाण यांनी मराठवाड्याच्या उद्धारासाठी जायकवाडी प्रकल्प आणला. परंतु तो प्रकल्प आणून देखील मराठवाड्याला पाणी का मिळाले नाही, याचा आपण का विचार करीत नाही ? आपण विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहामध्ये सतत पाण्यासाठी भांडतो. जायकवाडीसाठी पाणी मिळाले पाहिजे अशी सतत मागणी करतो. जायकवाडीला पाणी मिळाले असते तर आज मराठवाड्याला पाण्यासाठी वणवण फिरावे लागले नसते. मराठवाड्याने 22 टीएमसी पाण्याची मागणी केली होती, त्यांची ही मागणी पूर्ण करण्यात आली नाही. त्यानंतर 16 टीएमसीची मागणी करण्यात आली, ती देखील पूर्ण करण्यात आली नाही. शेवटी माननीय उच्च न्यायालयाने मराठवाड्याला 10 टीएमसी पाणी देण्याचे आदेश दिले तरी देखील मराठवाड्याला पाणी मिळाले नाही, मग हे कोणाचे पाप आहे ? हे पाप दीड वर्षाच्या सरकारचे आहे की, आतापर्यंत न झालेल्या नियोजनाचे आहे, याचाही विचार करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, या निमित्ताने मला एका लहान मुलाची गोष्ट आठवते. एक लहान मुलगा सतत रडत होता, आईने त्याला विचारले तू का रडत आहेस, तुला काय पाहिजे ? मुलाने सांगितले की, मला चॉकलेट पाहिजे. आईने त्याला चॉकलेट दिले. त्यानंतरही त्या मुलाचे रडणे संपले नाही. आईने पुन्हा विचारले तुला काय पाहिजे. मुलाने सांगितले, मला आईस्क्रीम पाहिजे. आईने आईस्क्रीम आणून दिले तरीही त्याचे रडणे संपले नाही. शेवटी त्याच्या आईने त्याला तुला काय पाहिजे ते तूच ठरव आणि मग मला सांग, असे सांगितले. तशी परिस्थिती समोर बाकावरील सदस्यांची झालेली आहे. त्यांना नेमके काय पाहिजे हे समजत नाही. केवळ पाणी द्या असे म्हणण्याने काही होणार नाही. जायकवाडी धरणाला पाणी कसे मिळेल याचा विचार करावा. जायकवाडी धरण 50 टक्के भरल्याशिवाय वरच्या भागातील कोणतीही धरणे भरु नयेत असा जायकवाडी धरणाच्या संदर्भात नियम आहे. परंतु त्या नियमाचे पालन होताना दिसत नाही. त्यामुळे अजून पर्यंत जायकवाडी धरण भरलेले नाही, ही वस्तुस्थिती सर्वांना मान्य करावी लागेल. ज्यावेळी जायकवाडी प्रकल्प झाला त्यावेळी वरच्या बाजूला कोणतीही धरणे नव्हती त्यामुळे जायकवाडी धरणात 100 टीएमसी पाणी येईल असे नियोजन होते. परंतु ज्यावेळी जायकवाडी धरण बांधण्यास सुरुवात झाली तेव्हा वरच्या भागात धरणे बांधण्यास सुरुवात झाली. त्यामुळे ती धरणे प्रथम भरली आणि जायकवाडी धरणास पाणी मिळाले नाही, त्यामुळे मराठवाड्यास पाणी मिळात नाही याचा कुठेतरी विचार होण्याची आवश्यकता आहे. ज्या जायकवाडी धरणावर मराठवाड्यातील शहरे, गावे अवलंबून आहेत त्या मराठवाड्याचा पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता सर्वांनी एकत्रित आले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनी चर्चा करुन माणुसकीच्या दृष्टीकोनातून जायकवाडी धरणाला हक्काचे पाणी दिले तर मराठवाडयातील पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी होऊ शकते. विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात मागणी करुन हा प्रश्न सुटणार नाही. दोन्ही विभागातील लोकांनी एकत्र बसून चर्चा केली तर हा प्रश्न सुटू शकेल. आपणास हा प्रश्न सोडवावयाचा असेल तर या प्रश्नाचा प्रामाणिकपणे विचार करण्याची गरज आहे, असे माझे म्हणणे आहे. मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनी दीड वर्षे कारभार केलेल्या शासनावर किती आरोप



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

करावेत ? तुमच्यामुळे आत्महत्या झाल्या, दुष्काळ पडला, तुमच्यामुळे चारा छावण्या झाल्या असे आरोप करण्यात येत आहेत. मागील 50 वर्षात जे घडले नाही ते दीड वर्षात केले नाही म्हणून आपण बोलत असाल तर ते अतिशय चुकीचे आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. आम्हाला कामास तर सुरुवात करु द्या. आम्ही जलयुक्त शिवार योजनेंतर्गत नदीनाल्यांवर पाणी अडविण्याचा प्रयत्न केला. परंतु पाऊस झाला नाही. पाऊस झाला असता तर धरणे भरली असती आणि त्याचा फायदा सर्व गावांना झाला असता. अजून मूल जन्माला यायचे आहे. तरी तुझा पायगुण वाईट आहे असे आरोप सुरु आहेत, हे काही बरोबर नाही, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या सरकारने शेतकऱ्यांना एक लाख विहिरी दिल्या. यापूर्वी सुद्धा आपण मोठ्या प्रमाणात विहिरींचा कार्यक्रम राबविला होता. परंतु मी अगोदर सांगितल्याप्रमाणे शेतकऱ्यांना तीन तीन वर्षे विहिरींचे पैसे मिळाले नाहीत, ही वस्तुस्थितह आहे. विहिरींचे आणि धडक विहिरींचे पैसे मिळाले पाहिजेत यासाठी आपण भांडलो. आपण शेतकऱ्यांना विहिरीसाठी पैसे दिले नाहीत तर शेतकरी विहिरी कशा पूर्ण करणार ? मी बुलडाणा, उस्मानाबाद आणि इतर जिल्ह्यांत फिरत असताना लोकांना पहिला प्रश्न केला की, विहीर खोदत असताना तुम्हाला शासनाकडून पैसे मिळाले काय ? त्यांनी सांगितले की, आम्हाला पैसे मिळाले. तेव्हा आपण उगाच आरोप करु नयेत. लाभार्थ्यांना विहिरींचे पैसे दिले ही वस्तुस्थिती आहे. नकट्याला नकटे म्हणण्याची सवय असली की मग त्याला त्याच दृष्टीकोनातून पाहिले जाते, तशी आज परिस्थिती आहे.

सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत सरकारला विनंती आहे की, आपण 31 हजार विहिरी पूर्ण केलेल्या आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. फक्त त्या विहिरींवर तातडीने पंप पुरवावेत जेणेकरुन शेतकऱ्यांना शेतीला पाणी पुरविता येईल. माझी दुसरी अशी मागणी आहे की, आपण ज्यावेळी विहिरीचे प्रपोझल मंजूर करतो. त्याचवेळी त्या विहिरीवरील पंपाचे प्रपोझल मंजूर करावे. जेणेकरुन विहीर पूर्ण झाल्यावर त्याच्या शेतीला पाणी मिळाल्याचे समाधान मिळू शकेल.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, जलयुक्त शिवार योजनेवर जनता खूष आहे. त्या योजनेमध्ये भ्रष्टाचार आहे असे आपण कितीही म्हटले तरी अजून काही घडलेच नाही तर भ्रष्टाचार कोठून आला ? सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे त्यांच्या भाषणात म्हणाले की, जलयुक्त शिवार योजनेमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. भ्रष्टाचार झाला असेल तर तो सिद्ध करुन दाखवावा. त्यांनी भ्रष्टाचार झाल्याचे एकतरी प्रकरण सांगावे. आम्ही आपणास एकावेळेला 35 प्रकारचे घोटाळे सांगू शकतो. पण आम्ही ते राजकारण करणार नाही. आम्ही शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार करणार नाही. तुम्ही काय केले असेल ते तुम्ही पहावे. परंतु आम्ही न केलेल्या भ्रष्टाचाराचा उच्चार तरी करु नका. काहीही न पाहता आरोप करु नका. तुमच्या डोक्यात भ्रष्टाचार इतका भरला आहे की, भ्रष्टाचाराच्या पलीकडे आपणास काही सुचत नाही. जर चांगले काम केले असेल तर चांगले म्हणायला शिकावे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी त्यांच्या भाषणात शिरपूर पॅटर्न आणि संघाचा उल्लेख केला. संघाचा विषय त्यांच्या डोक्यात कसा शिरला ते मला माहीत नाही. आम्ही भारतीय जनता पक्षाचे आमदार आहोत. शिवसेना पक्ष आणि इतर पक्षांचे आमचे महायुतीचे हे सरकार आहे आणि आम्हाला अजूनपर्यंत संघाने आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे त्यांना संघ कसा आठवतो ते मला समजत नाही. आपण आपल्या डोक्यातून संघाचा विचार काढून टाकावा. आपणास प्रत्यक्ष काय पाहिजे ते सरकारकडे मागावे. दुष्काळाच्या प्रश्नावर राजकारण करु नका. एकमेकांच्या सहकार्याने दुष्काळाला सामोरे गेले पाहिजे आणि त्या पद्धतीने काम होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, विदर्भात पाण्याची कमी नाही. विदर्भातील नद्या पावसाळ्यात भरपूर वाहतात. परंतु त्या नद्यांमध्ये फक्त चार महिने पाणी असते आणि बाकीचे आठ महिने त्या नद्या कोरडया असतात. तेव्हा आमच्याकडे पाण्याची टंचाई नाही काय ? आम्ही विहिरींवर बागाईती घेतलेल्या नाहीत. त्यामुळे पाण्याचा खर्च कमी आहे आणि आजही पूर्व विदर्भात 25 ते 30 फुटावर पाणी लागते. परंतु पश्चिम विदर्भात मात्र 100 ते 150 फूटावर खाली जावे लागते.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

याचा अर्थ आपण पाण्याचा उपसा केला, परंतु पाण्याचे पुनर्भरण केलेले नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने पाण्याचा दुष्काळ भविष्यात सर्वांना सतावणार आहे, ही गोष्ट आपण विचारात घेतली पाहिजे. त्यामुळे पुनर्भरणासाठी सुध्दा जल शिवार अभियानाचा उपयोग होऊ शकतो. मी विचारु इच्छिते की, शेतकऱ्यांच्या शेततळ्याचे पाणी पुनर्भरणासाठी वापरा, असे कोणी म्हटले आहे, सरकारने म्हटले आहे काय, असा जी.आर.आहे काय ? नाही. आपण कोल्हापुरी बंधारे विहिरीच्या पाण्याची पातळी वाढविण्यासाठी बांधले. तुमच्या काळात बांधण्यात आलेले कोल्हापुरी बंधारे आम्ही सुध्दा आमच्या भागात बांधून घेतले. परंतु आज त्या बंधाऱ्यांना पाट्याच राहिल्या नाहीत. त्यामुळे कोल्हापुरी बंधारे आज केवळ वाहून जात आहेत. मी शासनाला विनंती करु इच्छिते की, त्या कोल्हापूर बंधाऱ्यांना पाट्या टाकू नका. कारण बंधाऱ्यांच्या पाट्या लोक चोरुन नेतात आणि त्यामुळेच बंधारे अशाप्रकारे वाहत जातात. आपला मूळ उद्देश पाणी अडविणे आहे. त्यामुळे बंधाऱ्याच्या ऐवजी तेथे सिमेंटची भिंत करावी. त्या ठिकाणी पाणी अडवावे. ते पाणी शेतकऱ्यांना न्यायचे असेल तर शेतकऱ्यांना नेऊ द्यावे. यामुळे पुनर्भरणासाठी बंधाऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ शकतो.

महोदय, मोठी धरणे आज होऊ शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मोठी धरणे होतील तेव्हा होतील. परंतु आमचे म्हणणे आहे की, नद्या, नाल्यातील पाणी अडविण्यासाठी ठिकठिकाणी बरास बांध्यांची व्यवस्था झाली तर मोठ्या प्रमाणावर पाणी अडविले जाऊ शकेल. कारण आज शेतकऱ्यांना सिंचनाच्या पाण्याचीच आवश्यकता आहे. शेतकरी म्हणतात की, आम्हाला कोणत्याही सुविधा नसल्या तरी चालतील परंतु आमच्या शेतीला पाणी मिळाले पाहिजे. कारण शेती हे शेतकऱ्याचे जीवन आहे. किंबहुना शेती हा शेतकऱ्यांचा आत्मा आहे. शेतकऱ्याच्या आत्म्याला म्हणजेच शेतीला पूरक काय आहे तर ते पाणी आहे. ते पाणी पुरविण्यासाठी आपण ठिकठिकाणी बरास बांधावी, अशा पध्दतीचा कार्यक्रम आमच्या सरकारने सुरु केलेला आहे, हे निदर्शनास आणून देते.

सभापती महोदय, शेततळ्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतीच्या ओलिताचा प्रश्न विचारात घेतला जातो. मला हे माहीत आहे की, पावसाचे पाणीच त्या शेततळ्यामध्ये राहते. कारण त्याला

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

कोणत्याही प्रकारचा फिडर कॅनल लावून पाणी मिळू शकत नाही. शेतीतील सर्व पाणी त्या ठिकाणी गोळा होते. त्यातून अपेक्षा असते की, पावसाच्या एका पाण्यावर शेतकऱ्याला त्याची शेती वाचविता आली पाहिजे आणि याचसाठी शेततळ्याचा उपयोग होतो. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे म्हणाले की, शेततळ्यामध्ये प्लास्टीक पेपर टाकण्याचा प्रश्नच नाही. महोदय, मी रोजगार हमी योजना समितीवर सदस्य म्हणून काम करते. मी ज्या ज्या जिल्ह्यात शेततळी बघितली त्या त्या ठिकाणी शेततळ्यांमध्ये प्लास्टीक टाकलेले दिसले. प्लास्टीकच्या माध्यमातून शेततळ्यातील पाणी अडवून ते शेतीला दिले पाहिजे, अशा प्रकारची भूमिका त्यामागे आहे. परंतु अशाप्रकारे उगीच काही तरी सांगून शेतकऱ्यांची दिशाभूल करुन सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा सरकारच्या चांगल्या कामाला मदत करुन खऱ्या अर्थाने राज्यातील शेतकऱ्यांना वाचविले पाहिजे. आपल्या सर्वांच्या दृष्टीने शेतकरी हा मुख्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या बाबतीत कोणीही राजकारण करु नये. कारण 70 टक्के शेतकरी हा बळीराजा आहे. बळीराजाचे आयुष्य चांगले घडवायचे असेल तर त्याच्या बाबतीत राजकारण करण्याऐवजी त्याला मदत करण्यासाठी एकमेकांनी आपला हात पुढे केला पाहिजे. आपण एकमेकाला संकटात साथ दिली पाहिजे आणि खऱ्या अर्थाने शासनाला मदत केली पाहिजे.

सभापती महोदय, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या घरच्या चुली पेटल्या पाहिजेत. कारण अगोदरच हा शेतकरी दुष्काळामुळे कर्जबाजारी झालेला आहे. त्याच्या घरात धान्य नाही. कोणीही उपाशी राहू नये म्हणून अल्प दरात अन्नधान्य पुरविण्याची योजना राज्य सरकारने सुरु केली आहे. हे करीत असताना सर्वांना धान्य मिळाले पाहिजे यासाठी राज्य सरकारने यामध्ये लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. मघापासून सांगितले गेले की, राज्य सरकार कोणालाही मदत करीत नाही. शेतकऱ्यांना जी मदत जाहीर करण्यात आली ती सुध्दा दिली गेली नसल्याचे सांगितले गेले. एवढेच नव्हे तर या सरकारला गोलमाल म्हणण्याची वेळ आली आहे, असेही सांगितले गेले. मी सांगू इच्छिते की, या सरकारला गोलमाल म्हणण्याचे काहीही कारण नाही. कारण यापूर्वीच्या सरकारने इतका माल गोळा केला की, या सरकारला गोलमाल करण्याची गरजच ठेवली नाही. आमचे सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे. त्यामुळे या सरकारला बळीराजाचे सरकार म्हणा आणि बळीराजाचे सरकार म्हणून या सरकारला पुढे न्या.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, 50 टक्के व त्यापेक्षा अधिक शेती पिकाच्या नुकसानीसाठी मदत केली जात होती. परंतु आता आपण 33 टक्के व त्यापेक्षा अधिक शेती पिकाच्या नुकसानीसाठी मदत करीत आहोत. आघाडी सरकारच्या काळात कोरडवाहू क्षेत्रासाठी 4,500 रुपये प्रती हेक्टर आणि पेरणी केलेल्या क्षेत्राच्या मर्यादेत मदत दिली जात होती. परंतु युती सरकारच्या काळात कोरडवाहू क्षेत्रासाठी 6,800 रुपये प्रती हेक्टर मदत मिळत आहे. आघाडी सरकारच्या काळात पेरणी केलेल्या क्षेत्राच्या मर्यादेत आश्वासित जलसिंचन योजनेखालील क्षेत्रासाठी 9 हजार रुपये मिळत होते. परंतु आता 13,500 रुपये प्रती हेक्टर देण्यास सुरवात केली आहे. आघाडी सरकारच्या काळात पेरणी केलेल्या क्षेत्रासाठी कमीत कमी 750 रुपये दिले जात होते. परंतु युती शासनाने ते 1 हजार रुपये केले आहेत. पूर्वी बहुवार्षिक पिके घेताना प्रती हेक्टर 12 हजार रुपये दिले जात होते. परंतु युती शासनाने ते 18 हजार रुपये केले आहे. प्रत्येक ठिकाणी शेतकऱ्यांसाठी मदत वाढवून घेण्याची भूमिका युती शासनाने स्वीकारली आहे. आघाडी सरकारच्या काळात पेरणी केलेल्या क्षेत्रासाठी कमीत कमी मदत 1500 रुपये मदत दिली जात होती आणि आता युती शासनाच्या काळात ही मदत 2500 रुपये केलेली आहे. आघाडी सरकारच्या काळात येरी, मलबेरी तसेच रेशिमसाठी 3200 रुपये प्रती हेक्टर मदत दिली जात होती, परंतु युती शासनाने ही मदत प्रती हेक्टर 4800 रुपये केली आहे. आघाडी सरकारच्या काळात मुगा रेशिमसाठी प्रती हेक्टर 4 हजार दिले जात होते, परंतु युती शासनाने ही मदत प्रती हेक्टर 6 हजार रुपये केली. आघाडी सरकारच्या काळात चारा छावण्यांमध्ये मोठ्या जनावरांसाठी प्रती दिन प्रती जनावर 50 रुपये दिले जात होते, परंतु युती शासनाने आता ही रक्कम प्रती दिन प्रती जनावर 70 रुपये केलेली आहे. आमच्या शासनाने विचार केला की, 50 रुपयांत काहीच येत नाही म्हणून ही रक्कम 70 रुपये करावी. यावरून आपल्या लक्षात येईल की, आमच्या शासनाने जनावरांचा सुध्दा विचार केला आहे. आघाडी सरकारच्या काळात छोट्या जनावरांसाठी प्रती दिन प्रती जनावर 25 रुपये दिले जात होते, परंतु आमच्या शासनाने त्यात वाढ करून ते प्रती दिन प्रती जनावर 35 रुपये केले. यामध्ये मदतीचा

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

कालावधी हा सारखाच आहे. छावणीतील जनावरांव्यतिरिक्त बाहेरील जनावरांसाठी सुध्दा चारा व वाहतूक दर देण्याची व्यवस्था केली आहे. आघाडी सरकारच्या काळात दुधाळ जनावरे उदाहरणार्थ म्हैस, गाय, उंट, याक इत्यादींसाठी 16,400 रुपये दिले जात होते, परंतु आमच्या सरकारने 30 हजार रुपये दिले आहेत. शिवाय मेंढी आणि बकरीसाठी अधिकचे 3 हजार रुपये केले आहेत. तसेच ओढकाम करणाऱ्या उंट, बैल, घोडा इत्यादी जनावरांसाठी 15 हजार रुपये दिले जात होते. परंतु युती शासनाने यात वाढ करुन ते 25 हजार रुपये केले आहेत. आघाडी सरकार वासरु, गाढव, शिंगरु, खेचर यांना 10 हजार रुपये देत होते, परंतु आमचे सरकार 16 हजार रुपये देत आहे. प्रत्येक कोंबडीमागे आघाडी सरकार 400 रुपये देत होते, परंतु आमचे सरकार प्रत्येक कोंबडीमागे 500 रुपये देत आहे. यावरुन आपल्या लक्षात येईल की, आमच्या सरकारने जनावरांचे सुध्दा भाव वाढविले, माणसांचे सुध्दा वाढविले. सर्वांना समान हक्क देण्याचा कार्यक्रम आमच्या सरकारने सुरु केला आहे.

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माणसांचा भाव केव्हापासून वाढायला लागला आहे ?

श्रीमती शोभा फडणवीस : मी माणसांचा भाव म्हटले नाही. माणसांना सुध्दा माणूस म्हणून जगविण्याची क्षमता या शासनामध्ये आहे. तसेच जनावरांना वाचविण्याची सुध्दा क्षमता या शासनामध्ये आहे, एवढेच या निमित्ताने सांगते व माझे भाषण संपविते.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यात दुष्काळाची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. राज्यातील जवळपास 24 हजार गावांमध्ये 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी दाखविल्यामुळे खऱ्या अर्थाने शेतकरी संकटात सापडलेला आहे. राज्यात शेतकरी सातत्याने आत्महत्या करीत आहे. या आत्महत्या गेल्या 15 वर्षांपासून वाढतच आहेत. या आत्महत्या आजच होत आहेत असे नाही. आज मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत असल्या तरी विदर्भात 2010 मध्ये सर्वात जास्त आत्महत्या झाल्या होत्या. त्यावेळच्या सरकारने 3750 कोटी रुपये आणि 1050 कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर केले. या 5 हजार कोटी रुपयांच्या पॅकेजचा ब्रेक-अप आम्ही दोन महिन्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडे मागितला होता. परंतु विदर्भातील पाच जिल्ह्यांमध्ये पॅकेजचा ब्रेक-अप सुध्दा आम्हाला मिळू शकला नाही. खरोखरच ते पॅकेज शेतकऱ्यांपर्यंत पोहचले काय याची खात्री करणे गरजेचे आहे.

महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, राज्यात दुष्काळी परिस्थिती असताना सुध्दा मंत्री महोदय आपापल्या प्रभागात आणि जिल्ह्यात फिरत नाही. परंतु मला अभिमान आहे की, माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील हे अकोला आणि वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्यांनी सातत्याने जिल्हाधिकारी आणि सर्वपक्षीय आमदारांना सोबत घेऊन 'दिलासा मिशन' राबविले. या माध्यमातून चारा टंचाई असो, पाणी टंचाई असो, जल शिवार योजना असो या विषयी प्रत्येक तालुक्यात प्रत्येक आठवड्यात त्यांनी दोन-दोन बैठका घेतल्या आहेत.

2 आय......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गोपीकिसन बाजोरिया ....

आम्हाला माननीय मंत्री डॉ. रणजित पाटील यांचा फोन यायचा, त्यावेळी वाटायचे की, आता कोणत्या तरी तालुक्यात जायचे आहे. आज शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. मी आरोप-प्रत्यारोप, आकडेवारी यामध्ये जाणार नाही. शेतकऱ्यांच्या या परिस्थितीला सामोरे जाण्याकरिता शासन नक्की धोरणात्मक निर्णय घेऊन शेतकऱ्यांना या अडचणीतून बाहेर काढणार आहे याबाबत मला तीळमात्र शंका नाही. फक्त या चर्चेच्या माध्यमातून मी दोन विषयांवर बोलणार आहे. पहिला विषय पाणी टंचाईचा आहे. विदर्भात, मराठवाड्यात पाणी टंचाई निर्माण झाली आहे. आता समोर उन्हाळ्याचे दिवस आहेत. पाणी टंचाई अत्यंत गंभीर आहे. एखाद्या तालुक्यात गेलो तर असे दिसते की, एका विहिरीवर शंभर महिला पाणी भरण्यासाठी बादल्या घेऊन उभ्या आहेत. परिस्थिती अशी आहे. आपण व्हॉट्स ॲपवर पाहिले असेल की, विहिरीवर 100 महिला पाणी ओढताना दिसत आहेत. आपल्याला अशा परिस्थितीत टँकरची व्यवस्था करावी लागणार आहे. आपल्याला अनेक उपाययोजना करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, सोलापूरमध्ये एक घटना घडली आहे. तेथे जिल्हाधिकारी श्री. मुंढे आहेत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी तेथे पाणी टंचाईबद्दल बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी आवर्जून सांगितले की, पाणी टंचाईसाठी टँकरची काही व्यवस्था करण्याची गरज नाही. पाण्ी टंचाई असेल तर तुम्ही आम्हाला ठोस उपाययोजना सांगाव्यात. आम्ही टँकरची काहीही व्यवस्था करू शकत नाही. आपल्या अशा तुटपुंज्या व्यवस्थेसाठी आम्हाला आग्रह धरू नका. असे जर जिल्हाधिकारी सांगत असेल तर काय म्हणायचे, आपल्याला ठोस उपाययोजना सोलापुरमध्ये करायची असेल तर आणि त्यासाठीर 10-15 वर्षे लागत असतील तर काय करायचे ? आज त्या शेतकऱ्यांसाठी पाण्याची व्यवस्था कशी करणार आहात हा प्रश्न आमच्या समोर उभा राहत आहे. आपण त्या जिल्हाधिकाऱ्यांच्या संदर्भात बोलावे. जिल्हाधिकारी टँकरच्या माध्यमातून पाणी टंचाई दूर करीत नाही. आजच्या परिस्थितीत अस्तित्वात असलेल्या कोणत्याही उपाययोजनांसाठी पुढाकार घेत नसतील तर आपण त्या जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करणार का अशी सुध्दा परिस्थिती निर्माण झाली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गोपीकिसन बाजोरिया ....

सभापती महोदय, चारा टंचाई हा दुसरा विषय आहे. चारा टंचाईची परिस्थिती जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात अत्यंत बिकट झाली आहे. उस्मानाबाद जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी चारा टंचाईचा अध्यादेश दिला आहे की, आम्ही चारा टंचाई बंद करीत आहोत. आपण त्या जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करणार का, त्यांना चारा टंचाई बंद करण्याचे हे अधिकार कोणी दिले ? राज्यात जनावरांना पिण्यासाठी नद्यांमध्ये पाणी नाही, बंधाऱ्यांमध्ये पाणी नाही. शेतकऱ्यांची जनावरे चाऱ्यासाठी, पाण्यासाठी फिरत 2-4 कि.मी. दूर जातात, मग नंतर तो शेतकरी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार करतो की, माझी जनावरे दिसत नाहीत, अशी परस्थिती निर्माण झाली आहे. माझ्या या दोन मागण्या आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांत चारा टंचाई व पाणी टंचाई या संदर्भात शासनाने विशेष लक्ष द्यावे. सदर विषयांच्या संदर्भात शासनाने अत्यंत तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. धन्यवाद !

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यात मोठ्या प्रमाणात दुष्काळ उद्‌भवलेला आहे. नैसर्गिक दुष्काळ आहे आणि या दुष्काळाच्या संदर्भातील चर्चेला आज सभागृहाचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे साहेबांनी सुरुवात केली आहे. दुष्काळ मानवनिर्मित नसून नैसर्गिक आहे. दुष्काळाची परिस्थिती राज्यातील वेगवेगळ्या विभागांत वेगवेगळी आहे. विदर्भात वेगळी आहे, मराठवाड्यात वेगळी आहे, पश्चिम महाराष्ट्रात वेगळी आहे. काही विभागात सातत्याने 4-5 वर्षे पाऊसच पडला नसल्याने दुष्काळाची तीव्रता तिकडे जास्त आहे तर जास्त प्रमाणात पाऊस पडणाऱ्या परिसरात गेल्या वर्षी कमी पाऊस पडल्यामुळे परत तेथे दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. काही वर्षांपूर्वी पूर्वी असलेल्या सरकारने मोठ्या प्रमाणात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांच्या पिकाचे कर्ज, बँकेचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला. नवीन सरकार आल्यामुळे नवीन सरकारकडून लोकांच्या, शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. मघाशी सभागृहात सन्माननीय सदस्यांनी बोलताना सांगितले की, बाळ रांगायला, चालायला लागले आहे. हरकत नाही. अजून काही वेळ लागेल यामध्ये काही दुमत नाही. परंतु शेतकरी हा काही थांबू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. राज्य शासनाच्या योजनांच्या रुपाने तिजोरीतील पैसा कशा प्रकारे शेतकऱ्यांसाठी वाटावा, कशामध्ये तो विभागला जावा हा त्यांचा निर्णय आहे. वेळोवेळी दुष्काळाची तीव्रता सरकार दरबारी असलेल्या माननीय मंत्र्यांकडे मांडण्याचे काम सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे आहे, ते आम्ही सर्वजण करीत आहोत.

सभापती महोदय, आपण परिचित आहात. सातारा जिल्ह्यात कोयनासारखे फार मोठे धरण आहे. आपण वीज प्रकल्पाच्या माध्यमातून सर्वजण या संदर्भात परिचित आहोत. धरणामध्ये पाणी साठते, त्यामुळे वीज निर्मिती होते. निर्माण होणारी वीज राज्यातील बऱ्याच उद्योगधंद्यांना दिली जाते. परंतु गेल्या वर्षी पाऊस 50 टक्क्यांपेक्षा कमी पडला. वीज निर्मिती काही प्रमाणात कमी झाली. धरणाचे पाणी शेतीसाठी वापरण्याचे काम होत होते, ते फार आता अडचणीत आले आहे. सातारा जिल्ह्यातील काही गावांची नावे, तालुक्यांची माहिती मी सभागृहालाला देऊ इच्छितो. माननीय मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी पाटण तालुक्यातील कोयना धरणाचा उल्लेख केला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील ....

पाटण तालुक्यात एकंदर 310 गावे आहेत. मी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. 155 गावे पाण्यापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. पाणी नाही. कारण पाऊसच त्या विभागात पडलेला नाही. तेथील तहसीलदारांच्या माध्यमातून फक्त 2 टँकरचे नियोजन करण्यात आले आहे. ही चुकीची बाब आहे. माननीय मंत्र्यांनी लक्ष दिले पाहिजे. दुष्काळाच्या परिस्थितीच्या संदर्भात काही नियमावली ठरविली आहे. आपण गावांची पाहणी करतो, त्यामध्ये सर्कल, तलाठी आणेवारी करतात. सर्कल, तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, सरपंच आणि 3 साक्षीदार असतात. मला सांगण्यास फार वाईट वाटते की, अजुनही पाटण तालुक्यात अशा प्रकारची आणेवारी झालेली नाही. झालेली आणेवारी सर्कलच्या अधिकाऱ्यांनी फक्त कार्यालयात बसून केली आहे. प्रत्यक्षात सरपंचाकडे जाऊन गावाची पाहणी करून कोणाच्याही सह्या घेतलेल्या नाहीत. आम्ही माननीय मंत्र्यांबद्दल, सरकारबद्दल बोलतो. पण अधिकारी किती गंभीर आहेत हे तुमच्या छोट्याशा आकड्यावरून कळते. 310 गावांतील 155 गावे पूर्णपणे पाण्यापासून वंचित राहणार आहेत. फक्त 2 टँकर मिळणार आहेत. असे नियोजन चालले आहे. माननीय मंत्र्यांनी त्या संदर्भात आढावा घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने जलयुक्त शिवाराच्या संदर्भात योजना केली. त्या योजनेच्या अंतर्गत फोरक्लिप आणि जेसीबी खरेदी करा असा शासन निर्णय काढण्यात आला. टेंडर मागविण्यात आली. दुष्काळाला सामोरे जाताना पाणी अडविण्यासाठी भविष्यात काही योजना करण्यासाठी दरवर्षी खरेदी केली जाते. यावर्षी कमीत कमी टेंडर भरण्यात येईल अशांना टेंडर देण्याचा निर्णय झाला. आश्चर्याची बाब अशी आहे की, जिल्हा कार्यालयाने ज्यावेळी हे टेंडर टाकले त्यावेळी परदेशात असलेल्या चायनिज कंपनीने टेंडर भरले, त्या टेंडरच्या अगेंस्ट वर्षांनुवर्षे फोरक्लिप, जेसीबी माल पुरवठा करणारी आपली भारतीय कंपनीने टेंडरच भरले नाही. अक्षरशः जिल्हा कार्यालयाच्या माध्यमातून सरकार दरबारी पत्र आले की, आम्ही कमी दरात त्यांच्याकडून फोरक्लिप आणि जेसीबी घेतले तर त्यांच्या कुठल्याही सामग्री बाजारात मिळत नाहीत. शेवटी एवढ्या महागड्या वस्तू घ्यायच्या आणि सामग्री वेळेवर सापडली नाही तर ती मशिन बंद होईल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील ....

आणि शेवटी शासनाचा निधी चांगल्या मार्गाला जाणार नाही. ते पत्र सातारा जिल्ह्याच्या संबंधित अधिकाऱ्यांनी मंत्रालयात पाठविले आहे. कमीत कमी तेवढी तरी काळजी घ्या की, त्याला उत्तर द्या, त्याबद्दलचा ठोस निर्णय घ्या.

....2J

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील.........

माझ्याकडे शासन निर्णयाची प्रत आहे. या सामुग्री खरेदीच्या संदर्भात एक वेगळी समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीमध्ये सातारा व कोल्हापूर जिल्ह्याचे कार्यकारी अभियंता आणि अन्य अधिकारी होते. या समितीचा अहवाल तयार करण्यात आला असून तोही मंत्रालयामध्ये मंत्री महोदयांना सादर करण्यात आला आहे. या अहवालामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, परदेशातील चायना कंपनीची यंत्रसामुग्री घेतली तर ती बंद पडण्याची शक्यता आहे आणि त्याचे पार्टस् देखील उपलब्ध होत नाहीत. एका बाजूला राज्य सरकार काही कोटी रुपयांचे नियोजन करीत आहे आणि त्या माध्यमातून घेण्यात येणारी यंत्रसामुग्री विदेशी कंपनीची घेतली जाणार असेल आणि त्यामुळे काही प्रश्न निर्माण होणार असतील तर या दुष्काळ निवारण कार्यक्रमामध्ये अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

सभापती महोदय, भूजल सर्वेक्षण केल्यानंतर पाणी पातळीबाबतचे पत्र देण्यात येते. सातारा जिल्ह्यात भूजल सर्व्हेक्षण करणारे अधिकारी आणि कर्मचारी यांची संख्या खूप कमी आहे. सातारा जिल्ह्यातील 11 तालुक्यात उपलब्ध कर्मचारी भूजल सर्व्हेक्षण कधी करतील, पहाणी कधी करतील आणि अहवाल कधी देतील, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांचा अहवाल आला नाही तर आपल्याला काहीच करता येणार नाही.

सभापती महोदय, सांगली जिल्ह्यात म्हैसाळ योजना आहे. सातारा जिल्ह्यात उरमडी, वसना आणि वांगणा या धरणातील पाणी शेतकऱ्यांना दिले जाते. परंतु, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती एवढी चांगली नाही की, ते वीज बिल देऊ शकतील. गेल्या राष्ट्रवादी काँग्रेस-काँग्रेस सरकारच्या काळात दुष्काळी परिस्थितीमध्ये राज्य सरकारने वीज बिलाचे पैसे दिले होते. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी सरकारला अहवाल दिलेला आहे. आमची एवढीच अपेक्षा आहे की, राज्य सरकारने 19.15 लक्ष रुपये एवढा खर्च वीज बिलाच्या बाबतीत केला तर शेतकऱ्यांना व जनावरांना पिण्याचे पाणी उपलब्ध होऊ शकेल आणि त्यांची परिस्थिती सुधारु शकेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य विविध पध्दतीने आपल्या मागण्या सरकारसमोर मांडत आहेत. आमची एवढीच अपेक्षा आहे की, राज्य सरकारने हा दुष्काळ अतिशय गांभीर्याने घ्यावा

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील.........

आणि केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त निधी मिळवावा. राज्यात आणि केंद्रात आपलेच सरकार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त निधी मिळवून राज्यात घडणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवाव्यात. या राज्य सरकारचा जो 5 वर्षाचा कार्यक्रम असेल तो त्यांनी लवकरात लवकर राबवावा. असे होऊ नये की, हा कार्यक्रम राबवता राबवता 5 वर्षे संपून जातील आणि शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----------

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंदराव पाटील (नामनियुक्त) : सभापती महोदय, राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यात दुष्काळाचा गहन प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या वर्षी झालेल्या अपुऱ्या पावसामुळे राज्यातील पाण्याचा साठा जवळपास पूर्ण आटत आला असून आणखी तीन महिने कसे जगून काढायचे हा प्रश्न अनेकांसमोर आहे. आजच्या घडीला राज्यातील जलाशयांमध्ये एकूण क्षमतेच्या फक्त 31 टक्के साठा असून हे पाणी जुलैपर्यंत पुरवावे लागणार आहे.

सभापती महोदय, राज्यातील लहान-मोठ्या सर्व प्रकल्पातून 421.71 टीएमसी पाणीसाठा शिल्लक असल्याचे जलसंपदा विभागाने माहे फेब्रुवारी, 2016 च्या सुमारास स्पष्ट केले आहे. राज्यात एकूण 1339.49 म्हणजेच 31 टक्के पाणीसाठा आहे. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी आताच सांगितले आहे की, कोयना धरणात पूर्वी 107 टीएमसी पाणी होते व आता ते 70 टीएमसीवर आले आहे. आपण दरवर्षी पाण्याचे नियोजन करतो. सभापती महोदय, आपण सातारा जिल्ह्यातील असल्यामुळे आपल्याला या परिस्थितीचा संपूर्ण अभ्यास आहे. या धरणातील पाणी वीज प्रकल्पासाठी वापरले जाते आणि नंतर ते समुद्रात सोडले जाते. आता आपल्याला हे पाणी अडवावे लागणार असून त्याचा पुनर्वापर करण्याची योजना आखावी लागणार आहे. माननीय ऊर्जा मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे हे सातारा जिल्ह्यात आले होते व त्यांनी आढावा घेतला होता. त्या बैठकीत सुध्दा आम्ही ही मागणी त्यांच्यासमोर मांडली आहे.

सभापती महोदय, आज महाराष्ट्रात सन 1972 च्या दुष्काळापेक्षाही भीषण दुष्काळ पडला आहे. खालच्या आणि वरच्या सभागृहात या संदर्भात साधक-बाधक चर्चाही होत आहे. अनेक प्रश्नावर वेळोवेळी त्या त्या सरकारांनी परिस्थितीनुसार निर्णय घेतले आहेत. परंतु, दुष्काळग्रस्तांच्या व त्या अनुषंगाने पुढे येणाऱ्या प्रश्नांच्या बाबतीत अद्याप कायमस्वरूपी उत्तर सरकारला सापडलेले दिसत नाही. मुळात जागतिक वातावरण बदलामुळे भौगोलिक वातावरणातही काही बदल होत आहेत. त्याचा गंभीरपणे सरकारने विचार केला पाहिजे. महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वत, विध्यं पर्वत व सातपुडा डोंगरांच्या रांगा वृक्षाविना उघड्या व बोडक्या दिसत आहेत. जंगले

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंदराव पाटील..........

पूर्णपणे समाप्तीच्या मार्गावर आहेत. आकाशातील ढगांना लागणारा गारवा उपलब्ध नसल्याने पाऊस पडू शकत नाही. महाराष्ट्र शासनाने वृक्ष जोपासण्यासाठी कठोर पावले उचलली पाहिजेत. वनखाते त्यांचे काम करते आहे की नाही, असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, दुसरी उपाययोजना म्हणजे जो पाऊस पडतो तो 'अडवा आणि जिरवा' हे धोरण सरकारने फार मोठ्या प्रमाणात राबविले पाहिजे आणि त्यासाठी अनावश्यक योजनांवर खर्च होणारा पैसा या कामाकडे वळविला पाहिजे. माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सरकारने 'जलयुक्त ग्राम' ही योजना सुरु केली होती. आपण ओढ्यानाल्यांमध्ये पाणी अडविण्यासाठी 'पृथ्वी बंधारे' बांधले होते. त्याचा चांगला परिणाम दिसून येत आहे. परंतु, आताच्या युती सरकारने त्याच योजनेला 'जलयुक्त शिवार' हे नाव दिलेले आहे. ही अत्यंत चांगली आणि लोकांपर्यंत पोहोचणारी योजना आहे. मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी याबाबतचा उल्लेख केला आहे. पाणी अडविण्यासाठी बंधारे बांधले जातात व त्या बंधाऱ्यांमुळे विशेषत: सातारा जिल्ह्यामध्ये माण, खटाव, कराड उत्तर, फलटण, कोरेगांव येथे चांगले रिझल्ट मिळत आहेत. माझ्या माहितीप्रमाणे आज त्या ठिकाणी अडविलेल्या बंधाऱ्यांमुळे जवळ जवळ त्या परिसरामध्ये 3/3 पिके शेतकरी घेऊ लागले आहेत. म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, भविष्यात घरांवर पडणारे पाणी सुध्दा राजस्थान पध्दतीने छोट्या, मोठ्या हौदांमध्ये अडवून वापरात आणले पाहिजे. तसेच, पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी चीनच्या धर्तीवर प्रचार मोहिम राबविली पाहिजे.

सभापती महोदय, या वेळच्या दुष्काळात, विदर्भाच्या काही भागात चांगला पाऊस होता. परंतु, काही भागात पाऊस चांगला नव्हता. संपूर्ण मराठवाडा पाण्याअभावी तडफडत आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये देखील पाण्याची परिस्थिती गंभीर आहे. कोकण व खानदेशात सुध्दा नेहमीच्या तुलनेत पाऊस कमी आहे. त्यामुळे सारासार विचार करता संपूर्ण महाराष्ट्र पाणी टंचाईला सामोरे जात आहे. दुष्काळाशी सामना करायचा असेल तर या सरकारने संपूर्ण महाराष्ट्राचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. निसर्ग किती चुकतो व आपणही किती चुकतो आहोत, याचा विचार सर्वांनीच केला पाहिजे. तात्पुरत्या उपाययोजनांवर प्रचंड पैसा खर्च करणे,

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंदराव पाटील.........

चुकीचे नियोजन, नोकरशाहीचा भ्रष्टाचार व लोकांची उदासिनता यामुळे अनेक योजना असफल होत आहेत. माझी कळकळीची विनंती आहे की, सरकारने दुष्काळ निवारण्यासाठी कायम स्वरुपी कृती योजना आखली पाहिजे व त्या कामी सर्व पक्षांना विश्वासात घेतले पाहिजे.

सभापती महोदय, यंदा मराठवाड्यात पाणी साठ्याची स्थिती सर्वाधिक चिंताजनक आहे. मराठवाड्यात सर्व 814 प्रकल्पांमध्ये मिळून केवळ 20.59 टीएमसी म्हणजेच 8 टक्के पाणीसाठा आहे. अपुऱ्या पावसामुळे मराठवाड्याला यंदा तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. जायकवाडी धरणात 3.50 टीएमसी म्हणजेच 5 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. पूर्णा, येलदरीमध्ये 6 टक्के, विष्णुपुरीमध्ये 23 टक्के, निम्नदुधनामध्ये 30 टक्के आणि ऊर्ध्व पैनगंगा धरणामध्ये 19 टक्के पाणीसाठी आहे तर मराठवाड्यातील प्रकल्पांपैकी पूर्णा, सिध्देश्वर, मांजरा, निम्न तेरणा, सिना, काळेगाव या सहा धरणांचा पाणीसाठा मृत पातळीवर आलेला आहे.

सभापती महोदय, उन्हाळ्यामध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. आताच चारा छावण्यांचा विषय निघाला. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी जलयुक्त शिवार योजनेला प्राधान्य दिले आणि गावोगावी जास्तीत जास्त तळी खोदण्याचे आवाहन केले आहे. सरकारने यासाठी मोठ्या प्रमाणात रक्कम खर्च केली आहे. परंतु उन्हाळ्यात या योजनेचा फायदा होताना दिसत नाही. उन्हाळ्यात चाऱ्याचा प्रश्न गंभीर होत असताना चारा छावण्या बंद करण्याचा निर्णय मध्यंतरी घेण्यात आला. राजकीय दबावानंतर या छावण्या पुन्हा सुरु करण्यात आल्या.

सभापती महोदय, सध्याच्या दुष्काळी परिस्थितीची तुलना करावयाची असेल तर दिनांक 18 नाव्हेंबर, 2014 ला 19069 गावांमध्ये हंगामी पैसेवारी 50 टक्क्यांपेक्षा कमी होती. दिनांक 20 ऑक्टोबर 2015 ला 16128 गावांमध्ये हंगामी पैसेवारी 50 टक्क्यांपेक्षा कमी होती. त्यामुळे तेथे दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. खरीपाची हंगामी पैसेवारी दरवर्षी 15 सप्टेंबरला जाहीर करावयाची असते. पण ही पैसेवारी उशिरा जाहीर करण्यात आली. परिणामी सन 2015 या वर्षात 3228 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. दिनांक 22 जानेवारी, 2016 रोजी राज्य सरकारने उच्च न्यायालयात 1000 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, असे प्रतिज्ञापत्राव्दारे सांगितले आहे.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंदराव पाटील........

त्यातील 1841 प्रकरणे भरपाईच्या निकषात बसली आणि 903 प्रकरणे भरपाईसाठी आवश्यक असलेल्या अटींची पूर्तता न झाल्याने फेटाळण्यात आलेली आहेत. लातूरमधील कु.स्वाती पिटले या तरुणीने बस पाससाठी 260/- रुपये नाहीत म्हणून आत्महत्या केली. तसेच, कळंब तालुक्यातील मंगरुळ येथील गोकुळ डुकरे या विद्यार्थ्यांकडे परीक्षेचे शुल्क भरण्यासाठी पैसे नसल्यामुळे त्याने विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. परीक्षा शुल्क भरण्याची मुदत 15 सप्टेंबर रोजी संपल्यामुळे मराठवाड्यातील तब्बल 5 हजारापेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया गेलेले आहे. अवघे 320/- रुपये परीक्षा फी न भरता आल्याने शिक्षण सोडून देण्याचे प्रमाण 22 टक्क्यांवर पोहोचले आहे.

सभापती महोदय, मला आघाडी सरकार व युती शासनाच्या काळातील तुलना करावयाची आहे. मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी आपल्या भाषणात छावन्यांचा उल्लेख केला होता. मी सांगू इच्छितो की, आघाडी शासनाने 11 जिल्ह्यातील 1917 छावन्यांमध्ये 9 लाख 80 हजार जनावरे सांभाळली. परंतु, युती शासन 6 जिल्ह्यात फक्त 222 छावन्या सुरु करुन 2 लाख 17 हजार जनावरे सांभाळत आहे. त्यामुळे आम्ही खूप मोठे काम करीत आहोत, असे म्हणण्याचे काही कारण नाही. त्यावेळी 4,559 गावे आणि 11,333 वाड्यांना 5,541 टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता आणि आता 1,559 गावे व 2,205 वाड्यांना 2,096 टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच, आघाडी शासनाने रोजगार हमी योजनेची 4,19,483 कामे सुरु केली होती आणि आज रोजगार हमी योजनेची फक्त 1,02,729 कामे सुरु आहेत.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी वेळेअभावी मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दुष्काळाच्या प्रस्तावावर चर्चा करताना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. मी त्या मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. युती शासन काय करीत आहे आणि आघाडी शासनाने काय केले, याची आपण तुलना करायला लागलो तर आपल्या असे लक्षात येईल की, अनेक मुद्यांवर युती शासनाने भरभरुन मदत करण्याचा ओघ सतत कायम ठेवलेला आहे. मनुष्य हानी झाल्यास मृताच्या वारसांना 1.5 लाख रुपये मदत दिली जात होती ती मदत 4 लाख रुपयांमध्ये परिवर्तीत करण्यात आलेली आहे किंवा अशा अनेक मुद्यांवर आपल्याला चर्चा करता येईल. परंतु, आपण जोपर्यंत या परिस्थितीची निर्मिती कशामध्ये आहे याचा विचार करीत नाही तोपर्यंत यावरील उपाययोजना या तात्पुरत्या उपाययोजना ठरतील, असे माझे मत आहे.

सभापती महोदय, मागील 4-5 वर्षापासून निसर्गाने जो असहकार केलेला आहे त्याचा परिणाम महाराष्ट्र राज्याला भोगावा लागत आहे. त्यातून मराठवाडा, विदर्भ होरपळून निघत आहे, अशी स्थिती आहे. आज आपण दुष्काळी परिस्थिती आणि करावयाचे नियोजन यावर चर्चा करीत आहोत. परंतु, पुढील चार महिने अत्यंत बिकट व हलाखीचे जाणार आहेत. मराठवाडा, पश्चिम विदर्भात पाण्याचा बिकट प्रश्न निर्माण झालेला आहे आणि हे प्रत्येक वर्षी चालणार आहे. म्हणून तात्पुरत्या उपाययोजना, मदतीचा ओघ किंवा मदत करण्याची जी भूमिका आहे याच्या पलीकडे जाऊन आपल्याला याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. या प्रस्तावावर बोलताना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मत व्यक्त केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी मोठ्या आवाजात आपले विषय मांडले, आरोप प्रत्यारोप केले. अडचणीत सापडलेला गरीब कास्तकार, दुष्काळग्रस्त भागातील नागरिक ज्यावेळी सभागृहातील ही चर्चा ऐकतो त्यावेळी त्याला या चर्चेतून समाधान वाटत नाही. या सर्वभौम सभागृहात होणाऱ्या चर्चेच्या माध्यमातून त्याला शाश्वती मिळताना दिसत नाही.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले........

सभापती महोदय, हवामानामध्ये बदल झालेला आहे. निसर्ग आपल्याला साथ देत नाही. हवामानातील बदलाच्या अनुषंगाने मूलभूत सुविधा आणि मूलभूत गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. परंतु, तशा प्रकारच्या कोणत्याही कन्स्ट्रक्टीव्ह सूचना विरोधी पक्षाकडून शासनाला दिल्या गेल्या नाहीत, हे मला दुर्दैवाने सांगावे लागत आहे. आमच्याच समस्येच्या चिंधड्या चौकात वाजविण्याचा हा प्रकार आहे. दुष्काळग्रस्त भागातील गोरगरीब जनतेसाठी कोणत्याही प्रकारची उपाययोजना झाल्याचे आपल्याला दिसत नाही. सभागृहाचे विल असण्याची आवश्यकता आहे. एखाद्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबरोबर युद्ध करताना ज्या प्रमाणे स्पिरिट निर्माण होऊन संपूर्ण राष्ट्र एक होते त्या प्रमाणे दुष्काळावर मात करण्याकरिता संपूर्ण राज्याला एकत्रितपणे येऊन आपले पॉलिटिकल विल दाखविण्याची आवश्यकता आहे. परंतु, तशा प्रकारचे विल सभागृहातील चर्चेच्या माध्यमातून आपल्या दिसत नाही. अनेक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. एक-दोन सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात उपाययोजना सूचविलेल्या आहेत. परंतु, हवामानाच्या बदलाचे जे परिणाम आहेत त्या परिणामांवर अशा पद्धतीच्या तात्कालिक उपाययोजना करुन त्याचे निदान होण्याची शक्यता आणि शाश्वती आपल्याला दिसत नाही. म्हणून जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात निर्माण होणारी सिंचनाची व्यवस्था असो किंवा ज्या इतर व्यवस्था करावयाच्या आहेत त्या आपल्याला अधिक मजबुतीने कराव्या लागतील. सभागृहात निव्वळ राजकीय दृष्टीने भाषणे करुन किंवा आरोप प्रत्यारोप करुन समाधान होणार नाही. म्हणून येणाऱ्या दिवसात शासनाने या दृष्टीकोनातून पावले उचलण्याची आवश्यकता आहे. सामान्य माणसासाठी पाण्याची व्यवस्था निर्माण होईल, दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना, शेतकऱ्यांना शाश्वती वाटेल, आधार मिळेल अशी भावना निर्माण करणाऱ्या योजना घोषित करण्याची आवश्यकता आहे आणि शासन हे निश्चितपणे करेल, असा विश्वास व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार मानतो. म.वि.प. नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावाच्या माध्यमातून आपण मराठवाडा, विदर्भ, खान्देश, पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील विविध भागामध्ये जी दुष्काळाची तीव्र परिस्थिती निर्माण झालेली आहे त्या विषयावर चर्चा करीत आहोत. मी मोजक्या शब्दात आणि मोजक्या वेळेत बोलण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे, शेतकरी कामगार पक्षाचे सन्माननीय सदस्य व माझे मित्र श्री.जयंत पाटील, सर्वश्री माणिकराव ठाकरे, प्रा.अनिल सोले, श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी या विषयावर अत्यंत महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे दुष्काळाचे अतिशय विदारक चित्र आहे. मी सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले साहेबांना सांगू इच्छितो की, कोणावर आरोप प्रत्यारोप करण्याची आवश्यकता नाही. तत्कालीन सरकारने काय केले आणि विद्यमान सरकार काय करीत आहे, हा चर्चेचा विषय नाही. पूर्वी जो दुष्काळ पडला तो आघाडी शासनामुळे पडला आणि आता जो दुष्काळ पडलेला आहे तो युती शासनामुळे पडलेला आहे अशातला भाग नाही. नैसर्गिक परिस्थितीच तशी आहे. आपण मघाशी सांगितले की, वातावरणामध्ये बदल होत आहेत. त्यामुळे पूर्वी काय झाले किंवा काय झाले नाही, याची चर्चा करण्यापेक्षा सध्या आपले राज्य दुष्काळामध्ये होरपळून निघत आहे यासाठी आपण युद्ध पातळीवर काय करु शकतो हा विचार करण्याची गरज आहे.

..L-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) :** कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे सभागृहाचे कामकाज सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत घ्यावयाचे असल्यामुळे सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे हे ऑनलेग राहतील. सभागृहात या प्रस्तावावर पुन्हा चर्चा सुरु होईल तेव्हा सन्माननीय सदस्य बोलतील.

आता मी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. शुक्रवार दिनांक 11 मार्च, 2016 रोजी दुपारी 12.00 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 7.00 वाजता शुक्रवार दिनांक 11 मार्च,2016 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION